॥ जय माता जी ॥

॥ माता बारोंडादेवी प्रसन्न ॥

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ३९ सोमवार दि. २० सप्टेंबर २०२१ ते रविवार दि. २६ सप्टेंबर २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

प्रियकराच्या प्रेमासाठी आईचे मन मेले मुलाला ठार मारून मातृत्व कलंकीत केले

जालना/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंधातील क्षांक सुखासाठी जन्मदात्या आईनेच आपल्या सहा वर्षांच्या मुलाची हत्या केली. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. विशेष म्हणजे मुलाची हत्या करून आपले पाप लपवण्यासही तिने स्वतःच मुलगा हरवल्याची पोलिसांकडे फिर्याद नोंदवली होती. पण चाणाक्ष पोलिसांनी तिला बेड्या ठोकल्या. जालना जिल्ह्यातील दगरगाव येथे राहणारी एक महिला तिच्या नातेवाईकच्या उपचारासाठी अंबड येथे आली होती. नातेवाईकला ...पान २ वर

भाईगिरीचा नाद त्याच्या प्राणावर बेतला बालपणीच्या मित्राने मित्राचा जीव घेतला

उल्हासनगर/किरण तेलगोटे

मयत सुशांत

भाईगिरी हे सुद्धा एक व्यसन आहे आणि आजकालच्या तरुणांमध्ये सिनेमातील माफियागिरी पाहून म्हणा किंवा पैसे कमवायच्या शॉर्टकट आकर्षणामुळे म्हणा तरुण भाईगिरी कडे आकर्षित होतात आणि त्यातून मग तू मोठा कि मी मोठा अशी स्पर्धा सुरु होते आणि अशाच स्पर्धेतून मैत्रीचे रुपांतर दुष्मनीत होते. आणि एकदा का दुष्मनी झाली कि मग सहसा समेत होत नाही. कारण प्रत्येक तरुणाला वाटत असते कि आपल्या एरियात आपलाच रुबाब असावा. आपल्या सोबत नेहमी दहा बारा तरुणांचा घोळका असावा आणि त्यांनी आपल्या इशाऱ्यावर चालावे. आपण भाईसारखे दिसलो, वागलो तरच आपली दहशत निर्माण होईल. पण त्यासाठी आपल्या एरियात आपला कुणी प्रतिस्पर्धी नसावा हि भावना आजकाल तरुणांना भाईगिरीकडे नेत असल्याने प्रत्येक जण भाई बनण्याचा प्रयत्न करतो. भाईगिरीतून हप्ते मिळतात आणि त्या पैशातून रुबाबात जगता येते हि मानसिकता बनल्याने प्रत्येक तरुण भाई बनायला बघत आहे. त्यासाठी कोणाशीही पंगा घेण्याची त्याची तयारी असते. मात्र उल्हासनगरातील दोन मित्रांमध्येच भाई बनण्याची स्पर्धा सुरु झाली. मात्र एका म्यॅनात दोन तलवारी जशा राहू शकत नाहीत, त्याच प्रमाणे एका एरियात दोन भाई राहू शकत नाहीत. त्यामुळेच या दोन मित्रांमध्ये वितुष्ट आले आणि एकाने दुसऱ्याचा गेम केला.

मयत सुशांत गायकवाड हा मुख्य आरोपी आकाश उर्फ चिंट्या याचा लहानपणीचा मित्र दोघांचं बालपण सोबत गेलं. एकाच परिसरात लहानाचे मोठे झाले. दोघांना ही भाई व्हायचं होत. मयत सुशांत गायकवाड याच्यावर विविध पोलीस ठाण्यात ७ गुन्हे दाखल आहेत.तर मुख्य आरोपी आकाश उर्फ चिंट्या शिंदे याच्यावर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात ९ गुन्हे दाखल आहेत.आरोपी आकाश उर्फ चिंट्या हा याचे शहरातून तडीपारीचे आदेश होते.त्यामुळे आरोपी आकाश उर्फ चिंट्या काही दिवस शहरातून हद्दपार होता.परत शहरात येऊन गुन्हेगारी त्याने सुरू केली होती.

शुक्रवारी दुपारी १२ मयत सुशांत हा मित्रांसोबत कॅम्प-४येथील नेताजी चौक परिसरात आला होता.तेव्हा आरोपी आकाश उर्फ चिंट्या, अमोल मोरे, आकाश खडसे, यश रुखवत, अभि थोरात हे नेताजी परिसरात पाठवलाग करून हातात तलवारी,कोयते,चॉपर घेऊन दबाधरुन बसले होते. तेव्हा मयत सुशांत हा बाहेर निघाला असता सर्वांनी त्याच्यावर प्रहार सुरू केला. हातात तलवारी, चॉपर,कोयते,घेऊन सिनेमा स्टाईल पडत पडत बंगलो परिसरात घुसवून मयत सुशांत याच्यावर घाव घालत रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. आरोपींच्या हातातील घातक हत्यारे पाहून परिसरातील नागरिकांनी भयभीत झाले होते. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला सुशांत हा गंभीर जखमी झाला होता. हल्ला करून हल्लेखोर हे पडून गेले होते. घटनेची माहिती हिलाईन पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मयत सुशांत याला मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्या अगोदरच गंभीर ...पान २ वर

वासनांध नराधमांना नात्याची कदर कुठली सहा वर्षांच्या भाचीची मामानेच अब्रू लुटली



अंबरनाथ/क्राईम रिपोर्टर

आजकाल समाजात व्यभिचार इतका वाढला आहे कि लोकांना नात्यागोत्याचा सुधा विसर पडत चाललाय. त्याचा परिणाम असा होतोय कि काही महिला चार भिंतीच्या आड आपल्या घरातही सुरक्षित नाहीत. नात्यातल्याच पुरुषांकडून त्यांच्यावर वाईट नजर ठेवली जातेय. त्यातूनच बलात्कारा सारख्या घटना घडत आहेत आणि काही नराधमांची तर विकृत मानसिकता एवढी टोकाला गेलीय कि नात्यातल्या लहान बालीकांवारही लैंगिक अत्याचार करायला ते मागे पुढे पाहत नाहीत. उल्हासनगरमध्ये अशाच एका नराधम मामाने आपल्या ६ वर्षाच्या भाचीवर लैंगिक अत्याचार केले. या घटनेने संपूर्ण उल्हासनगर हादरले असून पोलिसांनी आरोपी मामाच्या मुसक्या आवळल्या आहेत.

साकीनाका बलात्कारच घटना ताजी असतानाच नात्याला कालिमा फासणारी एक भयानक घटना उल्हासनगर येथे घडली आहे. या ठिकाणी एका नराधम मामानेच आपल्या अल्पवयीन भाचीची अब्रू लुटली. या प्रकरणी पोलिसांनी मामाला अटक केली आहे. उल्हासनगरच्या पाच नंबर कॅम्पमध्ये पीडित मुलगी आपल्या कुटुंबा सोबत राहते. ती अवघ्या सहा वर्षाची असून तिची आई भाजी विकते. मात्र आई भाजी विकायला गेली की सदर मुलगी मामाच्या घरी खेळला जयची आणि त्याचाच गैरफायदा घेऊन मामा रवी जांजवतीय (३४) याने त्या मुलीचे लैंगिक शोषण कराचा. तब्बल दोन महिने हा प्रकार सुरू होता. मात्र मुलीला त्रास होऊ लागल्याने तिने आपल्या आईला संगितले. त्यामुळे आईने तत्काल उल्हासनगरच्या हिल लाइन पोलिस ठाण्यात या घटनेची फिर्याद नोंदवतच पोलिसांनी आरोपी मामाला अटक केली असून न्यायालयाने त्याला ४ दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे.

पत्नीचा खून करुन सांगितले कोरोनाने मेली सीसीटीव्ही फुटेजने पतीची पोलखोल केली

गुन्हेकथा/लक्ष्मणराव पाटोळे

कोरोना काळात बऱ्याच लोकांनी संधीचा फायदा घेऊन आपले उखळ पांढरे केले. व्यापाऱ्यांनी दुप्पट तिप्पट किमतीत जीवनावश्यक वस्तू विकल्या काही पोलिसांनी कायद्याचा धाक दाखवून लोकांकडून पैसे उकळले, तर खाजगी रुग्णालयांनी खुलेआम पेशंट आणि त्यांच्या नातेवाईंकाना लुटले. मात्र तिरुपती येथे राहणाऱ्या एका सोफ्टवेअर अभियंत्याने चक्क आपल्या पत्नीचा खून करून ती कोरोनाने मेली असे भासवून तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांना अर्धवट जळलेली बॉडी सापडल्याने तसेच मृत महिलेच्या माहेरच्यांनी मिसिंगची फिर्याद नोंदवलेली असल्याने पोलिसांची तपासाची चक्रे वेगाने फिरली आणि त्यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे या खुनाचा पर्दाफाश करून आरोपी पतीला बेड्या ठोकल्या.

कोरोना अनलाकचा कालखंड असतानाच एका हत्याकांडाने तिरुपतीमधील अलिपुरा पोलिसांची झोप उडवली. पण पोलिसांनी कोणताही पुरावा हाती नसताना मेहनत घेऊन ही मर्डर मिस्ट्री अनलाक केली. दुर्दैव हे की, कोरोनाने घ्यायचे ते हजारो बळी ...पान २ वर

ज्याने घेतली सुपारी त्याला हाताशी धरला केबलच्या वायरी कापणाऱ्याचा गळा चिरला

मयत प्रकाश

आरोपी कैलास

अमळनेर/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही व्यवसायात स्पर्धा असते अशावेळी आपला धंदा वाढवण्यासाठी जो प्रतिस्पर्धी असतो, त्याचा धंदा बुडवण्याचा प्रयत्न केला जातो. पण असे प्रयत्न अनेक वेळा घातक ठरू शकतात आणि त्यातून एखाद्याचा जीवही जाऊ शकतो. अमळनेर मधील केबल व्यावसायिक कैलाश शिंगणे याचा केबलचा व्यवसाय ठप्प करण्यासाठी त्याच्या प्रतिस्पर्धी केबल व्यावसायिकाने एकाला केबलच्या वायर कापण्याची सुपारी दिली होती. ज्याला सुपारी दिलेली होती तोही कैलासचा शत्रू होता. मात्र कैलास त्याचा काटा काढण्यासाठी थंड डोक्याने योजना आखली. त्याच्याशी गोड बोलून अगोदर केबलच्या वायरी कोणाच्या सांगण्यावरून कशा कापल्या हे वदवून घेतले आणि नंतर त्याची अत्यंत निर्घुणपणे हत्या केली. मात्र पोलिसांनी मोठ्या कौशल्याने तपास करून कैलासला अटक केली.

कैलास पांडुरंग शिंगाणे हा अमळनेर शहरातील तरुण उद्योजक होता. उद्योगधंदा करण्याची त्याच्यात प्रचंड तळमळ होती. उद्योगधंद्यात स्वत:ला वाहून घेण्याची अंगी जिद्द आणि धमक असल्यामुळे त्याने चांगली धनसंपदा जमवली होती. सुस्वरुप पत्नी व मुलांचा धनी असलेल्या कैलासने वयाच्या अवघ्या तिशीत अमळनेर शहरातील हाशिमजी प्रेमजी या व्यापारी संकुलाच्या दुसऱ्या ...पान २ वर

अनैतिक कामक्रीडेची साक्षीदार झाली गरीब बिचारी म्हातारी जीवानिशी गेली

सातारा/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंध हे कधीच लपून राहत नाहीत. मात्र ते उघडकीस आले तर समाजात तोंड दाखवायला जागा राहत नाही. चार लोकांत बदनामी होते. संसार उध्वस्त होतात. म्हणूनच असे संबंध कधीच उघडकीस येऊ नयेत याची काळजी घेतली जाते आणि जर कुणी पहिले तर त्याचे कायमचे तोंड बंद केले जाते. सातारा जिल्ह्यातील येल्लामा वाडी येथे राहणाऱ्या आणि गावात भिक्षा मागून जगणाऱ्या एका वृद्ध भिक्षेकरी महिलेने अशाच एका जोडप्याला रासलिलेत मग्न असताना पाहिले. त्यामुळे हि म्हातारी आता आपले अनैतिक संबंधाचे भांडे फोडील या भीतीने त्या जोडप्याने त्या गरीब वृद्धेची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

खटाव तालुक्यातील येलमरवाडी येथे गेल्या काही वर्षापासून हिराबाई दगडू जगताप या वृध्दा एकटयाच राहत होत्या.त्याच्या पतीच्या निधनानंतर त्यांना कोणाचा कशाचा आधार राहिला नसल्याने त्या तशा निराधारच होत्या. आपल्या दोन वेळेचा उदरनिर्वाह त्या गावातच भिक्षा मागून करीत होत्या. आपल्या वाटेला आलेले जीवन त्या एकाकीपणे जगत होत्या. तशी गावात त्याची ...पान ६ वर

जमिनीच्या मोहापायी २० एकर वाल्याला तिने सोडले पतीला ठार मारून १०० एकर वाल्याशी नाते जोडले

रावेर/क्राईम रिपोर्टर

आरोपी लक्ष्मण

आरोपी सागरीबाई

संपतीचा मोह खूप वाईट असतो. कारण त्यामुळे माणूस माणुसकी आणि नातीगोती विसरून जातो. नेपानगरमध्ये राहणाऱ्या सागरिका बाईच्या बाबतीत असेच घडले आहे. पहिल्या पतीकडे केवळ २० एकर जमीन होती म्हणून ती त्याला सोडून शंभर एकर जमीन असलेल्या जमीनदाराच्या सोबत पळून गेली. मात्र पहिल्या पतीच्या २० एकर जमिनीचा मोह काही तिला सुटलेला नव्हता आणि त्याच मोहापोटी तीने आपला दुसरा पती आणि त्याच्या साथीदारांच्या मदतीने पहिल्या पतीचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी तिच्यासह सर्व आरोपींना अटक केली आहे.

प्रताप खुमसिंग भिल आणि सागरीबाई हे दोघे पती पत्नी होते. दोघांचा संसार व्यवस्थीत सुरु होता. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश राज्याच्या सिमेवरील सातपुडा पर्वतराजीत वसलेल्या मध्यप्रदेशातील बुरहानपुर तालुक्यातील बसाली या गावी प्रताप रहात होता. प्रताप भिल याचे आईवडील व भाऊ असे सर्वजण मयत झाले होते. त्यामुळे दाखल केलेल्या वनदाव्याखाली प्रताप भिल यास विस एकर शेतजमीन मिळाली होती. तो विस एकर शेतजमीनीचा मालक झाला होता. एकंदरीत प्रताप व सागरीबाई यांचे सर्वकाही व्यवस्थित सुरु होते. असे असले तरी त्याची पत्नी सागरीबाई शंभर एकर जमीन मालकाच्या प्रेमात पडली. लक्ष्मण वेरसिंग भिल असे त्या शंभर एकर शेतजमीन मालकाचे नाव होते. जमीनदार लक्ष्मण भिल हा विवाहीत होता. तरीदेखील सागरीबाई त्याच्या प्रेमात पडली. ती त्याच्यासोबत लग्न करण्याची इच्छा बाळगून होती. पहिली पत्नी असतांना देखील मध्यप्रदेशातील नेपानगर तालुक्यातील जमीनदार लक्ष्मण भिल याने सागरीबाईच्या प्रेमाचा स्विकार ...पान ६ वर

उधारीच्या पैशावरून दोघांत वाद झाला ग्राहकाच्या हातून पान टपरीवाला मेला

बेळगाव/क्राईम रिपोर्टर

मयत बाळकृष्ण

उधारीचा व्यवहार हा माणसासाठी कधी न कधी घातक ठरतो. त्यामुळे उधारीचे व्यवहार त्याच माणसाबरोबर करायचे असतात ज्याच्याविषयी विश्वास असतो. बेळगावच्या लक्ष्मी नगरमध्ये पानाची टपरी चालवणाऱ्या एका इसमाने एका दारुड्या इसमाला नेहमी उधारीवर गुटखा आणि मावा खायला देण्याची चूक केली. पण त्याची तीच चूक त्याला इतकी महागात पडली कि त्याला स्वतःचा जीव गमवावा लागला. उधारी वाढल्याने उधारीचे पैसे मिळत नसल्याने पान टपरी वाल्याने उधारी देणे बंद केले. त्यामुळे त्याच्याकडून उधारीवर गुटखा आणि मावा खाणारा ग्राहक इतका चिडला कि त्याने पानटपरी वाल्याच्या घरी जाऊन त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

उडपी जिल्हयातील कुंदापूर येथील बाळकृष्ण नागेश शेट्टी हे सध्या बेळगाव येथील वडगावातील लक्ष्मीनगर येथे राहयला आहेत. तेथे नागराज शेट्टी याच्या हॉटेल समोर त्यांची पानटपरी आहे. लक्ष्मीनगर येथे गर्दीच्या ठिकाणी त्यांची ...पान ६ वर

संशयामुळे त्याचा संसार उध्वस्त झाला पत्नीला मारून आत्महत्येचा प्रयत्न केला

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

आरोपी निशिकांत

मयत कोमल

संशयाचे भूत एकदा का माणसाच्या मानेवर बसले कि माणूस त्याचे मानसिक स्वस्थ हरवून बसतो आणि ज्याच्यावर त्याचा संशय असतो त्याचेच विचार सतत त्याच्या मनात घोळत असतात. कोल्हापूर जिल्ह्यातील कणेरी येथे राहणाऱ्या निशिकांत चव्हाण याच्या मानेवरही असेच संशयाचे भूत बसले होते. त्याचा पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. त्यामुळे नाराज झालेली पत्नी त्याला जवळ घेत नव्हती. त्यामुळे आपली दोन मुले हि आपली नसावीत असे वाटून पत्नीवरील त्याचा संशय आणखी बळावला आणि याच संशयातून एके रात्री त्याने नायलॉनच्या दोरीने गळा आवळून पत्नीची हत्या केली आणि त्याच दोरीने स्वतःही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण दोरी तुटल्याने बचावला. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

निशिकांत चव्हाण हा गोकुळ शिरगाव येथील एमआडीसीतील एका कंपनीत कामाला आहे.त्याचे गेल्या सात आठ वर्षापूर्वी कोमल हिच्या सोबत समाजाच्या रितीरिवाजानुसार लग्न झाले होते. निशिकांत हा गोकुळ शिरगाव येथे कामाला असल्याने तो पत्नी मुलासह कणेरी येथील माधवनगर येथे दिलीप पोवार याच्या खोलीत भाडयाने राहयला आहे. त्यांना सहा वर्षाचा आणि दीड वर्षाचा अशी दोन मुले आहेत. त्याचा संसार सुखाचा समाधनाचा चालू असताना निशिकांत याच्या मनात पत्नी कोमल हिच्याविषयी शंका निर्माण झाली होती. कोमल ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने ती कुठल्या तरी परपुरूषाला चिकटली आहे असा त्याचा गैरसमज निर्माण झाला होता. तो पत्नी कोमल हिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला सारखे मारहाण ...पान ६ वर

20 TO 26 SEPTEMBER 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 18/09/2021 7:56 PM Page 1

पान १ वरून....

भाईगिरीचा नाद त्याच्या प्राणावर ...

जखमी असल्याने त्याचा रस्त्यातच मृत्यू झाला. आपल्या मुलाच्या हत्येची माहिती कुटुंबियांना मिळताच मध्यवर्ती रुग्णालयात आई वडिलांनी हंबरडा फोडत आरोपींवर कठोर कारवाईची मागणी कुटुंबियांनी केली आहे. हिलाईन पोलिसांनी हत्येचा पंचनामा केला. दिवसाढवळ्या हत्या झाल्याने परिमंडळ -४ हे हादरले होते. आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांनी पथक तयार केले. हत्या करून पडून गेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाने केले. परिमंडळ-४ मधील पोलिसांनी सापळा रचून दोन तासात आरोपींच्या मूसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे. ही हत्या केवळ किरकोळ वादातून झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. मयत सुशांत व मुख्य आरोपी चिंट्या यांच्यात बाचाबाची झाली मी तुला बघून घेतो असा यापूर्वी वाद झाला होता. या किरकोळ वादाचं रूपांतर हत्येत झालं. अखेर हत्या करणाऱ्या आरोपींना दोन तासात अटक केली आहे. पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, परिमंडळ -४ पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, विठ्ठलवाडीचे पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक कन्ह्याया थोरात,विठ्ठलवाडी गुन्हे प्रटीकरण हर्षल राजपूत, मंगेश वीर, समीर गायकवाड यांनी कामगिरी केली.

प्रियकराच्या प्रेमासाठी आईचे मन...

रुग्णालयात भरती करून ती औषध आण्यासाठी बाहेर गेली. यावेळी तिने आपल्या सहा वर्षाच्या मुलाला प्रियकरच्या स्वाधीन केले. त्यानंतर मुलगा हरवला. त्यानंतर तिने अंबड पोलिस ठाण्यात मिसिंगची तक्रार नोंदवली. दरम्यान बुधवारी त्या मुलाचा मृतदेह धनसावंगी येथील एका नाल्यात सापडला. त्याच्या तोंडात बोळा कोंबून त्याला ठार मारण्यात आले होते. पोलिसांच्या तपासात त्या महिलेचे वागणे संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी तिची कसून चौकशी केल्याने अनैतिक संबंधात अडथळा ठरलेल्या मुलाला आपणच प्रियकरच्या मदतीने ठार मारल्याचे तिने कबुल केले. त्यानंतर तिच्यासह तिचा प्रियकर नवनाथ जगढणे आणि त्याचा साथिदार गणेश रोकडे अशा तिघांना पोलिसांनी अटक केली.

पत्नीचा खून करून सांगितले कोरोनाने...

या देशात घेतले, पण कोरोनाच्या पडद्याआड, कोरोनाच्या नावे किती खून या देशात पडले असतील, याची गणतीच नाही...हे विधान करण्याचे कारण म्हणजे आंध्र प्रदेशात घडलेली ही सुटकेस मर्डर मिस्ट्री! दि. २५ मार्च ते ३१ मेपर्यंतचा कडकडीत कोरोना लाकडाऊनचा दाहक कालावधी अनुभवल्यानंतरचा अनलाक फेज वनचा तो कालखंड होता. दि. २३ जून २०२०चा तो दिवस आंध्र प्रदेशमधील तिरुपती शहरातील अलिपुरा पोलिसांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील असा दिवस ठरणार होता. घटनाच तशी विचित्र घडलेली होती! पोलीस ठाण्याचा फोन घणघणला तो एक पूर्ण जळालेला मानवी मृतदेह सापडल्याच्या घटनेची माहिती देणाऱ्या वर्दीने... अलिपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या सरकारी रुग्णालयात जाण्याचे पोलिसांच्या अलिकडच्या काळात जीवावर येत असे. कारण पंचक्रोशीतील कोविड रुग्ण या रुग्णालयात मोठ्या संख्येने आणले जात असत. रुग्ण मृत पावला की, पोलिसांना रुग्णालयातून फोन जात असे. नातेवाईकांच्या उद्रेकाला आळा घालण्यासाठी पोलिसांना तिथे जावे लागत असे. इतरही सोपस्कार असत. पण २३ जूनच्या दिवशी आलेला फोन हा रुग्णालयातून आलेला नव्हता तर रुग्णालय परिसरात घडलेल्या एका घटनेची वर्दी देण्यासाठी तो फोन आलेला होता. फोनवरून माहिती ऐकल्यावरच माहिती घेणारा फौजदार जागच्या जागी ताडकन् उडाला. मृतदेह सापडलाय तोही सुटकेसमध्ये आणि पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत !...माहिती देणाऱ्याला यापेक्षा अधिक काहीच सांगता येत नव्हते. त्यामुळे नक्की काय घडले आहे, याची माहिती घेण्यासाठी पोलिसांना तातडीने रुग्णालय परिसरात धाव घ्यावी लागली... सरकारी रुग्णालयाची ती मागील बाजू होती. तिथे थोडेसे जंगल होते व केरकचरा वगैरेचे साम्राज्य होते. तिथेच रस्त्यालगतच एक सुटकेस पूर्णपणे जळालेली पोलिसांना आढळून आली. सुटकेसमध्ये पूर्णपणे जळालेल्या स्थितीत एक मानवी मृतदेह होता. पण तो जवळपास शंभर टक्के जळालेला असल्यामुळे तो मृतदेह पुरुषाचा आहे की स्त्रीचा, हे समजायला मार्ग नव्हता. मृतदेहाचा कवटीकडील भाग साधारण ठीकठाक होता. तितकाच काय तो आशेचा धागा. तो भाग पोलिसांनी फारेन्सिक लबमध्ये तपासणीसाठी पाठवला आणि ते स्वस्थ झाले. कारण मृतदेहाची नीट माहिती मिळाल्याखेरीज पुढे जाता येणार नव्हते...तरीही पोलीस ठाण्यातील रेकार्ड तपासून पाहिले गेले व गेल्या महिन्याभरात मिसिंगची काही तक्रार आहे काय ते तपासून पाहण्यात आले. पण तशी तक्रार आढळून आली नाही... काही दिवस गेले. फारेन्सिक लबचा अहवाल हाती आला. सदर मृतदेह हा महिलेचा असून तिचे वय हे २५ ते ३० इतके असावे, असा अंदाज अहवालात व्यक्त करण्यात आला होता. चला, म्हणजे आता तपासाला दिशा मिळाली. अलिपुरा पोलिसांनी त्वरित जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांशी संपर्क साधून नमूद वयोगटातील कोणी तरुणी बेपत्ता आहे काय, याचा शोध घेण्यास सांगितले...चित्तूर जिल्ह्यातील एका पोलीस ठाण्यामधून फोन आला. होय, भुवनेश्वरी नावाची २७ वर्षे वयाची एक तरुणी गेले काही दिवस बेपत्ता आहे. ही तरुणी साफ्टवेअर इंजिनियर असून ती हैद्राबादला राहत होती व काही महिन्यांपूर्वी ती आपल्या पतीसोबत हैद्राबादहून तिरुपतीला रहायला आलेली होती. मात्र, गेले काही दिवस ती बेपत्ता होती व तशी तक्रार तिच्या आई-वडिलांनी पोलिसांत नोंदवलेली होती. तिच्या सासरच्यांनी किंवा पतीने तक्रार नोंदवलेली नव्हती हे विशेष! पोलिसांनी सदर महिलेची माहिती मागवली. तिचे नाव भुवनेश्वरी. ती साफ्टवेअर इंजिनियर होती व हैद्राबाद येथे एका बहुराष्ट्रीय कंपनीत ती कामाला होती. तिचा नवरा श्रीकांत रेड्डी हा देखील साफ्टवेअर इंजिनियर होता व तो देखील एका बड्या कंपनीत कामाला होता. पण त्याला कोरोना लाकडाऊनच्या निमित्ताने कंपनीने कामावरून कमी केले होते. दोघांनाही सध्या १८ महिन्यांची मुलगी होती आणि दोघेही पती-पत्नी हैद्राबादहून तिरुपतीला रहायला आले होते. वर्क फ्राम होम असल्यामुळे भुवनेश्वरीही हैद्राबादहून तिरूपतीला येण्यासाठी राजी झाली होती. तिरुपतीला त्यांनी एक खोली घेतली व ते तिथे राहू लागले होते. अलिपुरा पोलिसांनी तिचे छायाचित्रही मागवून घेतले. तिचा पत्ता घेतला आणि पोलिसांचे एक पथक ती तिरुपतीमध्ये सध्या रहात असलेल्या इमारतीत जाऊन थडकले. मात्र ती रहात असलेला फ्लट बंद होता. त्याला बाहेरून टाळे होते व पती श्रीकांत रेड्डी कुठे दिसत नव्हता. त्याचा मोबाईलही बंद आढळून आला. त्याला त्याच्या आफीसमध्ये शोधावे तर त्याला कोरोना लाकडाऊनमध्ये कंपनीने कामावरून काढून टाकलेले...त्यामुळे आता करायचे काय ? पोलिसांसमोर प्रश्न पडला. इतक्यात एकाचे डोके चालले. २३ जूनला मृतदेह सापडलाय तर आपण २२-२३ तारखांचे इमारतीचे सीसीटीव्ही फूटेज तपासले तर ?...सापडेल काहीतरी !... पोलिसांनी इमारतीचे सीसीटीव्ही फूटेज मागवून घेतले आणि ते तपासून पाहू लागले...अचानक त्यांना एका दृश्यात श्रीकांत रेड्डी दिसला. तो इमारतीच्या पसेजमध्ये टक्सी घेऊन आला होता. टक्सीच्या टपावरून तो भलीमोठी सुटकेस खाली उतरवतो आणि इमारतीच्या लिफ्टमध्ये शिरतो. दुसऱ्या एका फूटेजमध्ये श्रीकांत सुटकेस घेऊन आपल्या फ्लॅटमध्ये शिरताना दिसतो. हा काय प्रकार आहे ? पोलिसांचे विचारचक्र सुरू होते. ही तिच सुटकेस काय, जी पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत रुग्णालयाच्या पाठीमागे सापडलेली होती? पोलिस आता फूटेजमध्ये काळजीपूर्वक अजून काही सापडते का ते पाहू लागतात...अचानक त्यांना एका फूटेजमध्ये श्रीकांत फ्लटमधून बाहेर पडताना दिसून येतो. त्याच्या खांद्यावर १८ महिन्यांची तान्हुली असून तो दुसऱ्या हाताने सुटकेस ओढून घेऊन जाताना दिसून येतो. सुटकेस ओढताना त्याला मेहनत पडतेय, याचा अर्थ सुटकेस भरलेली आहे, हे समजून येते...म्हणजे सुटकेसमध्ये भुवनेश्वरीचा मृतदेह असावा! कारण भुवनेश्वरी कुठेच दिसून येत नाहीये... पुढच्या फुटेजमध्ये श्रीकांत सुटकेस लिफ्टने खाली घेऊन येताना दिसतो. खाली टक्सी उभीच आहे. मघाशी या टक्सीनेच श्रीकांत आलेला होता. तो टक्सीवाल्याशी काहीतरी बोलतो आणि टक्सीचालक अवजड सुटकेस श्रीकांतला टक्सीवर चढवायला मदत करतो... नंतर ते टक्सीत बसून तिथून निघून जातात. आता एक गोष्ट निश्चित झालेली व ती म्हणजे श्रीकांतनेच पत्नी भुवनेश्वरीचा काटा काढलेला आहे... पण श्रीकांतने असे का करावे? नक्की दोघांत काय घडले होते ? पोलीस आता टक्सीचालकावर आपले लक्ष केंद्रित करतात. सीसीटीव्ही फूटेजमध्ये टक्सीची नंबरप्लेट व टक्सीचालकाचा चेहरा दिसून आलेला होता...थोड्या प्रयत्नांनंतर टक्सी मिळते. टक्सीचालकही मिळतो. पोलीस त्याला ताब्यात घेतात व बोलते करतात. तो माहिती देतो. होय, श्रीकांतनेच सुटकेसमध्ये भुवनेश्वरीचा मृतदेह ठेवलेला होता व तो रुग्णालयामागील जंगलात जाळला. या कामात टक्सीचालकाने श्रीकांतला मदत केली. कारण श्रीकांतने त्याला भलीमोठी रक्कम देऊ केलेली होती! शिवाय, भुवनेश्वरी कोरोना डेल्टा वेरियंट प्लसच्या बाधेने मृत पावलेली होती...कोरोना डेड बाडी श्रीकांतने जाळली, तर त्यात बिघडले कुठे, हा टक्सीचालकाचा सवाल होता. पोलिसांनी सरकारी रुग्णालयात चौकशी केली. भुवनेश्वरी नावाची कोणतीही युवती तिथे कधीच दाखल नव्हती...भुवनेश्वरीच्या आई-वडिलांशी पोलिसांनी संपर्क साधला. होय, भुवनेश्वरीला कोरोना डेल्टा वेरियंटची बाधा झाल्याचा श्रीकांतचा त्यांना फोन आला होता. पण भुवनेश्वरी त्याच दिवशी मरण पावल्याने सरकारी रुग्णालय कर्मचाऱ्यांनी ताबडतोब मृतदेहाची विल्हेवाट लावली. फक्त श्रीकांतशिवाय कोणालाही अंत्यसंस्कारास उपस्थित राहण्याची परवानगी नव्हती... पण आई-वडिलांचा श्रीकांतच्या या बतावणीवर अजिबात विश्वास बसलेला नव्हता. श्रीकांत काहीतरी लपवतोय असे त्यांना मनापासून वाटत होते. त्यासाठीच त्यांनी भुवनेश्वरी बेपत्ता झाल्याची पोलिस फिर्याद दाखल केलेली होती. आता पोलिसांनी श्रीकांतवर लक्ष केंद्रित केले. त्याचा मोबाईल बंद असल्यामुळे तो कुठे लपून बसलेला आहे ते समजत नव्हते. त्यामुळे श्रीकांत कधी आपला मोबाईल चालू करतो, याकडे पोलिसांचे लक्ष लागले होते. दोन-तीन दिवस गेले आणि श्रीकांतने फोन चालू केला, मात्र त्याचे ठिकाण पोलिसांना सापडले व त्यांनी त्या ठिकाणी जाऊन श्रीकांतला उचलले. भुवनेश्वरी आणि श्रीकांत हे दोघेही साफ्टवेअर इंजिनियर. दोघेही बहुराष्ट्रीय कंपनीत कामाला होते. तरुण होते. चांगला पगार होता. ओळख झाली आणि ओळखीचे रुपांतर आधी मैत्रीत व नंतर प्रेमात झाले. काही दिवस एकमेकांच्या आवडी-निवडी ओळखण्यात गेल्यावर त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला. अर्थातच आल इज वेल असल्यामुळे घरच्यांचाही या लग्नास विरोध असण्याचे काही कारण नव्हते. तीन वर्षापूर्वी लग्न झाले आणि १८ महिन्यांपूर्वी त्यांना मुलगी झाली. सगळं काही सुरळीत सुरू असताना अचानक कोविड काळ आला आणि लाकडाऊन लागले. या लाकडाऊनमध्ये कंपनीने श्रीकांतला कामावरून कमी केले. पण भुवनेश्वरीची नोकरी कायम होती. तिरुपतीला येताच श्रीकांतने व्हाट्स अपवर एक भ्रष्टाचारविरोधी मंच स्थापन केला. काही तरुण त्याच्यासोबत जोडले गेले. या मंचाने मग एक उद्योग सुरू केला व तो म्हणजे भ्रष्टाचार करणाऱ्या बड्या सरकारी नोकरांना भ्रष्टाचाराचे आनलाईन पुरावे पाठवून पकडून देण्याची धमकी देत पैसे उकळणे. सरकारी अधिकारी घाबरून या मंचाला पैसे देऊ लागले. घरबसल्या श्रीकांतने हा उद्योग सुरू केलेला पाहून भुवनेश्वरीचे पित्त खवळले. तिने श्रीकांतला हे उद्योग थांबविण्यास सांगितले. पण चांगला पैसा येत असल्यामुळे श्रीकांतने त्याकडे दुर्लक्ष केले. त्याचा उद्योग सुरूच राहिला व भुवनेश्वरीशी त्याचे रोजच वाजू लागले. २३ जूनच्या त्या दिवशी दोघांमधील वाद विकोपाला गेला व श्रीकांतने रागाच्या भरात भुवनेश्वरीला जबर मारहाण केली. भुवनेश्वरी बेशुद्ध पडली. श्रीकांतने तिचा गळा आवळला व तिला ठार केले. हा सर्व प्रकार १८ वर्षाच्या तान्हुलीसमोरच घडत होता. भुवनेश्वरी ठार झाल्यावर श्रीकांत शांत झाला. पण आता मृतदेहाचे काय करायचे? विल्हेवाट कशी लावायची ? जगापासून हे पाप कसे लपवायचे आणि जगाला सांगायचे काय? श्रीकांत विचार करू लागला. इंजिनियर असल्यामुळे त्याचे डोके चांगले चालू लागले. सध्या कोरोना काळ आहे.

माणसे कोरोनाने मरत आहेत. त्यांच्या मृतदेहाची परस्पर सरकारी मार्गाने विल्हेवाट लावली जात आहे. कोणालाही अंत्यसंस्काराला जाण्याची मुभा नाही... कोणीही काहीही विचारणारे नाही. कोणालाही काहीही शंका येणार नाही झाले! ठरले. श्रीकांतने भुवनेश्वरीही कोरोना डेल्टा वेरियंटने तडकाफडकी मरण पावल्याची बतावणी केली. तिच्या पालकांना तसे कळवले व सरकारी रुग्णालयात ती मृत पावल्याची खात्री पटावी यासाठी त्याने सरकारी रुग्णालयात जाऊन रेकी केली. तेथील सावळागोंधळ डोळ्यांनी टिपला व तो मालमध्ये गेला. तिथे त्याने भलीमोठी सुटकेस विकत घेतली व ती घेऊन त्याने टक्सीने इमारत गाठली... पुढे मृतदेह सुटकेसमध्ये ठासून भरून त्याने सरकारी रुग्णालयामागील जंगल गाठले. तिथे त्याने टक्सीचालकाला विश्वासात घेतले. भुवनेश्वरीचा मृत्यू कोरोनाने झालाय असे वाटल्यामुळे व खूप पैसे मिळाल्यामुळे टक्सीचालक कटात सहभागी झाला. त्यानेच सुटकेसवर पेट्रोल ओतले व ती पेटवून दिली. सुटकेस पूर्णपणे जळेपर्यंत टक्सीचालक तिथे थांबलेला होता. पोलिसांनी भुवनेश्वरीच्या हत्येप्रकरणी श्रीकांत व टक्सीचालक या दोघांना अटक केली. श्रीकांतच्या फ्लॅटची फारेन्सिक तपासणी केली गेली. तिथे काही दुवे मिळाले. केस बळकट झाली. श्रीकांतचा लपटाप ताब्यात घेण्यात आला. त्यात भ्रष्ट अधिकाऱ्यांना अडकवणारे पुरावे सापडले. ते ताब्यात घेण्यात आले. श्रीकांतच्या बँक खात्यात नोकरी गेल्यावरही आलेल्या मोठमोठ्या रकमांचा उलगडा झाला...इमानदार, वफादार भुवनेश्वरी हकनाक बळी गेली. तिच्या मृत्यू व मृतदेहाच्या विल्हेवाटीला एक अबोध साक्षीदार होती व ती म्हणजे तिची १८ महिन्यांची अबोध मुलगी!

ज्याने घेतली सुपारी त्याला हाताशी...

मजल्यावर एक गाळा घेतला. सन २०१२ मधे घेतलेल्या त्या गाळ्यात त्याने आईस्क्रीम पॉर्लरचा व्यवसाय सुरु केला. सलग आठ वर्ष कैलासने आईस्क्रिमचा विक्रीचा व्यवसाय यशस्वीपणे चालवला. अजुन काहीतरी नविन करायचे आणि चांगले उत्पन्न मिळवायचे या लक्ष्मीप्राप्तीच्या विचाराने कैलास झपाटला होता. कैलासने केबल नेटवर्कच्या व्यवसायात पदार्पन करण्याचा विचार केला. प्रत्येक मनुष्याला चांगल्या प्रकारे व चांगल्या प्रमाणात धन कमावण्याची, नाव कमावण्याची संधी जिवनात अवश्य मिळत असते. तशी संधी कैलासला आईस्क्रिमच्या व्यवसायातून मिळाली होती. चालू स्थितीत असलेला आईस्क्रिमचा व्यवसाय बंद करुन केबलचा व्यवसाय सुरु करण्याचे कैलासने मनाशी ठरवले. त्यानुसार आईस्क्रीमचा व्यवसाय सुरु असलेल्या गाळ्यातच त्याने दोन वर्षापुर्वी केबल व्यवसायाला लागणारी मशिनरी आणली. अमळनेर शहरात केबल ग्राहकांचे जाळे तयार केले. केबल कनेक्शन देण्यासाठी त्याने रोजंदारीने मजुर लावले. प्रचंड जिद्द असलेल्या कैलासने केबलच्या व्यवसायात देखील जोमाने सुरुवात केली. सन २०२० मधे सुरु केलेल्या केबलच्या व्यवसायात कैलासने अनेक अडचणींचा सामना केला. सुमारे ३५ लाख रुपयांचे भांडवल त्यात अडकून पडले. केबलच्या व्यवसायात कैलासला नंतर मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागले. कधी मजुरांचा तर कधी मटेरियलचा प्रश्न सोडवण्यात कैलास गुंतला होता. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रतिस्पर्धी व्यावसायिकांच्या तुलनेत ग्राहकांना चांगली सेवा देण्याकामी कैलासला रात्रंदिवस मेहनत घेण्याची वेळ आली. त्या तुलनेत पुर्वीचा आइस्क्रिम विक्रीचा व्यवसाय सुखकर होता. केबल नेटवर्कच्या व्यवसायातील नुकसान भरुन काढण्यासाठी कैलासने खुप विचाराअंती त्याच्या नावे असलेल्या जमीनीचे काही प्लॉट विक्री काढले. प्लॉट विकल्यानंतर आलेल्या रकमेतून कैलासने तोट्याचे खड्डे भरुन काढले. अमळनेर शहरातील जुना पारधी वाडा भागात प्रकाश दत्तात्रय चौधरी हा तरुण रहात होता. त्याच्या अंगी देखील व्यवसाय करण्याची जिद्द होती. एके दिवशी त्याने कैलासची भेट घेतली. केबल नेटवर्क व्यवसायात सामील करुन घेण्यासाठी त्याने कैलासला गळ घातली. आपण रहात असलेल्या परिसरात केबल कनेक्शन ग्राहकांचे जाळे तयार करण्याची व त्या माध्यमातून पैसे कमावण्याची तयारी प्रकाशने कैलासला दाखवली. प्रकाश रहात असलेल्या परिसरासाठी त्याला केबल नेटवर्कचे काम देण्याची सहमती कैलासने दर्शवली. मात्र त्यापोटी कैलासने त्याच्याकडून एक लाख रुपये घेतले. प्रकाशने देखील कैलासला एक लाख रुपये दिले. काही दिवसांनी कैलासच्या असे लक्षात आले की प्रकाश रहात असलेल्या भागातून सुरत -भुसावळ रेल्वे लाईन गेली आहे. त्यामुळे त्या भागात केबलची वायर टाकणे शक्य होणार नसल्याचे कैलासच्या लक्षात आले. केबलच्या ग्राहकांचा विस्तार करण्याचे काम प्रकाशला देणे शक्य नसल्यामुळे कैलासने त्याचे एक लाख रुपये आठ महिन्यांनी परत केले. आठ महिने आपले एक लाख रुपये वापरल्यामुळे त्याचे प्रतिमहिना पाच हजार रुपये याप्रमाणे व्याज मिळण्यासाठी प्रकाशने कैलासकडे तगादा सुरु केला. प्रकाशचा तगादा सुरु असतांनाच त्याला ग्राहकांच्या सतत तक्रारी येऊ लागल्या. टिव्हीवर प्रक्षेपण निट दिसत नसल्याच्या वा दिसतच नसल्याच्या त्या तक्रारी होत्या. आपण चांगल्या प्रतीची वायर टाकून देखील ग्राहकांच्या तक्रारी का येतात? याची शहानिशा करण्यासाठी कैलास स्वत: संबंधीत ग्राहकांकडे व त्या परिसरात जाऊन पाहणी करु लागला. त्यावेळी त्याच्या असे लक्षात आले की आपली केबलची वायर कुणीतरी वारंवार कापून टाकत आहे. त्यामुळे नाईलाजाने कैलासला ती महागडी वायर मजुरांच्या मदतीने बदलावी लागत होती. काही दिवसांनी विविध भागातील ग्राहकांच्या तक्रारींचा जणू काही पुरच आला. प्रत्येक ठिकाणी केबल वायर कुणीतरी कटरने कापून ठेवल्याचे दृश्य त्याला दिसत होते. त्यामुळे अगोदरच तोट्यात असलेला कैलास मटेरियल आणि लेबर चार्जेस वाढल्यामुळे हैरान झाला. ग्राहकाकडून मिळणारे ठरावीक उत्पन्न आणि वारंवार तुटलेल्या केबलची जोडणी करण्याचा नव्याने उद्भवलेला खर्च याचा ताळमेळ बसवणे त्याला कठीण झाले होते. हे कटकारस्थान कोण करतो याचा तपास लावण्याचे त्याने मनाशी ठरवले. त्याने लावलेल्या तपासात त्याला आपलाच एक प्रतिस्पर्धी आणि त्याच्या जोडीला प्रकाश चौधरी असे दोघे जण आढळून आले. एका प्रतिस्पर्धी व्यावसायीकाच्या सांगण्यावरुन प्रकाश चौधरी हे काम करत असल्याचे कैलासच्या लक्षात आले. त्या प्रतिस्पर्धी व्यावसायीकाचा प्रकाश चौधरी हा लाभार्थी असल्याचे कैलासच्या लक्षात आले. ज्या भागात कैलासने केबल कनेक्शन दिले आले आहे त्या भागातील वायर कापल्यास लोक वैतागून त्याचे कनेक्शन बंद करतील व आपले कनेक्शन घेतील असा प्रतिस्पर्धी व्यावसायीकाचा त्यामागे हेतू होता. केबल वायर तोडल्यानंतर त्या प्रतिस्पर्धी व्यावसायीकाने प्रकाश चौधरी यास पाच हजार रुपये देण्याचे कबुल केल्याचे म्हटले जाते. अशा प्रकारे त्या प्रतिस्पर्धी व्यावसायीकासह प्रकाश चौधरी अशा दोघांचा फायदा होत असे. प्रकाशचा कैलाससोबत व्यवहाराचा वाद सुरु होता. त्यामुळे त्या वादाचा गैरफायदा प्रतिस्पर्धी केबल व्यावसायीकाने प्रकाशच्या माध्यमातून घेण्याचे ठरवले होते असे म्हटले जाते. हा सर्व प्रकार कैलासला समजला होता. अगोदरच कर्जाच्या ओझ्यामुळे दबलेला कैलास या नुकसानीमुळे मेताकुटीला आला होता. त्याच्या मनात अधूनमधून आत्महत्येचे विचार येत होते. मात्र तो अधुनमधून शांत डोक्याने विचार करत तो विचार परतवून लावत होता. आपली केबल वायर तोडणा-या प्रकाशच्या मुखातून खरा प्रकार ऐकून घेण्याचे कैलासने ठरवले. त्यासाठी त्याने व्युहरचना सुरु केली. मनातून प्रकाशवर चिडलेला कैलास तो समोर आला तरी त्याच्यासमोर राग व्यक्त करत नव्हता. मनात राग असला तरी आता प्रकाश समोर आल्यावर कैलास त्याचे हसतमुखाने स्वागत करु लागला. कैलासने आता प्रकाशसोबत जवळीक वाढवली. तो गोड बोलून त्याला सोबत फिरायला घेऊन जाऊ लागला. प्रकाशसोबत त्याच्या परिसरातील एक मुलगा नेहमी सोबत रहात होता. त्या मुलाला देखील प्रकाश प्रमाणे कैलास सोबत घेऊ लागला. हॉटेलमधे कैलास व त्याच्यासोबत राहणा-या मुलाची खानपान व्यवस्था कैलास करु लागला. २४ ऑगस्ट रोजी कैलास त्या दोघांना धरणगाव येथे घेऊन गेला. सायंकाळी तिघांनी सोबतच जेवण व मद्यप्राशन केले. त्यावेळी मद्याच्य नशेत प्रकाश व त्याच्यासोबतच्या मुलामधे आपसात भांडण झाले. त्या भांडणाचे कारण कैलासने त्या मुलाला शिताफीने हळूच विचारले असता त्याला धक्काच बसला. त्या मुलाने कैलासला सांगितले की तुझ्या केबलच्या वायरी कापण्यासाठी प्रकाश मला पैसे देऊन पाठवत होता. त्या मुलाकडून सर्व ऐकून घेतल्यानंतर देखील कैलास गप्प बसला. त्यानंतर तिघे आपापल्या घरी परत आले. दुसऱ्या दिवशी २५ ऑगस्ट रोजी कैलासने प्रकाशला सोबत घेत चोपडा गाठले. सोबत मद्याचा बंपर पॅक देखील कैलासने प्रकाशसाठी विकत घेतला. चोपडा येथे गेल्यावर कैलासच्या पैशावर प्रकाशने त्याचे काही विशीष्ट शौक देखील पुर्ण केले. काय हवे - नको त्याची कैलासने प्रकाशला विचारणा केली. त्यानंतर रात्री नऊ वाजेच्या सुमारास दोघे जण एका हॉटेलमधे मद्यप्राशन करण्यास बसले. यावेळी कैलासकडे एक धारदार कटर होते. त्या कटरने प्रकाशला जिवानिशी ठार करण्याचा विचार कैलासच्या मनात चमकला. तसा प्रयत्न देखील त्याने करुन पाहीला. मात्र कैलासची हिंमत झाली नाही. त्यामुळे तो या कृत्यापासून माघारी परतला. त्यानंतर अमळनेर येथील हाशीमजी प्रेमजी या व्यापारी संकुलात असलेल्या कैलासच्या दुकानावर दोघे आले. त्या ठिकाणी पुन्हा दोघांनी मद्यप्राशन केले. त्यानंतर दोघे आपापल्या घरी परतले. २६ ऑगस्ट रोजी प्रकाशचा कायमचा काटा काढण्याचे कैलासने मनोमन ठरवले. त्याने तशी मनाची तयारी देखील केली. त्यासाठी कैलासने सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास एका जनरल स्टोर्समधून किचनमधे वापरला जाणारा एक धारदार चाकू विकत घेतला. आज प्रकाशला या जगातून कायमचे हद्दपार करण्याचे कैलासने मनाशी पक्के ठरवले होते. त्यानुसार त्याने नियोजन केले. सायंकाळी कैलासने प्रकाशला मद्याच्या नशेत धुंद करण्यासाठी एक लिटर मद्याचा बंपर पॅक विकत घेतला. ठरल्यानुसार सायंकाळी नियोजीत हॉटेलवर दोघे एकत्र आले. तेथे दोघांनी मद्यप्राशन केल्यानंतर दोघे पुन्हा अमळनेर येथील कैलासच्या दुकानावर परत आले. प्रकाश मद्याच्या धुंदीत असतांना कैलासने त्याच्याकडे केबल वायर कापण्याचा मुळ विषय बाहेर काढला. त्यावेळी प्रकाश कबुल झाला व खरे बोलू लागला. त्याने कबुल केले की त्याच्या केबल कनेक्शनच्या वायरी कापण्यासाठी त्याला प्रतिस्पर्धी केबल ऑपरेटरकडून पैसे मिळत होते. केबलच्या वायरी प्रकाश कापत असल्याचे स्पष्ट झाले होते. त्याने कैलासकडे तशी कबुली देखील दिली होती. त्यामुळे आतापर्यंत शांत असलेला व त्याच्यावर मद्यपानाससह जेवणासाठी पैसे उधळणारा कैलास जाम भडकला. त्यावेळी रात्रीचे साडे अकरा वाजले होते. रात्र बरीच झालेली असल्यामुळे परिसरातील सर्व दुकाने बंद झाली होती. दुकान बंद करुन कैलाससह प्रकाश बाहेर व्हरांड्यात आला. त्यावेळी दोघात केबलच्या वायरी कापण्यावरुन पुन्हा वाद सुरु झाला. तो वाद कैलासने सुरु केला होता. कैलासने त्याचवेळी त्याच्याजवळ असलेला धारदार चाकू बाहेर काढला. कैलासने चाकूचा वार प्रकाशवर केला. वार चुकवण्यासाठी प्रकाश खाली वाकला. खाली वाकताच तो चाकू प्रकाशच्या गळ्याला लागला. चाकू गळ्याला लागताच प्रकाश खाली कोसळला. खाली कोसळलेल्या प्रकाशच्या मानेवर कैलासने दोन वेळा वार केले. गळ्यावर धारदार चाकूचे वार बसल्यामुळे प्रकाश तेथेच ठार झाला. प्रकाश ठार झाल्याचे दिसताच कैलासने त्याचा मोबाईल काढून घेतला. तो मोबाईल व रक्ताने माखलेला चाकू अशा दोन्ही वस्तू कैलासने दुकानातील टेबलच्या ड्रावरमधे ठेवून दिल्या. त्यानंतर कैलास आपल्या घरी परतला. दुसऱ्या दिवशी २७ ऑगस्ट रोजी कैलास सकाळी लवकर उठला. भल्या पहाटे लवकर उठून त्याने अंघोळ आटोपली. रक्ताने भरलेला शर्ट त्याने पटापट धुऊन काढला. कुणाला काही न सांगता कुणाशी फार काही न बोलता त्याने चोपडा तालुक्यातील विरवाडे येथे सासरवाडी गाठली. दरम्यान सकाळी प्रकाश चौधरीचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह परिसरातील लोकांच्या नजरेस पडला. घटनास्थळी गर्दी जमण्यास वेळ लागला नाही. या घटनेची वार्ता अमळनेर शहरात वा-यासारखी पसरली. अमळनेर पोलिस स्टेशनला या घटनेची माहिती मिळताच पो.नि. जयपाल हिरे यांच्यासह स.पो.नि. राकेशसिंग परदेशी, अंमलदार सुनिल हटकर, हे.कॉ. किशोर पाटील, प्रमोद पाटील, पोलिस नाईक मिलींद ब्राम्हणे आदींनी घटनास्थळ गाठले. मयत प्रकाश याचे वडील दत्तात्रय चौधरी यांना या घटनेची माहिती मिळताच ते देखील घटनास्थळी हजर झाले. आपल्या मुलाचा मृतदेह बघून त्यांनी हंबरडा फोडला. आपल्या मुलाचा व केबलचा व्यवसाय करणारा कैलास शिंगाणे यांच्यात गेल्या कित्येक दिवसांपासून व्यवहाराचा वाद असल्याचे त्यांना माहिती होते. घटनास्थळ देखील कैलासच्या दुकानाजवळचे असल्यामुळे त्या वादाची किनार या हत्येला असावी असा संशय त्यांनी पोलिसांकडे व्यक्त केला. दत्तात्रय चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अमळनेर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ३६१/२१ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल करण्यात आला. पोलिस पथकाने घटनास्थळासह मृतदेहाचा पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदकामी रुग्णालयात नेण्यात आला. मृतदेहाची ओळख पटलेली होती. घटनास्थळ असलेल्या संकुल परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यात संशयित कैलाश शिंगाणे हा मयत प्रकाश चौधरी याच्यासोबत असल्याचे आढळून आले. त्यामुळे कैलाश शिंगाणे याच्यावर पोलिसांचा संशय अजूनच बळावला. खबऱ्यामार्फत तपास केला असता संशयित कैलास शिंगाणे हा चोपड्याच्या दिशेने गेला असल्याची माहिती पोलिसांना समजली. स.पो.नि. राकेशसिंग परदेशी यांनी आपले कौशल्य वापरत संशयित कैलास शिंगाणे याचे घर गाठून त्याच्या पत्नीला चौकशीकामी ताब्यात घेतले. कैलास शिंगाणे याच्या पत्नीच्या माध्यमातून त्याच्याशी फोनवर संपर्क साधण्यात आला. त्याच्या पत्नीने त्याला फोन लावत तो कुठे आहे याची माहिती घेतली. पत्नीचा फोन असल्यामुळे साहजीकच कैलासने तो फोन उचलला. पत्नीने विचारलेल्या माहितीनुसार त्याने आपण चोपडा येथे असल्याचे सांगीतले. संशयीत कैलास शिंगाणे चोपडा येथे असल्याचे समजताच पोलिस पथकाने विनाविलंब चोपडा गाठले. संशयित शिंगाणे यास पोलिस आपल्या मागावर असल्याचा संशय आला. त्यामुळे तो तेथून पसार होण्याच्या बेतात असतांनाच पोलि

20 TO 26 SEPTEMBER 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 18/09/2021 7:57 PM Page 1

निर्यातक्षम कांदा उत्पादनासाठी तंत्रज्ञानाची कास धरा -डॉ.श्रीधर देसले

एरंडोल तालुक्यातील खर्ची बु.ला निर्यातक्षम कांदा लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण वर्ग संपन्न

जळगाव/प्रतिनिधी

कांदा पीक कमी कालावधीत समाधानकारक उत्पादन देणारे पीक असून त्यासाठी शेतकऱ्यांनी नवतंत्रज्ञानाची कास धरून कांद्याचे उत्पादन घ्यावे, असे आवाहन राहूरी महात्मा फुले कृषि विद्यापिठातील उद्यानविद्यामधील सहयोगी प्राध्यापक डॉ. श्रीधर देसले यांनी केले.

एरंडोल तालुक्यातील खर्ची बु. येथे तालुकास्तरीय कौशल्य विकास व आत्मा योजनेअंतर्गत निर्यातक्षम कांदा लागवड प्रशिक्षण वर्ग आयोजीत करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर तालुका कृषि अधिकारी शरद बोरसे, ज्येष्ठ नागरिक उत्तम माळी, प्रगतिशिल शेतकरी अजित पाटील उपस्थितीत होते. या प्रशिक्षण वर्गामध्ये आत्मा गटाचे सदस्य तसेच खर्ची, रवंजे, खडके आदी गावांमधील १०५ कांदा उत्पादक शेतकरी उपस्थीत होते. खर्ची परिसरातील प्रमुख पीक कांदा मानले जाते. परिसरात मोठ्या प्रमाणात कांदा लागवड केला जातो. ज्यातुन फायदा तर होतो पण काही किरकोळ चुकांमुळे नुकसानही होत असते. अनावश्यक औषधांची फवारणी त्यामुळे वाढलेला खर्च, कीड नियंत्रणासाठी विशेष प्रयत्न करता यावे, यासह निर्यातक्षम कांदा उत्पादनासाठी तंत्रज्ञानासह योग्य मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने एरंडोल कृषी विभागाच्या माध्यमातुन खर्ची बु येथे कांदा लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण आयोजित केले होते. प्रशिक्षण वर्गासाठी राहुरी कृषी विद्यापिठाचे डॉ. श्रीधर देसले प्रमुख मार्गदर्शक होते. डॉ. श्रीधर देसले यांनी बिज प्रक्रीया पासून ते रोप लागवड करण्याची शास्त्रशुद्ध पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. बाजारातील सद्यस्थिती, भविष्यातील कांद्याचे दर आणि कांदा साठवून ठेवण्याचा कालावधी याचा ताळमेळ कसा साधावा यावर त्यांनी विशेष भर दिला. जैवीक खतांचा वापर करून कमी खर्चात पोषक आणी निरोगी पिक कसे घेता येईल यावर भर देण्याचे मार्गदर्शन डॉ. श्रीधर देसले यांनी केले. कांदा उत्पादन वाढीसाठी परागीभवन ही प्रक्रीया महत्त्वाची असून त्यासाठी मधुमक्षिका पालन केले पाहिजे असेही ते म्हणाले. तालुका कृषि अधिकारी शरद बोरसे यांनी ईपिक पाहणीद्वारे शेतातील पिक पेरणीबाबत मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण वर्गाच्या शेवटी प्रश्नोत्तरे झालीत यात शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तरे दिली गेली. प्रशिक्षण वर्गास सहभागी शेतकऱ्यांचे महाराष्ट्र शासनाचे सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. आत्माचे भूषण वाघ यांनी सूत्रसंचालन केले. एरंडोल कासोदा मंडळ कृषि अधिकारी साळुंखे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी गांधी रिसर्च फाऊंडेशनचे प्रशांत सुर्यवंशी, चंद्रकांत जगताप, अतुल पाटिल, कृषी क्षेत्रीय अधिकारी यांनी सहकार्य केले.

अंबाडीत पुरेशी जागा नसल्यामुळे वज्रेश्वरीत ग्रामीण रुग्णालय सुरु करावे -कपिल पाटील

भिवंडी/आकाश गायकवाड

राज्य सरकारने अंबाडी येथे मंजूर केलेल्या ग्रामीण रुग्णालयासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्यामुळे वज्रेश्वरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मंजूर रुग्णालय सुरू करावे, अशी सुचना केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी राज्य सरकारला केली आहे. त्याचबरोबर ग्रामीण रुग्णालयासाठी अंबाडी परिसरात जागा लवकरात लवकर निश्चित करावी, अशी सुचनाही राज्यमंत्र्यांनी केली आहे. राज्य सरकारने तत्कालीन आमदार दिवंगत विष्णू सवरा यांच्या मागणीनंतर २००६-०७ मध्ये भिवंडी तालुक्यातील अंबाडी परिसरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन १०० बेडचे ग्रामीण रुग्णालय मंजूर केले होते. मात्र, या रुग्णालयासाठी अंबाडी परिसरात पुरेशी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे भाड्याच्या जागेत रुग्णालय सुरूच झाले. या ठिकाणी सध्या केवळ ओपीडी चालविली जाते. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना तातडीच्या उपचारासाठी ठाणे वा भिवंडी शहरात जावे लागते. या पार्श्वभूमीवर अंबाडी येथे मंजूर केलेले रुग्णालय तात्पुरते वज्रेश्वरी येथील सध्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात सुरू करावे, अशी मागणी पंचायत समितीच्या माजी सभापती रविना रविंद्र जाधव यांनी केंद्रीय पंचायत राज राज्य मंत्री कपिल पाटील यांच्याकडे केली होती. या भागातील ग्रामस्थांची सोय लक्षात घेऊन अंबाडी येथील ग्रामीण रुग्णालय वज्रेश्वरीत सुरू करावे, अशी सुचना राज्यमंत्री कपिल पाटील यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब दांगडे व जिल्हा शल्य चिकित्सक कैलास पवार यांना केली आहे. त्याचबरोबर जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांना लवकरात लवकर जागा निश्चित करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

ठाणे आरटीओने बुडविला करोडोंचा महसूल

भिवंडी/आकाश गायकवाड

ठाणे प्रादेशिक परिवहन विभागात रविंद्र किसन गायकवाड नामक प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणून नियुक्त झाल्यापासून भ्रष्टाचार, गैरव्यवहार व अकार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढीस लागली असून परिवहन वाहनांना परवाने देणे, रिक्षा टॅक्सींना परवाने देणे, पर्यावरण कराची वसुली करणे, रस्ता सुरक्षा टॅक्स वसूल करणे, लांबलचक सामानाची तथा अवजड सामानाची वाहतूक करणाऱ्या वाहनांना ओ.डी.सी. परवाने देणेची कामे प्राधान्याने परिवहन विभागातून होणे आवश्यक आहे. परंतु ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने परिवहन आयुक्तांचे आदेश धाब्यावर बसवून ओ.डी.सी. परवाने न दिल्याची बाब राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी केंद्रीय माहितीच्या अधिकार कायद्याखाली उघड केली असून ओ.डी.सी. परवाने न दिल्यामुळे शासनाची करोडो रुपयांची महसूल हानी झाल्याच्या प्रकरणात ठाणे परिवहन विभागाचे प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र गायकवाड व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांची चौकशी करून त्यांच्यावर सक्त कारवाई करण्याची मागणी शरद धुमाळ यांनी एका लेखी निवेदनाद्वारे परिवहन विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे केली आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, लांबलचक तथा अवजड मालाची किंवा साहित्याची वाहतूक करणेसाठी वापरल्या जाणाऱ्या अवजड वाहनांना ओ.डी.सी. परवाने देणे शासन निर्णयानुसार बंधनकारक असून महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालये व सर्व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांनी ओ.डी.सी. परवाने देऊन शासनाच्या महसुलात भरीव वाढ करणे आवश्यक आहे. असे असताना ठाणे परिवहन विभागात प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र किसन गायकवाड व त्यांचे सहकारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांनी ओ.डी.सीचे परवाने न दिल्यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल या जोडगोळीने बुडविला असून शासनाच्या महसुलाचे प्रचंड नुकसान करणारे रवींद्र गायकवाड व जयंत पाटील यांच्यावर शासनातर्फे नेमकी कोणती कारवाई केली जाते याकडे सुजाण नागरिकांचे लक्ष लागले आहे.

देवणी तालुका सरपंच संघटना अध्यक्षपदी सदाशिव पाटील याची बिनविरोध निवड!

देवणी/प्रतिनिधी

देवणी तालुका सरपंच संघटना अध्यक्ष म्हणून तळेगाव भो येथील सरपंच सदाशिव रामचंद्रराव पाटील यांची दिनांक १४ सप्टेंबर २०२१रोजी पंचायत समिती कार्यालय देवणी येथील सभागृहात सर्व देवणी तालुक्यातील सरपंचाची बैठक कवठाळचे सरपंच शंकरराव हुडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत सरपंच संघटनेच्या अध्यक्षाची सर्वानुमते निवड करण्यात आली. या नुतन निवडीत देवणी तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष म्हणून तळेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशिवराव रामचंद्र पाटील तळेगावकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष म्हणून जवळगा सरपंच हनुमंत शिवराज बिरादार यांची निवड करण्यात आली. दुसरे उपाध्यक्ष म्हणून गौंडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री शिवाजी बिरादार यांची निवड करण्यात आली. संघटनेचे सचिव म्हणून संदीप प्रल्हाद पेटे तर सदस्य म्हणून भोपणी ग्रामपंचायत सरपंच लक्ष्मण हनुमंतराव डोपेवाड, अंबानगर ग्रामपंचायत सरपंच कल्पना अनिल रोटे, वलांडी, राणीताई राम भंडारे, लासोना ग्रामपंचायत, धनराज शिवराज मठपती, गुरनाळ ग्रामपंचायत अरूणाबाई उमाकांत बर्गे, कवठाळा ग्रामपंचायत शंकर हनुमंतराव हुडे यांची संघटना कार्यकारणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. सर्व सरपंचाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष व सर्व कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला.

नांदेड जिल्ह्यात ६० लाखांचा गुटखा पकडला; आंध्र प्रदेशातून होते आवक

नांदेड/नरेन भारती

महाराष्ट्र राज्यात गुटखा बंदी असताना बेकायदेशीरपणे नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर मध्ये राजरोसपणे गुटख्याची वाहतूक सुरू असल्यास उघडकीस आले आहे.यापूर्वीही या तालुक्यात असाच लाखोचा गुटखा पकडण्यात आला होता पण हा अवैध व्यापार बंद करण्यात पोलीस व अन्न व औषध विभाग सपशेल अपयशी ठरला आहे. भोकर चे पोलीस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल कांबळे यांनी बेकायदा गुटखा वाहतूक करणाऱ्या एका कंटेनरला ताब्यात घेऊन कारवाई केली. या कारवाईत तब्बल साठ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी दोन व्यक्तीवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. महाराष्ट्रात गुटखा बंदी असताना आंध्र प्रदेशातून आदिलाबाद निजामाबाद यामार्गे राजरोसपणे हा गुटका रेल्वे, टेम्पो, मोटारसायकली या माध्यमातून आयात केला जातो. रात्री उशिरा आन्ध्रापादेशातून अदिलाबाद व निजामाबाद, धर्माबाद, देगलूर, नायगाव या मार्गे गुटखा. दाखल होतो. नांदेड जिल्ह्यातील गुटखा माफिया हे राज्यात कुप्रसिद्ध आहेत. हे सर्व प्रकरण अन्न आणि औषध प्रशासन विभागाला माहिती असूनही त्यावर ठोस कार्यवाही केली जात नाही. आता सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार यांच्या माध्यमातून गुटका माफिया वर प्रहार चढवला जात आहे. नांदेड जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात वाढलेल्या हप्तेगिरीमुळे अशा अवैध धंद्यांना उत आला आहे. बेकायदेशीररित्या टेम्पो, ट्रक कंटेनर मधून विविध कंपन्यांच्या गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीवरून ही कार्यवाही करण्यात आली. भोकर येथून हे मुख्य नगर रस्त्यावर राजनिवास नावाचा बंदी असलेला गुटका घेऊन जात असलेला कंटेनर एच.आर. ५५ यु. ७०५४ पकडण्यात आला. गुटख्याची कंटेनर मधून वाहतूक सुरू असताना ही कारवाई करण्यात आली. भोकर पोलीस स्टेशन मे ३५ लाख ९२ हजार आठशे रुपये किमतीचा गुटका व २५ लाख रुपयांचा कंटेनर असा एकूण ६० लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई भल्या पहाटे चार वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. भोकर, हिमायतनगर मार्गावरील पेट्रोल पंप समोरील रस्त्यावर हा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी ट्रक चालक शहीद पिता इसाक वय २७ राहणार मेवाड राजस्थान व गुटका माफिया रिजवान सेठ राहणार हिमायतनगर यांच्याविरुद्ध कलम ३२८, २७२, २७३, १८८ भा.द.वि. कलम अन्नसुरक्षा मानक कायदा २००६ इतर वेगवेगळ्या कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

असा प्रकार दर दोन महिन्यानी नांदेड जिल्ह्यात होतो. आंध्रप्रदेश मधून आलेला हा गुटखा नांदेड, जिल्ह्यात देगलूर, धर्माबाद, नायगाव, हदगाव, मुखेड, नांदेड येथे चोरीच्या मार्गाने वितरीत केला जातो.हा माल वितरीत करण्यासाठी मोटार सायकली, जीप, कपड्याचे बंडल व बसमधून गावोगावी पोहोचला जातो. हिंगोली जिल्ह्यात बाळापुर, वसमत, सेनगाव, कळमनुरी व हिंगोली या तालुक्यात हा गोदामात साठवला जातो. आजही हिंगोली जिल्ह्यात गुटख्याची प्रचंड प्रमाणात साठा करून हे माफिया नफा कमावतात व शासनाला चुना लावण्याचे कामा केले जाते. नांदेड जिल्ह्यातून लातूर जिल्ह्यात आहमाद्पूर, उदगीर, चाकूर, देवणी या ठिकाणी रात्री बेरात्री हा पोहोचवला जातो. परंभणी जिल्ह्यात हा काही तालुक्यात वितरीत केला जातो. यवतमाळ जिल्ह्यात उमरखेड व महागाव या ठिकाणी हा पाठवला जातो.

माहूर ला हा गुटखा किनवट मार्गे पाठवला जातो. याची साखळी एवढी जबरदस्त आहे की याचा महिन्याचा व्यापार हा अब्जावधी रुपयाच्या घरात जातो. अंध्राप्रधेशाच्या सीमेवर जिथे तपासणी नाके लावले आहेत. त्यांना ही या माफियांनी लाचार करून ठेवले आहे. एवढेच नाही तर, छोटे व्यापारी ही निजामाबाद व आदिलाबाद या शहरातून मोटार सायकल वर गुटख्याची आयात करतात. यात तरुण वर्ग फार मोठ्या प्रमाणात गुंतून पडला आहे. लाखो रुपयाची जर ओर्डेर असेल तर हा गुटखा मराठवाड्यात सहज पोहोचवला जातो. सामान्य नागरिक आज ही प्रतीक्षेत आहेत की हे माफिया सूत्र कधी संपेल. पण फार मोठी अभ्यासपूर्ण साखळी यात कार्य करीत असून हे बंद होणे शक्य नाही. जोपर्यंत अन्न व ओषधी प्रशासन आपले कार्य पार पाडीत नाही तोपर्यंत हा माफियाचा हैदोस नांदेड जिल्ह्यात चालू राहील.

कृषी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी

राज्यातील अनु.जाती, व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन जीवनमान उंचावण्यासाठी शेतकऱ्यांना शेती अर्थसहाय्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सन २०२१-२२ साठी राबविण्यात येत आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज mahadbt.mahait.gov.in या पोर्टलवर स्वीकारण्यात येत आहेत. गरजूंनी नजीकच्या सामुदाईक सेवा केंद्र,महा ई सेवा केंद्र, ग्रामपंचायत कार्यालयातून अर्ज करावेत. या योजनेत अंतर्भूत घटक नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळयाचे अस्तरीकरण तसेच इतर बाबीमध्ये वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच,ठिबक सिंचन, तुषार सिंचन परसबाग, पंपसंच (डीझेल, विद्युत), PVC/HDPE पाईप अशा विविध गरज असलेल्या बाबी निवडून अर्ज करावा.अर्ज करताना ७/१२, ८ अ, बँक पासबुक, आधार कार्ड व मोबाईल सह उपस्थित राहून अर्ज करावा. अर्ज केल्यानंतर शासनाच्या पोर्टल वरुन लॉटरीमध्ये आपली निवड झाल्यानंतर आपणास कागदपत्रे दिलेल्या मुदतीत अपलोड करावे लागतील. लाभार्थीच्या अटी व शर्ती मध्ये उत्पन्न १.५ लाखापर्यंत कमीत कमी क्षेत्र ०.४ हे. व जास्तीत जास्त ६ हे. मर्यादा, जातीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. नवीन विहिरी व्यतिरिक्त इतर बाबीसाठी कमीतकमी ०.२० हे. क्षेत्र असणे नितांत गरजेचे आहे.शोषित, अंशत : शोषित, अतिशोषित गावात नवीन विहिरीचा लाभ मंजूर होणार नाही. रेणापूर तालुक्यतील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेसाठी अर्ज करावेत असे आवाहन पंचायत समिती रेणापूरचे सभापती रमेश सोनवणे, उपसभापती अनंत चव्हाण, गट विकास अधिकारी मोहन अभंगे, कृषि अधिकारी ए.के. डमाळे व विस्तार अधिकारी कृषि एस.एन.नरहरे यांनी केले आहे.

थोडक्यात वृत्तांत

विविध गावांना खा. सुधाकर श्रृंगारे यांची भेट

अहमदपूर : अहमदपूर तालुक्यातील अनेक गावामध्ये पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे व जमिनीचे नुकसान झाले असल्याने त्यांची पाहणी करण्यासाठी लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुधाकर श्रृंगारे अहमदपुर तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. खासदार सुधाकर श्रृंगारे यांचे अहमदपूर शहरात आगमन होताच अहमदपूर नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षा सौ.मिनाक्षीताई रेड्डी यांच्या निवासस्थानी भेट दिली असता खासदार सुधाकर श्रृंगारे यांचा यथोचित सत्कार रेड्डी परीवाराच्या वतीने करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील, प्रदेश पॅनलिस्ट सदस्य गणेश दादा हाके, माजी सभापती आर.डी.शेळके, उपसभापती अशोकराव चिंते, अमित रेड्डी, ज्ञानोबा बडगिरे, राजकुमार खंदाडे, रामभाऊ बेल्लाळे, गोविंद गिरी, राहुल शिवपुजे, निखिल कासनाळे, बालाजी सारोळे, शिवराज पाटील, शिवानंद भोसले, देविदास सुरणर, हणमंत देवकते, बालाजी होळकर, हेमंत गुट्टे, संग्राम नरवटे, शिवाजी देवकते, राजकुमार नरवटे,आदिसह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.तालुक्यातील मानखेड येथे पुराने नुकसान झालेल्या शेतीची पाहणी करून दलीत वस्ती मधील पुरामुळे झालेल्या नुकसानीचाही आढावा घेऊन तात्काळ पंचनामे करून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी यावेळी मानखेड येथील ग्रामस्थांना आश्र्वासन दिले.याबरोबरच चिखली गावावर ढग फुटी झाल्याने तलाव फुटून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असल्याने त्यांचाही आढावा चिखली ग्रामस्थांकडून घेऊन तात्काळ पंचनामे करून मदत मिळवून देण्याचेही आश्र्वासन चिखली येथील शेतकऱ्यांना दिले.

निजाम उंटवाले यांचे निधन

देवणी : येथील ज्येष्ठ कार्यकर्ते निजाम सय्यद अली उंटवाले वय ८० यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान १३ सप्टेंबर रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्यावर कब्रस्तान मध्ये दफन करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई पत्नी दोन मुले व तीन मुली सुना व नातवंडे असा परिवार आहे. ते येथील कार्यकर्ते ईक्रम व सलीम उंटवाले यांचे वडील होत.

भगवान साबणे यांचे निधन

देवणी : येथील साबणे ट्रेडर्सचे मालक भगवान बाळप्पा साबणे वय ८५ वर्ष यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार (दि. १७) रोजी दुपारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, नातू असा परिवार आहे. राजकुमार साबणे यांचे ते वडील होत.

मराठवाडा मुक्तीसंग्रामदिन उत्साहात साजरा

लातूर : येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासह, संगमेश्र्वर अध्यापक विद्यालय, राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालय, संगमेश्र्वर प्राथमिक विद्यालय व तुळजाभवानी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्रामदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते हुतात्म्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बोलताना प्राचार्य केंद्रे म्हणाले की, पूर्वी मराठवाडा हा हैद्राबाद संस्थानात विलीन होता. निजामांनी मराठवाड्यातील नागरिकांवर खूप अन्याय - अत्याचार केले. मराठवाडा निजामांच्या तावडीतून सोडविण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्त्वाखाली अनेकांनी निजाम राजवटीविरुद्ध लढा दिला. प्रसंगी अनेकांनी हौतात्म्य पत्करले. अनेकांच्या बलिदानामुळे मराठवाडा स्वतंत्र झाला, या सर्व क्रांतीकारकांच्या कार्याला सलाम. या प्रसंगी संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये, संस्था सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, प्रा. के. डी. केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. एस. आर. धुमाळ, प्रा. एस. एम. जाधव, प्रा. ए. एस. खोत, प्रा. वैशाली पाटील, मदन धुमाळ, रमेश बिराजदार, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते.

औसात विदेशी दारूचे ५७ बॉक्स जप्त

औसा : औसा तालुक्यातील काजळे चिंचोली पाटीवर बेकायदा देशी विदेशी दारूची तस्करी करणाऱ्यांना भादा पोलिसांनी पकडून ५७ बॉक्स विदेशी दारू जप्त करत धडाकेबाज कामगिरी केली आहे. भादा पोलिसांच्या या धडक कारवहीने बेकायदा दारू विक्रेत्यात एकच खळबळ उडाली आहे. भादा पोलिस स्टेशनचे स.पो.नि. विलास नवले यांनी पदभार घेताच बेकायदा धंद्याविरोधात मोहीम हाती घेत कारवाहीचा सपाटा लावला आहे. दरम्यान औस ते तुळजापूर जाणारे हायवे रोडवरून महिंद्रा पीकअप हा भाजीपाल्याची रिकामे कॅरेट व त्या कॅरेटचे खाली विदेशी दारू बॉक्स घेऊन जात असले बाबतची गुप्त माहिती मिळाल्यावर एक गुप्त माहीती अधारे त्यांनी भाद पोलिस ठाणे हाद्दीतील मौजे काजळे चिंचोली पाटीवर सापळा लावून सदर पिकअपची झाडझडती घेतली असता त्यात विदेशी दारूचे ५७ बैक्स आढळून आले. ताब्यात घेतला असून त्यामध्ये खालील वर्णनाचा माल मिळून आला. त्यात १,२२,८८०/- रु. : चे विदेशी दारू मॅकडोल कंपनीचे ४० बॉक्स ज्यामध्ये एकुण १९२० बाटल्या. ५२,२२४/- रू. चे विदेशी दारू खइ कंपनीचे १७ बॉक्स ज्यामध्ये एकुण ८१६ बाटल्या. व ३,२०,०००/- महिंद्रा कंपनीचे पांढरे पिकअप. क्र.चक २५ -ग ०८४४ असलेले. असा एकूण ४,९५,१०४/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दयानंद अरुण शिंदे, रा. नारी ता. बार्शी जी. सोलापूर याच्या विरोधात भादा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी जिल्हा पोलिसो अधिक्षक निखील पिंगळे, अपर पो अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विलास नवले, शिंदे, गिरी, डोलारे , फड, शिरसागर, चव्हाण,दिंडे यांनी ही कामगिरी बजावली.

20 TO 26 SEPTEMBER 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 18/09/2021 7:57 PM Page 1

महाराष्ट्र एटीएसचे अपयश?

काही गोष्टी अशा असतात की त्यात राजकारण करायचे नसते. खास करून देशाच्या सुरक्षेच्या बाबतीत तरी राजकारण करू नये. पण आता सुरक्षा यंत्रणाही राजकारण करू लागल्या आहेत. दिल्लीच्या स्पेशल सेलने ज्या सहा दहशतवाद्यांना अटक केली आहे. त्यातील जान मोहम्मद नावाचा एक दहशतवादी मुंबईतील आहे. पण दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने जान मोहम्मदला अटक करताना मुंबई पोलिसांना कळवले नव्हते किंवा या दहशतवाद्याबद्दल मुंबई एटीएसच्या किंवा महाराष्ट्रातील गुप्तचर संघटना कोणतीही माहिती नव्हती ही बाब काहीशी चमत्कारिक आहे. याचा अर्थ देशातील राज्य राज्यांमधील सुरक्षा आणि तपास यंत्रणांमध्ये समन्वय नाही. आता महाराष्ट्र एटीएस जान मोहम्मद बाबतची माहिती सांगताना त्याला दिल्ली पोलिसांनी राजस्थानातील कोटा मधून पकडले. कारण केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी तशी माहिती त्यांना दिली होती. महाराष्ट्रात राहणाऱ्या एका दहशतवाद्यांची माहिती गुप्तचर संघटनांनी दिल्ली पोलिसांना देणे आणि दिल्ली पोलिसांनी परस्पर मुंबईत येवून महाराष्ट्र एटीएसला त्याची माहिती न देता जान मोहम्मद याला उचलणे हा सगळा प्रकार देशातील तपास यंत्रणा मधल्या राजकारणाची साक्ष देत आहे. असे जर व्हायला लागले तर या देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेत अनेक त्रुटी राहू शकतात आणि त्याचा फायदा देशद्रोह्यांना होऊ शकतो. एटीएस कोणत्याही राज्याची असो त्यांच्यात समन्वय असायलाच हवा किंवा त्यांच्याकडे असलेली माहिती त्यांनी परस्परांना शेअर करायलाच हवी, तरच दहशतवादी कारवाया रोखण्यात तपास यंत्रणांना यश येईल. राहता राहिला सवाल आयबी, सीबीआय आणि रॉ सारख्या प्रमुख गुप्तचर संघटनांचा! तर त्यांच्याकडे दहशतवाद्यांच्या बाबतीत जी माहिती उपलब्ध असेल ती त्यांनी संबंधित राज्याच्या एटीएसला कळवायला हवी होती, पण ती त्यांना कळवली नाही आणि परस्पर दिल्ली पोलिसांनी कारवाई केली म्हणजे महाराष्ट्र एटीएसवर केंद्रीय तपास यंत्रणांच्या विश्वास नाही असे समजायचे की केंद्रीय तपास यंत्रणा केंद्रातील भाजप सरकारच्या ताब्यात असल्याने व महाराष्ट्रात भाजप विरोधी सरकार असल्याने दहशतवाद विरोधी कारवाईचे महाराष्ट्र एटीएसला श्रेय मिळू नये असा तर हेतू नव्हता. आणि तसे काही असेल तर देशाच्या सुरक्षेसाठी खूप घातक आहे. कारण पकडण्यात आलेल्या दहशतवाद्यांकडून मिळालेल्या माहिती नुसार दिल्लीतील तीन आणि मुंबईतील दोन ठिकाणे त्यांच्या रडारवर होती आणि जान मोहम्मदला मुंबईतील अट्टल गुन्हेगार त्यांचा साथीदार होता. जान मोहम्मद यांच्यावर मुंबईच्या पायधूनी पोलीस ठाण्यात २० गुन्ह्यांची नोंद आहे, पण तो दहशतवादी कारवायांमध्ये सामील आहे याची माहिती मुंबई पोलीस किंवा एटीएसकडे नव्हती आणि त्याचाच फायदा घेऊन दहशतवादी मुंबईची रेखी करून गर्दीच्या दोन मोठ्या ठिकाणांना टार्गेट करणार होते. पण याची माहिती महाराष्ट्र एटीएस किंवा राज्यातील गुप्तचर संघटनांना नव्हती. समजा दिल्ली पोलिसांनी जान मोहम्मदला पकडलेच नसते तर? ऐन सणासुदीच्या काळात मुंबई शहर दहशतवादी घटनांनी हादरले असते आणि हे सगळ केवळ सुरक्षा आणि तपास यंत्रणा मधील राजकारणामुळे घडले. केंद्र आणि राज्य सरकारने सुद्धा याची गंभीर दखल घ्यावी. राजकीय क्षेत्रातील घाणेरडे राजकारण सुरक्षा यंत्रणांमध्ये येणार नाही यासाठी आतापासूनच काहीतरी उपाययोजना कराव्यात. कारण मुंबई शहर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असते. त्यामुळे मुंबईवर आघात करण्याच्या दहशतवाद्यांच्या कोणत्याही योजनेबद्दल गुप्तचर संघटना किंवा देशातील कोणत्याही राज्यातील एटीएसला काही माहिती असेल तर त्यांनी तात्काळ ती महाराष्ट्रातील तपास यंत्रणांना कळवणे गरजेचे आहे. अन्यथा तपास यंत्रणांच्या या राजकारणात हजारो लोकांचा जीव जाऊ शकतो. आणि त्याचा तोटा त्या शहरालाच नाही तर संपूर्ण भारताला भोगावा लागेल.

मराठवाडा आद्य मराठी भाषकांची भूमी!!

मराठवाडा मुक्ती संग्रामदिनानिमित्त घेतलेला मागोवा

मराठवाडा हा मराठी भाषकांचा आद्यप्रांत आहे. सातवाहन काळात पहिल्या शतकात भारतभर विविध प्राकृत भाषा बोलल्या जायच्या त्यावेळी पैठण राजधानी असलेल्या या प्रदेशात महाराष्ट्री प्राकृत बोलली जायची नव्हे ती त्यांची राजभाषा होती... एवढेच नव्हे तर पहिला गुनाढ्य कृत लिखित ग्रंथ बृहद्कथा हाही प्राकृत मध्ये लिहला गेला. गोदावरी आणि मन्याड खोरं बालाघाट डोंगर रांगाच्या आसपासचा कमी पाण्याचा पण सुपीक प्रदेश त्यामुळे तगेर (तेर-ढोकी) इथं सापडलेल्या प्राचीन अवशेषावरून हा प्रदेश ग्रीक रोमांबरोबर व्यापारी संबंध ठेवून होता याचे पुरावे पुरातत्व तज्ञाकडे आहेत. या अशा सुपीक प्रदेशावर अनेक राजांनी राज्य केले. त्याच्या तुरळक खुणा आज पर्यंत संशोधकांच्या नजरेत आल्या. अजूनही डोळस संशोधन होणं गरजेचं आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. १९०३ मध्ये सीपी ऐंड बेरारच्या विभाजना नंतर इतर भागासारखी शैक्षणिक प्रगती झाली नाही,साम्राज्य विस्तारक आणि आधुनिक जगाच्या विकासाची ओळख करुन देणाऱ्या ब्रिटीशांनी (ते वाईट होते त्यांनी स्वार्थासाठी का होईना इंग्रजी शिक्षणाची बीज पेरुन भारताला पुन्हा वैश्विक बनविण्याला प्रारंभ केला होता) मराठवाडा वगळून भारत भर मिशनरीज शाळा सुरु केल्या. इंग्रजी सारखी जगाची ओळख करुन देणारी भाषा अवगत करुन दिली. तो अनुशेष १९४८ नंतर अनेक प्रागतीक विचारांच्या लोकांनी भरून काढण्याचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नाला यश आलं. शिक्षणासारखं मूलभूत परिवर्तनाचं माध्यम लोक चळवळ म्हणून पुढे आलं. त्यामुळे पुढच्या काळात महाराष्ट्राला अनेक बुद्धीजिवी व्यक्ती या भूमीने दिले. ह्या भूमीने मराठी माणसात अमूलाग्र बदल घडविणाऱ्या भागवत संप्रदायाचा पाया घातला...या सुपीक जमिनीत पावसाच्या अल्प प्रमाणामुळे म्हणावं तेवढं पीक आलं नसेल पण मेंदू सुपीक असल्यामुळे अनेक मानवी विकासाच्या चळवळी या भूमीत निर्माण झाल्या. मानवी विकासात नेहमीच प्रागतिक असलेल्या या परदेशात भौगोलिक स्थितीमुळे भौतिक विकास तुलनेनी कमी झाला पण इथल्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाने या भौगोलिक स्थितीवर मात करणारे प्रकल्प राबविले. आताही राबविले जात आहेत. मराठवाड्याला तमाम भारतीयांपेक्षा स्वातंत्र्यासाठी एक वर्ष अधिकची प्रतिक्षाही करावी लागली ती कशी ते पाहण्यासाठी थोडा मागोवा. १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदिर्घ लढ्यानंतर हैदराबाद मुक्ति संग्रामाची परिणती १९४८ मध्ये भारत सरकारने निजाम शासना विरुद्ध पोलीस कारवाई करुन हैदराबाद संस्थान स्वतंत्र भारतदेशात सामावुन घेतले. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद राज्य निजामापासून मुक्त केले गेले. तो दिवस मराठवाडा मुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रजांची राजवट संपली आणि भारतास स्वातंत्र्य मिळाले. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद राज्य निजामापासून मुक्त केले गेले. १ नोव्हेंबर १९५६ पासून मराठवाडा विभाग मुंबई राज्यास जोडण्यात आला.१ मे १९६० पासून नविन महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. स्वातंत्र्यापूर्वी मराठवाडा प्रदीर्घ काळ निजामाच्या हैदराबाद राज्याचा भाग होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या बरोबरीनेच हैदराबाद मुक्तीसंग्राम लढला गेला.स्वामी रामानंदतीर्थ, गोविंदभाई श्रॉफ हे हैदराबाद मुक्तीसंग्रामचे अर्ध्वयू होते. स्वामी रामानंदतीर्थ (ऊर्फ व्यंकटेश भवानराव खेडगीकर) हे संन्यासी व हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेतृत्व करणारे मराठी चळवळकर्ते होते. स्वामी रामानंद तीर्थ यांचे ते एक प्रमुख समर्थक गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंग नाईक, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे यांनी हैदराबाद मुक्तिसंग्राम चळवळीत मोलाचे कार्य केले. तसेच या मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्रवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्या सर्व स्वातंत्रवीरांना मानाचा मुजरा!

– युवराज पाटील; जिल्हा माहिती अधिकारी, लातूर

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन

मराठवाड्याचा कायापालट घडवणाऱ्या प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी करणार - उद्धव ठाकरे

औरंगाबाद/प्रतिनिधी

शिक्षण, आरोग्य, परिवहन, नगरविकास, पायाभूत सुविधा, कृषी अशा विविध क्षेत्रात मराठवाड्याचा आमूलाग्र कायापालट घडवणारे अनेक महत्त्वाचे निर्णय राज्यातील विद्यमान सरकारने घेतले आहेत. त्यांची कालबद्ध अंमलबजावणी करुन येथील विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान केली जाईल, असा निर्धार मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी व्यक्त केला. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानातील स्मृती स्तंभाजवळ मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी जनतेला संबोधित करताना ते बोलत होते. या कार्यक्रमास केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, उद्योग मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुभाष देसाई, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री संदीपान भूमरे, महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार, खासदार सय्यद इम्तियाज जलील, खासदार अनिल देसाई, सर्वश्री आमदार अंबादास दानवे, हरिभाऊ बागडे, अतुल सावे, संजय शिरसाट, प्रशांत बंब, मनिषा कायंदे, प्रदीप जैस्वाल, उदयसिंह राजपूत, माजी खासदार चंद्रकांत खैरे, विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, विशेष पोलिस महानिरीक्षक मल्लिकार्जुन प्रसन्ना, पोलिस आयुक्त डॉ. निखील गुप्ता, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, मनपा प्रशासक तथा आयुक्त अस्तिककुमार पांडेय, जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील आदींसह स्वातंत्र्य सैनिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. मराठवाडा मुक्ती संग्राम दिन हा विजय दिन असून स्वातंत्र्यानंतर तब्बल १३ महिन्यानंतर निजामांच्या जुलमी राजवटीतून मराठवाडा मुक्त झाला. स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ आदींसह अनेक कर्तृत्ववान अशा नेतृत्वात अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार येथील जनतेने केल्याचा गौरवास्पद उल्लेख करुन मुख्यमंत्र्यांनी या लढ्यातील ज्ञात, अज्ञात सर्व वीर, वीरांगना यांना प्रारंभी अभिवादन केले. लोहपुरूष वल्लभभाई पटेल यांच्यासमोर निजामाने शरणागती पत्करल्यानंतर देशाच्या स्वातंत्र्यानंतर १३ महिन्यांनी स्वतंत्र्य झालेल्या मराठवाड्याच्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याचे कार्य शासन करत असल्याची ग्वाही देऊन मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, मराठवाडा संतांची भूमी आहे. या संतांच्या भूमीमध्ये पैठण या ठिकाणी संतपीठाची स्थापना करण्यात आली आहे. या संतपीठाचे विद्यापीठ होण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. या ठिकाणी जगातील संशोधक, अभ्यासासाठी यावेत, अशी अपेक्षा आहे. संतपीठाची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे देण्यात आलेली आहे. तसेच जुलमी निजामी राजवटीच्या खुणा पुसून काढण्यासाठी औरंगाबाद जिल्हा परिषदेकडील १४४ निजामकालीन शाळा आणि वर्गखोल्या या नव्याने बांधून त्यांचा पुनर्विकास करण्यात येऊन वैभव प्राप्त होतील अशा शाळा उभारण्यात येणार आहेत. मराठवाड्यातल्या पहिल्या जागतिक दर्जाच्या सिंथेटीक ट्रॅकचे काम औरंगाबाद विभागीय क्रीडा संकुल येथे वेगाने पूर्ण करण्यात येणार आहे. औरंगाबाद-अहमदनगर रेल्वे मार्गाला चालना दिली जाईल. जेणेकरून मराठवाड्यातील उद्योग व्यवसायास फायदा होईल. औरंगाबाद - शिर्डी हवाई सेवा सुरु होऊ शकते का याचाही विचार करण्यात येत आहे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. श्री.ठाकरे म्हणाले, औरंगाबादेत नव्याने समाविष्ट सातारा-देवळाई भागात भूमिगत मलनि:सारणाची, विविध मुख्य रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे करण्यात येत आहेत. औरंगाबादची तहान भागवणारा आणि खूप काळ आपण वाट पाहत असलेल्या १६८० कोटींच्या पाणी पुरवठा प्रकल्पाचे कामही वेगाने सुरु आहे. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा फायदा मराठवाड्याला होणार आहे. औरंगाबाद- शिर्डी मार्गाचे श्रेणीवाढ करण्यात येईल. समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या १९४.४८ कि.मी.च्या जालना- नांदेड महामार्गाला देखील गती देण्यात येईल. स्व.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन वैशिष्ट्यपूर्ण राहील. या ठिकाणाहून स्फूर्ती, प्रेरणा मिळेल, असे स्थळ करण्यावर शासनाचा भर राहील. तसेच जगातील एक वैशिष्ट्यपूर्ण पार्क म्हणून औरंगाबाद सफारी पार्कसाठी जागेची निश्चिती करून तातडीने आवश्यक त्या परवानग्या मिळविण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. शहरातील गुंठेवारी नियमित करण्याची प्रक्रिया वेगाने करावी व पुढील काही महिन्यांत हे काम पूर्ण करावे, अशा सूचना दिल्याचे मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले. परभणी येथे २०० बेड्सचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात येणार आहे. परभणी शहरात भुयारी गटार योजना, अतिरिक्त पाणी पुरवठा योजनेचाही विचार सुरू आहे. तसेच उस्मानाबाद वैद्यकीय महाविद्यालय, भूमिगत गटार योजनेचे कामही सुरू आहे. हिंगोली येथे हळद प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन देण्यात येत आहे. हिंगोलीतील दिव्यांग पुनर्वसन केंद्रासाठी सहा कोटी रुपयांचा निधीही देण्यात येणार आहे. औरंगाबादेतील घृष्णेश्वर मंदिर सभामंडपाचा विकास, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ मंदिर परिसर, नाथ मंदिर परिसराचा विकासही करण्यात येणार आहे. निधीअभावी कोणताही प्रकल्प, योजना रखडणार नाही, असेही मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले. शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत ३६० मेगा वॅट सौर प्रकल्प उभारण्यात आलेले आहेत. त्यापैकी ११९ मेगा वॅट प्रकल्प मराठवाड्यात तसेच मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील टेंभी आणि बीड जिल्ह्यातील वडवणी येथे येत्या वर्षात जवळपास २०० मेगा वॅट सौर प्रकल्प उभारण्यात येणार आहेत, असेही मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी सांगितले. मागील दीड वर्षात जनतेने संयम व जिद्दीने कोरोनाविरूद्धची लढाई जिंकली आहे. यापुढेही स्वयंशिस्त, कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करत आपण कोरोनाविरूद्धची लढाई जिद्द,संयम व स्वयंशिस्तीच्या माध्यमातून जिंकणार असल्याचेही श्री. ठाकरे म्हणाले. प्रारंभी मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्यासह इतर मान्यवरांनी मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली. स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. पोलिस दलाकडून हवेत तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीणा कन्नडकर यांनी केले.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे हैद्राबाद मुक्तिसंग्रामात महत्त्वाचे योगदान!

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे हैद्राराबाद मुक्तिसंग्रामात महत्त्वाचे योगदान आहे. परंतु काही लेखकांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा इतिहास जसा घडला आहे तस जगासमोर मांडला नाही. काही लेखकाने हैदराबाद स्टेट काँग्रेस, काँग्रेस हिंदुमहासभा, स्वामी रामानंद तीर्थ, बॅरिस्टर विजय विद्यालंकार, वकील वर्ग यांचा उदोउदो केला. मराठवाड्यातील न्यायाधीश लक्ष्मण कापसे, प्राध्यापक, डॉक्टर एस. एस. नरवडे यांनी आधुनिक संशोधन करून हैदराबाद मुक्ती संग्रामाचा खरा इतिहास जनतेसमोर मांडला. बाबासाहेबांनी मुबई येथील दादर येथे अस्पृश्यांचे अधिवेशन १९३६ मध्ये बोलाविले. हैदराबाद येथील व्यंकटराव यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन भरले. या अधिवेशनसत हैद्राबाद संस्थानातील समस्या सोडविण्यासाठी विविध ठराव पारित केले. त्यावेळी म्हणे निजामाने काही करोडो रुपये देऊन त्यांचे लोक बाबासाहेबांना भेटण्यासाठी पाठविले. पण बाबासाहेबांनी त्यांची भेट घेतली नाही. निजामाने वीस लाख रुपये निधी व ३०० पगारी मौलवी इस्लामच्या प्रचारासाठी नेमले होते. हिंदुनी ठरवलेल्या दलित वर्गाला मारून मुसलमान बनविण्याचे प्रकार काही ठिकाणी घडले. त्यावेळी दलीतांना हो मुसलमान का कापू मान अशी परस्थिती निजामाने निर्माण केली होती. दलीतांना अशा अनेक अत्याचारांना तोंड द्यावे लागेल. तत्कालीन वेळी बाहेरील पुढार्यांना संस्थानात सभा-संमेलने घेण्यास बंदी होती. त्यामुळे दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांना वाचा फोडण्यासाठी औरंगाबादच्या कार्यकर्त्यांनी १९३८ साली समक्रणपुर चाळीसगाव येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची सभा आयोजित केली. या अधिवेशनात बाबासाहेबांनी लोकांमध्ये आत्मविश्र्वास निर्माण केला व त्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्र्वासन दिले. तसेच सोलापूर येथे २३ फेब्रुवारी १९४१ रोजी महार मांग हक्क परिषद आयोजित करून मराठवाड्यातील लोकांना हक्कासाठी लढण्याचा इशारा दिला व मार्गदर्शन केले. जुलै १९४२ मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकराचा व्हाइसरॉयच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. २० सप्टेंबर १९४० रोजी निजाम राजवटीतील सिकंदराबाद येथे बाबासाहेबांचा शेड्युल कास्ट फेडरेशनच्या वतीने भव्य सत्कार आयोजित करण्यात आला. निजामाने अन्याय अत्याचार थांबावेत.दलीतांना योग्य व पुरेशी संरक्षण द्यावे. त्यांना शैक्षणिक सोयी सवलती उपलब्ध करून द्याव्यात व कर्तव्य पार पाडावे असे परखड विचार बाबासाहेबांनी मांडले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १३ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेत भारतीय राज्यघटनेची ध्येय उद्दिष्टे मांडली. बॅरिस्टर मुकुंदराव जयकर यांनी उपसूचना मांडली.परंतु काँग्रेसवाल्यांनी त्यांना विरोध करून खाली बसवले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे काँग्रेसवाल्यांची एक नंबरचे शत्रू समजले जायचे. त्यांचे नाव घटनेच्या अध्यक्षपदी निवड करण्यासाठी डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी पुकारले. परंतु काँग्रेसवाले विरोध करायला भाई सारून तयार होते. बाबासाहेबांनी भाषणाला सुरुवात केली. आपण आतापर्यंत घराघरात विभाग होतो, सर्व विसरून भारत सामर्थ्यशाली बनवण्यासाठी खांद्याला खांदा लावून काम करूया, जगातील कोणतीही शक्ती आपल्याला अडवू शकणार नाही. मुस्लिम एकसंघ भारताची फाळणी करून पाकिस्तानची मागणी करीत आहेत. खर तर त्यांनी भारतात राहणे त्यांच्या हिताचे आहे हे त्यांना एक दिवस कळून येईल! बाबासाहेबांचे तसे विचार हैदराबाद विषय होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करावे हा बाबासाहेबांचा विचार होता. बाबासाहेबांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकर्त्यांना, जनतेला हैदराबाद संस्थान मुक्त करण्यासाठी व भारतात विलीन करण्यासाठी निजामाच्या विरुद्ध काम करण्याचे आदेश दिले. औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड चे भाऊसाहेब मोरे उस्मानाबादचे व्ही एल. सूर्यवंशी नांदेडचे हरिहरराव सोनुले परभणीचे डी.एन. मोरे बीड जिल्ह्यातील बीडचे केशवराव कांबळे आमदार माधवराव सवई, पाटोदा तालुक्यातील होळीचे गजाबा शिरसाट, गणपत गायकवाड यांच्यासह गेवराई तालुक्यातील अनेक कार्यकर्ते निजामाच्या व रजाकरा विरुद्ध लढले.

संस्थानात काम करणाऱ्या बऱ्याच सैनिकांना पेन्शन मिळत होते व मिळत आहे. मुक्तिसंग्रामात दलितावर विचित्र कामगिरी सोपविण्यात आली होती.त्यावेळी शिंदीच्या झाडा पासून निजामाला चांगले उत्पन्न मिळत होते.त्यापासून तयार केलेली दारू गांजा अफू विकली जायची. सिंधी बहुजन समाज पित असे पण ती झाडे तोडण्याचे काम दलितांना दिले ते त्यांनी प्रामाणिक पणे पार पाडली. ती लाखो झाडे तोडली नसती तर ते उत्पन्न भारत सरकारला राज्याला मिळाले असते. हैदराबाद संस्थान भारतात विलीन करणे सोपे नव्हते. निजामाने पाकिस्तान कडून सैन्याची मदत घेण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी काही कोटी पाकिस्तानला दिले. निजामाने त्यावेळी स्वतःचे सैन्य उभारले व लाल किल्ल्यावर हैदराबाद झेंडा फडकवण्याचे स्वप्न पहात होता. त्यासाठी कोटी रुपये खर्च केले. निजामाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना युनो मध्ये जाऊन स्वतंत्र हैदराबादचे प्रतिनिधित्व करण्यास व आंतरराष्ट्रीय कोर्टात स्वतंत्र हैद्राबाद बाजू मांडण्याची विनंती केली होती, पण बाबासाहेबांनी त्यास स्पष्ट नकार दिला व निजामाला सल्ला दिला की तुम्ही भारताच्या संघराज्यात विलीन होणे तुमच्या हिताचे आहे. निजामाने बाबासाहेबांनां कोटी करोडो रुपये दिले असते पण बाबासाहेबांनी निजामाची विनंती फेटाळून लावली.

हैदराबाद संस्थान विरुद्ध पोलिस कारवाई करणे याबाबत भारताचे गृहमंत्री व उपप्रधानमंत्री यांनी आंतरराष्ट्रीय कायदे याविषयी वेळोवेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा सल्ला घेतला. व त्या सल्ल्याप्रमाणे पोलीस कारवाई केली. ही बाब आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अनेक लेखकांनी नमूद केली नाही. हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या बाबतीत अत्यंत महत्त्वाच्या बाबी आहेत. जे. एच. भयाने निजामाला व रजाकाराला साथ देण्याची भूमिका घेतली. कारण भयाला मंत्रिपदाचे डोहाळे लागले होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एक पत्रक काढले हैदराबाद संस्थान भारतात विलीन व्हावे असा मुद्दा ठासून मांडला होता. निजामाविरुद्ध काढलेली पत्रके वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली. फ्री प्रेस जनरल ५ जून १९४७ बॉम्बे क्रॉनिकल, १८ जून १९४७ इंडिया, ८ जुलै १९४७ स्टँडर्ड २८ नोव्हेंबर १९४७ त्यामुळे त्यांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनला निजामाच्या विरोधात तीव्र भूमिका घेतली. ११ जून १९४७ ला निजामाने मुस्लिमांच्या मागणी अनुसार हैद्राबाद संस्थानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. तेव्हा बाबासाहेब म्हणाले भारतातील संघराज्य व्यतिरिक्त संस्थानांना स्वतंत्र अस्तित्व नाही. संस्थाने भारताचे अविभाज्य भागच आहेत. बाबासाहेबांच्या भूमिकेमुळे संस्थानातील एसीएफ चे कार्यकर्ते व अनुयायी यांनी निजामाविरुद्ध च्या मुक्तिसंग्रामात त्यांच्यावर सोपविलेल्या कामगिऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या. रजाकार्यांने दलितांवर अनन्वित अत्याचार केले. त्यांची घरे दारे जाळली, जमिनी हडप केल्या, घरदार सोडली. विशेष म्हणजे महाराणीने निजामाला साथ दिली हा खोटा इतिहास सांगितला जातो. उलट पाटील, पांडे, देशमुख, जागीरदार, गाव कामगार, अधिकाऱ्यांनी सत्तेसाठी व स्वार्थासाठी निजाम मला साथ दिली. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा इतिहास सत्य इतिहास लिहिला जावा. त्यात सर्व समाजाचे योगदान होते. ते जगासमोर यावे एका उच्च जातीलाच श्रेय देणे चूक आहे. खरे राष्ट्रप्रेमी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संस्थानातील नेते कार्यकर्ते दलित जनता यांना हैदराबाद मुक्तिसंग्रामात अंदोलनात भाग घेण्याचे आदेश दिले व त्याने संग्रामात भाग घेतला. हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या अनुयायांचा विसर पडता कामा नये. १७ सप्टेंबर १९१७ रोजी हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन होणे याला एकूण ७० वर्षे पूर्ण होत आहेत.याप्रसंगी सच्चे राष्ट्रप्रेमी व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व हैदराबाद मुक्ती संग्रामातील नेते, कार्यकर्ते जनता सैनिक यांना विनम्र अभिवादन...!

– प्राचार्य शंकर सोनवणे, लातूर

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

20 TO 26 SEPTEMBER 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 18/09/2021 7:58 PM Page 1

नांदेड जिल्ह्यात मटका व पत्ते क्लब जोरात; करोडोंची दररोज उलाढाल

नांदेड/प्रतिनिधी

नांदेड शहर व जिल्ह्यात गेल्या काही महिन्यापासून मटका व पत्याचे क्लब जोरात चालू असून फार मोठे अर्थकारण यात दडले आहे व चालू आहे. काही ठिकाणी नाममात्र धाडी टाकण्यात आल्या व कारवाई करण्यात आली पण मटका माफिया व पत्याची क्लब चालवणारे डॉन अधिक वाढल्याने हा प्रकार आता पोलिसांच्या हाताबाहेर गेला आहे. नांदेड जिल्ह्यात जो मटका चालतो तो शहरात केंद्रित झाला आहे त्याची सर्व व्यवहार आधी शहरातून चालतात आणि तालुक्यावर याचे किरकोळ संकलन होते. मिलन डे, कल्याण, मोर्निंग मिलन, नाईट मिलन, स्टार नाईट अशा विविध नावाखाली हा मटका चालतो, यांचे ओपन व क्लोज येण्याच्या वेळा ठरलेल्या आहेत. या वेळेत येतात. हा मटका नांदेड जिल्ह्यात नायगाव नरसी, देगलूर, उमरी, हदगाव, धर्माबाद, मुखेड, कंधार, लोहा, भोकर, नांदेड या तालुक्यात राजरोसपणे चालतो. या मटक्यामुळे कित्येकांचे संसार देशोधडीस लागले आहेत. नांदेड जिल्ह्यात आत्महत्याचे प्रमाण सुद्धा अधिक आहे. या आत्महत्या होण्यासाठी जी कारणे आहेत त्यापैकी मटका व पत्याचे क्लब हे सुद्धा कारण आहे. पण याकडे अक्ष्यम्य दुर्लक्ष होत आहे. आजवर या बाबतीत मोठी कारवाई झालीच नाही. दिवसभर मजुर घाम गाळून पैसे कमावतात व यात आपण श्रीमंत होऊ या आशेने मटक्यावर पैसे लावतात आणि कंगाल होतात.यात अपयश आले की व्यसन लागते व संसार देशोधडीस लागतो.

नांदेड जिल्ह्यात हा मटका पान टपरी, शटरमध्ये, हॉटेलमध्ये, आटोमध्ये, मोबाईलवर, दलालाच्या घरी व जीपमध्ये घेतला जातो. काही ठिकणी बारमध्ये सुद्धा हा पावत्या फाडण्यासाठी प्रवेश करतो. काही तालुक्यात हा मटका शेतात आखाड्यावर घेतला जातो. विविध तालुक्यात हे संकलन करून मोबाईल whatsapp वर अंक लावलेल्या पावत्या पाठवतात आणि व्यवहार पार पाडला जातो. जिथे पोलीस यंत्रणा सावध व सक्नांदेड जिल्ह्यात ज्या ठिकाणी हा मटका चालू आहे त्यात करोडो रुपयाची उलाढाल होते. जिल्हा सोळा तालुक्याचा असल्यामुळे या ठिकाणी अवैध धंदे करण्यास भरपूर वाव आहे. सर्व तालुक्याचे संकलन जील्ह्याठीकाणी होते आणि त्यात आर्थिक वाटप होते. आर्थिक व्यवहार मोठे असल्यमुळे केंद्र शहरात आहे. सदरील प्रकरणात विविध समाज माध्यमातून ओरड होते त्यावरून काही ठिकाणी धाडी टाकल्या जातात नाममात्र कारवाई होते व पुन्हा हा मटका सुरु होतो. पत्याचे क्लब पुन्हा सुरु होतात.

पत्याची खेळी खेळताना मात्र प्रत्येक वेळी जागा बदलली जाते.कधी भाड्याच्या खोलीत तर कधी दुकानाच्या शटर मध्ये,कधी लौज मध्ये तर कधी शेतात तर कधी धाब्यावर आणि आखाड्यावर सुद्धा हा डाव चालतो. हा करोडो रुपयाचा व्यवहार चालण्यासाठी राजकीय पाठबळ आहे की, राजकीय लोकांचे क्लब आहेत हे पोलीसना समजण्यास उशीर लागत आहे. पण यात सामान्य माणसाचा मात्र संसार उद्ध्वस्त होत आहे. यामुळे जिल्ह्याची बदनामी तर होत आहे शिवाय यंत्रणा किती कुचकामी आहे हे दिसून येत आहे. याला जोडधंदा म्हणून अवैध दारू विक्री जोरात चालते. या दारू विक्रीत नांदेड जिल्ह्यात महिला व बालकामगार यांचाही वापर होत आहे. ड्राय डेच्या दिवशी लाखो रुपयाची दारू या क्लब वर खपवली जाते.कसल्याही प्रकारचा तुटवडा भासणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाते. शहरात व तालुक्यात गल्ली बोळात कुठे उघड तर कुठे लपून हा मटका विक्रमाचे शिखर गाठला आहे. हा कसा नियंत्रणात आणावयाचा याचे फार मोठे आव्हान पोलिसासमोर आहे.कारण हा आता प्रत्येक तालुक्यात पोहोचला आहे. याची पाळेमुळे खोलवर रुजली आहेत. सर्वाची आर्थिक नाडी यावर चालू आहे. तेंव्हा हा कधी कसा बंद होईल, नियंत्रणात येईल हीच आशा नांदेड जिल्ह्यातील नागरिकाना लागली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस कामगार सेलच्या प्रदेश संघटक पदी भगवान पाटील यांची नियुक्ती

भिवंडी/अभिजित हिरे

तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर असलेल्या भगवान पाटील यांच्या सामाजिक कार्याची दाखल राष्ट्रवादीच्या पक्ष श्रेष्ठींनी घेतली असून राष्ट्रवादी कामगार सेलच्या प्रदेश संघटक पदी भगवान पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कामगार सेलचे प्रदेशाध्यक्ष शिवाजी खटकाळे यांनी त्यासंदर्भातील नियुक्ती पात्र देऊन भगवान पाटील यांची राष्ट्रवादी कामगार सेलच्या प्रदेश संघटकपदी नियुक्ती केली आहे . पाटील यांची कामगार सेलच्या प्रदेश संघटक पदी नियुक्ती झाल्यानंतर राष्ट्रवादीचे प्रदेशाद्यक्ष ताठ मंत्री जयंत पाटील यांची भगवान पाटील यांनी भेट घेतली यावेळी जयंत पाटील यांनी भगवान पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याची दखल राष्ट्रवादीच्या नेत्यांनी घेतली हीच माझ्या कामाची पोचपावती असून वरिष्ठांनी माझ्यावर सोपवलेले जबाबदारी निश्चितच पार पडून कामगारांसह नागरिकांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहीन अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी कामगार सेलचे नवं नियुक्त प्रदेश संघटक भगवान पाटील यांनी दिली.

थोडक्यात वृत्तांत

दोन मोटारसायकलच्या धडकेत एकाचा मृत्यू

औसा : तालुक्यातील बऱ्हाणपूर ते भादा जाणाऱ्या रस्त्याच्या दरम्यान भादा गावानजीक दोन मोटारसायकलच्या धडकेत ४२ वर्षीय इसमाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दि १६ सप्टेंबर रोजी भादा गावानजीक गणेश तुकाराम डावकरे रा बऱ्हाणपुर यांच्या बुलेट मोटार सायकल क्र MH-25 0202 ने धनराज मच्छिंद्र उबाळे वय ४२ वर्ष राहणार भादा यांच्या मोटारसायकलला धडक दिल्यामुळे धनराज मच्छिंद्र उबाळे हा इसम जागीच ठार झाल्याने भादा गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. धनराज उबाळे यांना दोन मुले असून एम एच ण १४ ५२ ३९ या मोटर सायकलला बुलेट ने धडक दिल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्या प्रेताचे शवविच्छेदन करून घटनेचा पंचनामा केल्यानंतर शुक्रवार दिनांक १७ सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी २ च्या सुमारास भादा ता औसा येथे त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.तर बुलेटवरील गणेश डावखरेला मार लागल्याने त्याच्यावर दवाखान्यात उपचार सुरू आहेत. या विचित्र आणि भयानक घटनेचा पुढील तपास भादा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शिंदे करीत आहेत.

११ ठिकाणी 'वन रुपी क्लिनिक'

भिवंडी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कपिल पाटील फौंडेशनच्या वतीने अवघ्या एक रुपयात मोफत उपचार करणारी आरोग्य केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून भिवंडी लोकसभा मतदारसंघातील ११ ठिकाणच्या नागरिकांना मोफत उपचाराची संधी उपलब्ध झाली आहे. आणखी काही ठिकाणी अशी केंद्रे सुरू करण्याचा मानस फौंडेशनने व्यक्त केला आहे. कपिल पाटील फौंडेशनच्या वतीने विविध सेवाभावी उपक्रम राबविले जातात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली फौंडेशनचे अध्यक्ष सुमित पुरुषोत्तम पाटील यांनी वन रुपी क्लिनिक सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. बदलापूर (पूर्व), बदलापूर (पश्चिम), टिटवाळा (पूर्व), पडघा, कसारा, मुरबाड, धसई, डोळखांब, किन्हवली, अंबाडी, सुरई फाटा येथे कायमस्वरूपी आरोग्य केंद्र सुरू केली जाणार आहेत. या केंद्राचे उद्या राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होईल. या केंद्रातून अवघ्या एक रुपयात नागरिकांना उपचाराची संधी उपलब्ध होणार आहे. शहरी भागातील गरीब रुग्णांबरोबरच ग्रामीण भागातील रुग्णांना वन रुपी क्लिनिकच्या माध्यमातून दर्जेदार उपचार उपलब्ध करण्यावर भर देण्यात येईल, असे फौंडेशनचे अध्यक्ष सुमित पाटील यांनी सांगितले.

पुतणीवर बलात्कार करणारा काका गजाआड

भिवंडी : काका पुतणीच्या नात्याला काळिमा फासल्याची घटना समोर आली आहे. १६ वर्षीय अल्पवयीन पुतणीवर ४८ वर्षीय काकाने बलात्कार केल्याची घटना भिवंडी तालुक्यातील एका गावात घडली आहे. धक्कदायक बाब म्हणजे पीडित अल्पवयीन मुलगी अपंग असून याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात भादंविच्या कलम ३७६ सह पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून पोलिसांनी नराधम काकाला बेड्या ठोकल्या आहेत. भिवंडी तालुक्यातील एका गावात पीडित अपंग अल्पवीयन मुलगी कुटुंबासह राहते. तर त्याच गावात नराधम काका ही राहतो. काही दिवसापूर्वी नराधम काकाने अल्पवयीन पुतणीवर बळजबरीने बलात्कार केला. मात्र या घटनेमुळे अपंग असलेली पीडिता मानिसकदृष्ट्या दबावाखाली होती. त्यामुळे घरच्यांनी तिच्याकडे रविवारी चौकशी केली असता, अत्याचाराची घटना समोर आली. त्यांनतर पीडितेच्या कुटूंबाने भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन पीडितेवर घडलेला प्रसंग सांगताच, पीडित मुलीची वैद्यकीय तपासणीही करण्यात येऊन नराधम काकावर बलात्कारासह पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला. दाखल गुन्ह्यावरून आरोपी काकाचा ठाणे जिल्हा ग्रामीण पोलिसांनी शोध सुरू केला असता, त्याला भिवंडी तालुक्यातील नाईकपाडा येथून अटक केल्याची माहिती पोलीस अधिकऱ्यानी दिली आहे. ज्याची अधिक चौकशी पोलीस करीत असून आज आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक वज्रेश्वरी शाखेचा दैनंदिन व्यवहार वाढणार!

कामकाजात शाखा व्यवस्थापकांचे विशेष लक्ष

भिवंडी/आकाश गायकवाड

तालुक्यातील वज्रेश्वरी येथील दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा पूर्वीपासूनच आहे.या बँकेचे कार्यक्षेत्र मोठे आहे. याचे कारण सर्व सामान्य लोकांची म्हणजेच, विशेषतः शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखली जाते. या शाखेचे व्यवस्थापक ठाणे येथील रहिवासी असणारे रविंद्र पाटील यांनी काही दिवसांपासून आपल्या शाखा व्यवस्थापक पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. त्यांची एकूण कामाची पद्धत आणि खातेदारांबरोबर सुसंवाद पाहिल्यावर आम्हां सारख्या जाणकार खातेदारांना अशी खात्री आहे की, यापुढील बँकेचे दैनंदिन व्यवहार चांगल्या प्रकारे वाढणार असे शाखा व्यवस्थापक यांच्या कामकाजावरून खातेदारांना दिसून येत आहे. कोणतीही बँक म्हटली म्हणजे, आर्थिक दृष्टीकोनातून व्यवसाय करणारी संस्था असते. अशा संस्थेचा कर्मचारी वर्ग यांच्या स्वभावगुणांवर बरेच काही अवलंबून असते. सद्यस्थितीत शाखा व्यवस्थापक रविंद्र पाटील हे अत्यंत मनमिळाऊ, सुस्वभावी आणि आपल्या शाखेत काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांबरोबर आपुलकीने वागणारे अधिकारी नव्हे तर, एक कुटुंब प्रमुख म्हणून, मैत्रीपूर्ण भावनेने आपली महत्त्वपूर्ण जबाबदारी सध्या निभावत असताना, आमच्या खातेदारांच्या निदर्शनास येत आहे. त्याचबरोबर बँकेत कार्यरत असणारे कॅशियर राजकुमार पाटील यांनी तर, आपल्या मानवतावादी सुस्वभावाने परिसरातील खातेदारांची जणू मनेच जिंकून घेतली आहेत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. तसेच शाखेतील ज्युनिअर लिपिक संतोष पिंगळे, वैष्णवी भोईर व चतुर्थ श्रेणी कर्मचारी अमोल पाटील, जयश्री पाटील, मयूर पाटील आदि सर्व कर्मचारी प्रत्येक खातेदारांशी सौजन्याने वागून, उत्तम प्रकारे खातेदारांना बँकींग सेवा पुरवित असल्याचे आमच्या अनेक वर्षापासूनच्या अनुभवातून दिसून येत आहे. दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा वज्रेश्वरी ही फार पूर्वीपासून कार्यरत असल्यामुळेच या शाखेत ठाणे जिल्ह्यातील वज्रेश्वरी, अकलोली, गणेशपुरी, उसगाव, भिवाळी, महाळूंगे, घोटगाव, वेढे, झिडके, अंबाडी, दिघाशी, कुंदे अशी असंख्य लहान-मोठी गावे. तसेच पालघर जिल्ह्यात परंतु वज्रेश्वरी नजीक असणारी गावे केळठण, गोराड, चांबळे, डाकिवली, लोहपे, अंबरभुई, नांदणी, गायगोठा, निंबवली, सायवन, भिनार, मेढे, आंबोडे अशा बहुसंख्य गाव खेड्यापाड्यातील वज्रेश्वरी शाखेमध्ये शेतकरीवर्ग, महिला बचतगट, शिक्षक व इतर खात्यातील कर्मचारीवर्ग, छोटे-मोठे व्यवसायिक या शाखेतून खातेदार म्हणून विविध स्वरूपाची कर्जे घेऊन, आपापल्या गरजा भागवीत आहेत. आणि सध्या या शाखेला लाभलेले शाखा व्यवस्थापक रविंद्र पाटील यांच्या कुशल कामगिरीमुळे बँकेचा दैनंदिन व्यवहार भविष्यात वाढणार, अशी असंख्य जाणकार खातेदार अपेक्षा व्यक्त करीत असतानाच, अशा प्रकारच्या बँकेतील गुणवान व कर्तव्यदक्ष अधिकारी-कर्मचारी यांची विशेष दखल बँकेचे चेअरमन-राजेंद्र पाटील आणि संचालक मंडळ यांनी घेऊन,त्यांच्या नोकरीत भविष्यात उत्तम सेवा करण्यासाठी प्रेरणा द्यावी, अशी जनमानसातील भावना आहे.

औसा गोंद्री शेत शिवारातील कुंटणखान्यावर औसा पोलिसांची धाड; तीन महिला तब्यात

औसा/प्रतिनिधी

औसा तालुक्यातील गोंद्री शेत शिवार परिसरात पैशाचे आमिष दाखवून एक व्यक्ति अवैधरित्या कुंटणखाना चालवित असताना औसा पोलिसांनी धाड मारुन तीन पिडीत महिलांना सुधारगृहात पाठवले आहे. लोदगा ते लातूर रस्त्यावर गोंद्री परिसरात एका शेतात पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीर कुंटणखाना चालविला जात असल्याची माहिती मिळाल्याने औसा पोलिसांनी याठिकाणी दि १६ सप्टेंबर २०२१ गुरुवार रोजी दुपारी धाड टाकली असता येथे गोरख जिड्डे रा.गोंद्री ता औसा हा आपल्या शेतात पत्र्याचे शेड मध्ये पैशाचे आमिष दाखवून महिलांना वेशा व्यवसाय करण्यास भाग पाडत असल्याचे आढळून आले. यावेळी तेथे तीन महिला आढळून आल्या. यामध्ये लामजना ता औसा येथील एक जण तर लातूरच्या बरकतनगर मधील एक व सिध्देश्वर मंदिर रोड भागातील एक महिलांचा समावेश आहे. या तिन्ही महिलांना सुधारगृहात पाठविण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान या प्रकरणातील मुख्य आरोपी गोरख जिड्डे हा फरार झाला आहे. या घटनेबाबत औशाच्या नूतन पोलिस उपनिरीक्षक निलम घोरपडे यांच्या फिर्यादीवरुन कलम ३,४,५,७ अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबतचा आधिक तपास पोलिस निरीक्षक शिवशंकर पटवारी हे करीत आहेत.

गणेश दर्शनावरुन परतणाऱ्या मायलेकराचा अपघाती मृत्यू

भिवंडी/प्रतिनिधी

सदैव वाहतूक कोंडीमुळे त्रस्त असलेल्या वाहनचालकां साठी मुमबी नाशिक महामार्गा वरील भिवंडी ठाणे बायपास रस्ता हा मृत्यूचा सापळा बनून राहिला आहे. गुरुवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास या रस्त्यावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकी वरील मायलेकराचा अपघाती मृत्यू झाला आहे. बेबीबाई बाळाराम काकडे वय ४८ व नितीन बाळाराम काकडे वय २६ रा आमणे पाडा ता.भिवंडी अशी मयतांची नावे आहेत. आमणे पाडा येथील हे दोघे आई व मुलगा दुचाकी वरून पुर्णा येथील आपल्या मुली कडे दुचाकी वरून गणपती दर्शना करीता गेले होते तेथे जेवण उरकून दुपारी ४ वाजताच्या सुमारास ते आपल्या घरी माघारी नाशिक वहिनी वरून जात असताना मानकोली गावाच्या हद्दीतील अरुणकुमार क्कारी समोरील रस्त्यावर त्यांना अज्ञात वाहनाने धडक दिली असता ते दुचाकी वरून तोल जाऊन पडल्याने त्यांच्या डोक्याला जबर मार लागला व अज्ञात वाहन त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. या घटनेने आमणे पाडा येथे शोककळा पसरली असून स्थानिक नारपोली पोलिसांनी अज्ञात वाहना विरोधात अपघातास जबाबदार धरून त्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दुर्गम भागातील डोंगरपाड्यासाठी विज पुरवठ्याची मागणी

वाडा/प्रतिनिधी

वाडा तालुक्यातील गारगाव पासून जवळच असलेल्या डोंगरपाडा या २५ पेक्षा जास्त घरे असलेल्या पाडा अजूनही वीज पुरवठ्यापासून वंचित राहिला आहे. या पाड्यातील घरांना विद्युत पुरवठा उपलब्ध करून येथील घरे प्रकाशमान होण्यासाठी वाडा तालुका कॉंग्रेस कमिटी सेवादलाचे अध्यक्ष जगदीश केणे यांनी वीज वितरण कंपनी कडे निवेदन देऊन मागणी केली आहे. पालघर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव अनंता वनगा व कार्यकर्त्यांनी दिनांक ६ सप्टेंबर रोजी डोंगरपाड्याला भेट दिली असता वीज पुरवठा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आल्याने येथील ग्रामपंचायत प्रशासनाशी चर्चा करून आवश्यक ती पूर्तता करून काँग्रेस सेवादलाच्या वतीने बुधवार दि.१४ सप्टेंबर रोजी निवेदन देऊन लवकरात लवकर या पाड्याला वीज पुरविणाची मागणी केली. या प्रसंगी पालघर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव अनंता वनगा, वाडा तालुका काँग्रेस सेवा दलाचे अध्यक्ष जगदीश केणे व कार्यकर्ते उपस्थित होते

चाकुर येथे आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा सत्कार



नळेगाव : समिती चाकुर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त तसेच मा.प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधुन प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुल लाभार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पं.स.चाकुर येथील आवारात साफसफाई करण्यात आली व मा प्रधानमंत्री मोदी साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आले. त्यावेळी गटविकास अधिकारी लोखंडे साहेब, सगविअ पुट्टेवाड साहेब, सभापती जमुनाताई बडे मॅडम, उपसभापती सज्जन कुमार लोणाळे साहेब, पंचायत समीती चाकुर येथील अधिकारी, कर्मचारी सर्व उपस्थित होते.

जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मायकल लुईस आल्मेडा (वय ६६) राहणार पंतरवाडी, आगाशी, विरार (पश्चिम) ता. वसई, जि. पालघर असे जाहीर करतो की, मी व माझे कुटुंबिय वरील ठिकाणी राहत असून आमची आजी रुमानबाई आ. लुसु उर्फ कै. मेरुबाई पास्कू दालमेत उर्फ आल्मेडा या दोन व्यक्ती नसून एकच व्यक्ती आहे व तिचा दि. १९/०८/१९६८ रोजी मृत्यू झाला आहे व तिच्या मृत्यूनंतर मी व माझे कुटुंबिय कायदेशीर वारसदार आहेत. तरी आमच्या सामुहिक मालकीची जमीन गाव मौजे आगाशी, ता. वसई जि. पालघर तलाठी सजा आगाशी, स.नं. ६९/२१, ६९/९, ६८/१, ६९/३१, ६९/३२ अशी मिळकत ७/१२ उताऱ्यावर माझी आजी रुमानबाई आ. लुसु उर्फ कै. मेरुबाई पास्कू दालमेत उर्फ आल्मेडा यांच्या नावे आहे. परंतु माझी आजी आता मयत असून मी व तिचे कुटुंबिय कायदेशीर वारसदार आहेत. अगर याबाबत कुणास काही हरकत असल्यास त्यांनी १४ (चौदा) दिवसांच्या आत वरील पत्त्यावर कळवावे.

सही/-
मायकल लुईस आल्मेडा

20 TO 26 SEPTEMBER 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 18/09/2021 7:59 PM Page 1

पान १ वरून....

अनैतिक कामक्रीडेची साक्षीदार झाली...

एक बहिण आणि तिचा मुलगा होता. पण त्या त्याचेकडे कधी जात नव्हत्या. दोनवेळा सकाळ संध्याकाळ ठरविक घरातून भिक्षा मागून आपल्या पोटाची खळगी त्या भरत होत्या. त्यांना कोणाचा आधार नसल्याने त्या कोणाच्या अध्यात मध्यात ही राहत नव्हत्या. त्यामुळे त्यांना कशाची चिता नव्हती. रविवार दि. १२ सप्टेबंर २०२१ रोजी रात्री ९.०० वाजणेच्या सुमारास गावातील बाळकृष्ण पोळ याचे घरासमोर त्याचा मृतदेह पडला असल्याचे गावातील लोकांच्या लक्षात आले. त्यांनी ही घटना मयत हिराबाई याच्या बहिणीचा मुलगा गौतम नलवडे यांना सांगितली. त्याने घटनास्थळी येवून बघितले असता, घटनास्थळी हिराबाई जगताप या मृतावस्थेत पडलेल्या होत्या. त्याच्या डोक्यात कुठल्यातरी जाड हत्यारोने वार केल्याने त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याचे दिसून येत होते. बहुदा कुणी तरी अज्ञातांनी त्याच्या डोक्यात जाड वस्तुने प्रहार केल्याने त्यात त्याचा मृत्यू झाल्याचे सकृत दर्शनी दिसून येत होते. ही खूनाची घटना असल्याने गौतम नलवडे यांनी या घटनेची माहिती वडुज पोलीस ठाण्याला कळविली. या खूनाच्या घटनेची माहिती वडुज पोलीसांना मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्ळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा आणि मृतदेहाचा पंचनामा करून सदर मृतदेह उतरीय तपासणीसाठी वडुज येथील सरकारी रुग्णालयात पाठवून देवून या घटनेची माहिती घेण्यास सुरूवात केली. मयत हिराबाई जगताप या निराधार आणि एकट्याच राहत असल्याने त्याचे तसे कुणाबरोबर जाती दुश्मनी किंवा शेत जमिनीचा वाद घराचा वाद नव्हता. मग त्याचा खून कुणी आणि कशासाठी केला याची खातरजमा पोलीस करीत असताना गावात ही त्याच्या खूनाविषयी वेगवगेळी चर्चा होताना दिसून येत होती. त्याचवेळी वडुज पोलीस स्टेशनचे स.पो.नी. देशमुख हे तेथे असलेल्या लोकांच्याकडून माहिती घेत असताना ते देवकर या पोलीसाला ही या घटनेची काही माहिती देत होते. त्याच्या मनात शंका कुंशंका अनेक होत्या. त्यातच अंधारात लपून बागल नावाचा एक इसम पोलीसाचा हा तपास बारकाईने पाहत होता. तसेच पोलीस घेत असलेली माहिती कानोकानी ऐकत होता. हे बघून स.पो.नी देशमुख हे देवकर याना म्हणाले, देवकर कुछ तो गडबड है म्हणत त्यांनी अंधारात लपून छपून माहिती ऐकणाऱ्या बागल याला संशयावरून ताब्यात घेतले. त्याच्याकडे मयत हिराबाई जगताप याच्या खूनाविषयी चौकशी केली असता त्याने त्याच्या खूनाविषयी पोलीसांना चक्रावून टाकरारी घटना सांगितली आणि येथेच हिरबाई जगताप या वृध्देच्या खूनाचा उलघडा करण्यात पोलीसाना यश आले. येलमारवाडी येथे तुळशीराम बागल हा आपल्या कुंटूंबासह राहयला आहे. त्याची पत्नी मुले असताना ही त्याचे गावातील संगीता देशमुख या महिलेशी विवाहबाहय अनैतिक संबंध चालू होते. सुरूवातीला त्या दोघांच्या संबंधाची कल्पना तशी कुणाला नव्हती. त्यामुळे त्या दोघांच्या संबंधाची चर्चा गावात नव्हती.संगीता ही चालू बाई असल्याने ती तुळशीराम बागल याच्या नादाला लागलेली होती. त्या दोघांचे संबंध हे फार पुढे गेलेले होते. तुळशीराम हा संगीताच्या घराकडे रोज रात्री चोरून येत होता.तिच्याबरोबर शारीरिक मजा मारून तो जात होता. संगीता ही दिसायला देखणी आणि चालू असल्याने घरात कुणी नसताना ती तुळशीरामला बोलावून घेवून आपल्या जवानीची खाज मिटवित होती. शारीरिक संबंधात तुळशीराम हा तिला तिच्या नवऱ्यापेक्षा ही भारी सुख देत असल्याने ती त्याला आपल्यां नागडया अंगावर ओढून घेत होती. त्या दोघांचे संबंध हे चोरी छुपे चालू असल्याने त्याच्या त्या संबंधाची कल्पना तशी गावात कुणाला नव्हती. संगीता तर गावात मी नाही त्यातली असे साळसुदपणाचा आव आणून वागत होती. संगीताच्या मदमस्त जवानीचा उपभोग घेणेसाठी म्हणून तुळशीराम हा रविवार ता.१२ सप्टेंबर २०२१ रोजी रात्रीच्या ९ते ९.३०च्या वाजणेच्या सुमारास तिच्या घरात गेला होता. तो आल्यावर संगीताने घराची कडी लावून घेतली होती. त्याला आपल्या बेडवर नेत आपल्या नागडया अंगावर ओढून घेत त्या दोघांचा तो कार्यक्रम चालू होता.तो तिच्या नागडया अंगावर पडून जोर जोरात धक्के मारत होता.खालून वरून तो तिला चोखत असताना ती ही त्याला मदहोश होऊन आपल्या अंगावर ओढून घेत होती. दोघे ही त्या कार्यक्रमात मग्न झाले होते. इतक्यात दरवाज्यावर हिराबाई आली. ती संगीताला पोरी काय असेल तर पोटाला वाढ म्हणून तिच्याकडे भिक्षा मागत होती.तिला बिचारीला काय माहित की आत मध्ये काय चालले आहे. ती दरवाज्यात उभी राहून दोन चार वेळा तिने संगीताला हाका मारल्या.ती काही ओ देईना म्हणून तिने दरवाजा ढकलला असता आतील बेडवर संगीता ही तुळशीरामबरोबर नग्न अवस्थेत होती. हिराबाईने तसाच दरवाजा पुढे ओढला तसे ती तेथून निघून जात असताना ते दोघे ही आपला कार्यक्रम अर्धवट सोडून ऐ म्हतारे काय झालं म्हणून बाहेर आले. तुळशीराम हा अर्धनग्न अवस्थेत होता. तर संगीता ही गाऊनवर तशीच बाहेर आली.आपल्या दोघांना या म्हातारीने रंगेहात पकडले आहे. त्यामुळे गावात जावून ही म्हतारी आपल्या संबंधाचा बोभाटा करणार म्हणून ते दोघे ही तिच्यावर खेकसत होते. संगीता चालू असल्याने ती हिराबाईला म्हणाली. ऐ म्हातारे, घरात काय बघितले ते कुणाला काही सांगशील तर गाठ आमच्याशी आहे असे म्हणत असताना तुळशीराम तिला म्हणाला, ही म्हातारी आता बोंब करणार तवा तिला आता येथेच गार करूया.त्याच्या या बोलण्याला संगीताने दुजोरा दिला. या म्हातारीला संपवं नाही तर उदया गावात आपली अब्रु राहणार नाही असे ती म्हणाली, आधीच त्या दोघांचा तो कार्यक्रम अर्धवट रहिला होता. त्यामुळे त्या दोघांची ती खाज ही मिटली नव्हती. त्यातच म्हातारीने दरवाजा उघडून सगळे काही बघितले होते. याचा राग त्या दोघांना आला होता. हिराबाई मी कुणाला काही बोलणार नाही, मी काही बघितले नाही म्हणून जात असतानाच त्या बाळकृष्ण पोळ याच्या घराशेजारी आल्या तेवढयात तुळशीरामने त्याच्या मागून येवून रागाच्या भरात हिराबाईच्या डोक्यात जाड लाकडी दांडके जोरात हाणले. त्या सरशी हिराबाई जोरात ओरडून खाली पडल्या. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्याने जागीच त्याचा मृत्यू झाला. रात्रीच्या अंधारात तुळशीराम बागल आणि संगीता देशमुख हे दोघे हिराबाईला मारून आपआपल्या घरी गेले होते. रात्री उशिरा या घटनेची माहिती गावातील लोकांना होताच घटनास्थळी लोकांची गर्दी जमली होती. भिक्षा मागणाऱ्या हिराबाई जगताप हिला कुणी तरी मारून टाकले आहे अशी चर्चा गावात होत होती. या घटनेची माहिती वडुज पोलीसांना समजातच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.या घटनेचा पोलीस तपास करीत असताना घटनास्थळी तुळशीराम बागल हा पोलीसाचा तपास चोरून पाहत होता. व चर्चा ही चोरून ऐकत होता. त्यामुळे पोलीसांचा संशय त्याच्यावर बळावल्याने पोलीसांनी त्याला संशयावरून ताब्यता घेऊन चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. गौतम नलवडे याच्या फिर्यादीवरून वडुज पोलीसांनी हिराबाई दगडू जगताप (वय ७०) या वृध्देच्या खून प्रकरणी तुळशीराम सखाराम बागल आणि त्याची प्रियेसी संगीता गणपत देशमुख रा.दोघे ही येलमारवाडी ता.खटाव याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता, मा.कोर्टाने त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी पोलीस सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी तुळशीराम बागल याचेकडून गुन्हयात वारपलेला लाकडी दांडका जप्त केला. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक धीरज पाटील, डीवायएसपी. डॉ.निलेश देशमुख याच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी मालोजीराव देशमुख, महिला पोलीस उपनिरीक्ष शीतल पालेकर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी केला.

जमिनीच्या मोहापायी २० एकर वाल्याला...

केला. त्याने सागरीबाईला तिचा पती प्रतापच्या रखवालीतून पळवून आणले. त्यानंतर दोघे पती पत्नीसारखे राहू लागले. दोघांनी एकमेकांसोबत लग्न केले. बघता बघता तिन वर्षाचा कालावधी लोटला. सागरीबाईचा लक्ष्मण भिल याच्यासोबत दुसरा संसार सुरु झाला होता. लक्ष्मण भिल याचा देखील सागरीबाईसोबत दुसरा विवाह होता. वीस एकर शेतमालकापेक्षा सागरीबाईला शंभर एकर जमीनदार जवळचा वाटला होता. पत्नी सागरीबाई लक्ष्मणसोबत पळून गेल्यामुळे प्रताप एकाकी पडला होता. सागरीबाई आणि लक्ष्मण या दोघांवर प्रतापचा राग होता. सागरीबाई चांगलीच हुशार होती. ती लक्ष्मणसोबत दुसरा विवाह करुन संसार करत होती. मात्र तरी देखील तिने पुर्वाश्रमीचा पती असलेल्या प्रतापची पत्नी असल्याचा हक्क कायम ठेवला होता. त्याच्या विस एकर शेतजमीनीवर तिची नजर होती. पहिला आणि दुसरा अशा दोघा पतींच्या शेतजमीनीची ती मालकीन होऊ इच्छीत होती. दुसरा पती, लक्ष्मणची तिला साथ लाभली होती. पहिली पत्नी असतांना देखील लक्ष्मण सागरीबाईचा सांभाळ करत होता. त्याच्या मार्गदर्शनाखाली ती पहिल्या पतीची विस एकर शेतजमीन हडपण्याच्या विचारात होती. प्रतापचा कायमचा काटा काढल्यानंतर त्याची शेतजमीन आपल्या मालकीची होईल हा कुविचार तिच्या व लक्ष्मणच्या मनात सुरु होता. त्या दृष्टीने सागरीबाई, लक्ष्मण व त्याचे नातेवाईक साथीदार प्रतापला ठार करण्याचे नियोजन करत होते. त्या नियोजनानुसार पाडळा शेतशिवारात एकटा सापडलेल्या प्रतापला संगनमताने लक्ष्मण वेरसिंग भिल, सागरीबाई लक्ष्मण भिल, झिंगला शहादा भिल, इस्माईल हसन तडवी, महेबुब कासम तडवी यांनी बांबू काठ्यांनी डोक्यावर बेदम मारहाण सुरु केली. त्यानंतर झिंगला शहादा भिल (रा. भसाली बोरी ता जि.बुऱ्हाणपूर) याने प्रतापचा गळा ठिबकच्या नळ्यांनी घट्ट आवळून त्यास अमानुषपणे ठार केले. एवढ्यावरच तो थांबला नाही तर त्याने प्रतापचा मृतदेह विहीरीत टाकून दिला. काही दिवसांनी प्रतापचा मृतदेह विहीरीतील पाण्यात फुगून वर आला. मृतदेह विहीरीच्या पाण्यावर तरंगत असल्याचे बघून टाल्या शहादा भिल व जितेंद्र सुरमल भिल आणि सुरमल छत्तरसिंग भिल यांनी प्रतापचा मृतदेह विहीरीच्या पाण्यातून बाहेर काढला. मृतदेहाचा पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांनी नागोरी नदीच्या नाल्याकाठी त्याला पुरले. प्रताप घरी परत आला नाही म्हणून त्याचे नातेवाईक हवालदिल झाले होते. त्यांनी त्याची काही दिवस वाट पाहिली मात्र तो घरी आलाच नाही. त्याचा शोध घेतला असता तो कुठेही आढळून आला नाही. त्यामुळे २० ऑगस्ट रोजी तो हरवल्याबाबत रावेर पोलिस स्टेशनला मिसींग दाखल करण्यात आली. सदर मिसींग रावेर पोलिस स्टेशनला ३६/२१ या क्रमांकाने नोंद करण्यात आली. मिसींग दाखल झाल्यानंतर पो.नि. रामदास वाकोडे यांनी विविध पथके तयार करत त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिसांचा लक्ष्मण वेरसिंग भिल व सागरीबाई भिल यांच्यावर संशय होता. पोलिसांच्या दृष्टीने बेपत्ता प्रतापच्या पत्नीला लक्ष्मण भिल याने पळवून आणले होते व तिच्यासोबत संसार देखील थाटला होता. पोलिसांनी लक्ष्मण वेरसिंग भिल व सागरीबाई भिल या दोघांना ताब्यात घेतल्यानंतर क्रमाक्रमाने तपासात इस्माईल हसन तडवी, मेहबूब कासम तडवी, टाल्या शहादा भील, जितेंद्र सुरमल भील, सुरमल छत्तरसिंग भील अशा एकुण सात संशयीतांना पाडळे व बुजुर्ग बुरहानपुर येथून ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. या प्रकरणी रावेर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. २८८/२०२१ भा.द.वि. ३०२, २०१, ३४ नुसार दाखल करण्यात आला. मयत प्रताप यास पुरलेल्या जागेतून बाहेर काढण्यात आले. नातेवाईकांनी मयत प्रतापची ओळख पटवली. तहसीलदार उषाराणी देवगुणे यांच्या उपस्थितीत जागेवरच पंचनामा आणि शवविच्छेदन पुर्ण करण्यात आले. अटकेतील सर्व सातही संशयीत आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांना न्यायालयाने सुरुवातीला पोलिस कोठडी सुनावली. या गुन्ह्याच्या तपासकामी रावेर पोलिस स्टेशनचे सपोनि शितलकुमार नाईक, पीएसआय मनोहर जाधव, मनोज वाघमारे, सहायक फौजदार राजेंद्र करोडपती, हे.कॉ. बिजू फत्तु जावरे, पोलिस नाईक जगदीश पाटील, पो.ना. महेंद्र सुरवाडे, पो.ना. नितीन डांबरे, पो. कॉ. सुरेश मेढे, पो. कॉ. प्रमोद पाटील, पो.कॉ. प्रदीप सपकाळे, पो.कॉ.सचिन घुगे,पो. कॉ. मनोज मस्के, पो. कॉ. सुकेश तडवी, हे.कॉ. गोपाळ पाटील, पो.ना. संजय मेढे, पो.कॉ. उमेश नरवाडे,पो. कॉ. श्रीराम कांगणे,पो. कॉ. कल्पेश आमोदकर, पो. कॉ. विशाल पाटील आदींनी तपासकामी सहभाग घेतला.

उधारीच्या पैशावरून दोघांत वाद झाला...

पानटपरी असल्याने त्याचा धंदा जोरात चालत होता. ते ओळखीच्या लोकांना उधारीवर पान गुटखा ही देत होते. त्याच्या पानटपरीवर गुटखा मावा, पान आदी चांगले मिळत असल्याने ग्राहकांची वर्दळ त्या पानटपरीवर रात्र आणि दिवस असत होती. दत्ता जंतीकट्टी हा त्याच्या पानटपरीवर गुटखा मावा खायला येत होता. तो शहापूर येथील भारतनगर येथील दुसरा क्रॉस येथे राहत होता. त्याची आणि पानटपरीवाला बाळकृष्ण शेट्टी यांची चांगली ओळख निर्माण झाली होती. दत्ता हा रात्री ९ ते १०च्या सुमारास शेट्टी याच्या पानटपरीवर दारू पिऊन येऊन पान खायला तर कधी गुटखा खायला येत होता. त्याच्याबरोबर त्याचे एक दोन मित्र ही असायचे त्यांना ही शेट्टी याच्या दुकानातून दत्ता हा आपल्या नावे गुटखा मावा खायला देत होता. दत्ता हा शेट्टी याचे कायमचे ग्रिहाईक असल्याने ते ही त्याला उधारीवर गुटखा मावा खायला देत होता. अर्थात तो त्याच्या धंदयाचा भाग होता. उधारीवर पान गुटखा खायला देत असताना शेट्टी हे दत्ता याला आपण उधारीवर देत आहोत मला ते पैसे चार आठ दिवसात परत पाहिजे असे बाजावत होते. अलिकडे दत्तालाही जास्त काम नसल्यानेत त्याच्या हातात पैसे कमी येत होते. हे पैसे त्याच्या दारू गुटख्यालाच संपत होते.दारूच्या नशेत दत्ता हा पानटपरीवर आला की तो जास्तवेळे त्याच्याबरोबर बडबडत बसत नंतर गुटखा मावा खावून जात होता. अलिकडे दत्ताची उधारी जास्त झाली होती.त्यामुळे शेट्टी हे त्याला जास्त उधारीवर माल दयायला बघत नव्हते.तरीही दत्ता त्याचे कडे उधारीवर गुटखा मावा मागत होता. मी काय पळून जातोय काय?तुझी उधारी देवून टाकतो, तू कशाला काळजी करतोस असे म्हणून शेट्टी याचेकडून गुटखा मावा घेऊन खात होता. शेट्टी हे त्याला प्रत्येकवेळी माल देताना उधारीची आठवण करून देत होते. पण दत्ता हा आपली वेळ मारून नेत होता. आता शेट्टी याचेकडे दत्ताची उधारी जास्त झाली होती. ती जवळपास १००० ते १५००पर्यत होती. उधारी जास्त झाल्याने शेट्टी हे त्याला गुटखा मावा देत नव्हते आधी मागची उधारी दे.मग परत तू गुटखा मावा खात जा असे त्यांनी त्याला बजावले होते एकदा दोनदा त्यांनी त्याला उधारीवर गुटखा मावा खायला दयायला नकार ही दिला होता. त्यावेळी रागाच्या भरात दत्ताने शेट्टी यांना नको नको ते बोलले होते.त्यावेळी तो दारूच्या नशेत असल्याने शेट्टी हे त्याचे बोलणे ऐकून गप्प बसले होते. दारूच्या नशेत दत्ता शेट्टी यांना म्हणाला की, बाहेर गावाहून धंदा करायला बेळगावात आला आहेस.जरा जपून धंदा कर.आम्ही काय तुझी उधारी बुडवत नाही.काय गाव सोडून पळून जात नाही. असे बोलून त्याला गप्प बसविले होते.त्यानंतर ही दोन चार दिवसांनी दत्ता हा परत शेट्टी याच्या पानटपरीवर आला होता.त्यावेळी त्याने शेट्टी यांना दादागिरी करून त्याचेकडून गुटखा खाल्ला होता. त्यावेळी ही दत्ता याने शेट्टी यालाच दम दिला होता आता शेट्टी हा दत्तावर चांगलाच चिडला होता.तो आधी माझी उधारीचे पैसे टाक, मग पुढचे बोल असे सुनावले होते. त्यावेळी झालेल्या भांडणात बाळकृष्ण शेट्टी यांनी दत्ताचा अनरॉईड मोबाईल काढून घेतला होता. माझी उधारी दे. आणि तुझा मोबाईल परत घेवून जा. असा दम दिला होता. त्यामुळे दत्ता त्यांना मारायला गेला. त्यावेळी त्या दोघाचे भांडण तेथे असणाऱ्या काही लोकांनी मिटवले होते. मंगळवार दि.१४ रोजी रात्री ९ ते ९.३०च्या सुमारास दत्ता हा परत शेट्टी याच्या पानटपरीवर दारू पिऊन आला होता. काल शेट्टी यांनी त्याचा मोबाईल काढून घेतल्याने त्याला त्याचा राग आला होता. तो दारूच्या नशेत येवून माझा मोबाईल मला परत बोलाने दे. नाही तर तुझी पानटपरीच विस्कटतो, मी काय तुझी उधारी देत नाही, तुला काय करायचे ते कर म्हणून वाद घालीत भांडण काढीत होता. त्यावेळी शेट्टी यांनी चार लोकांना बोलावून घेतले. त्या चार लोकांनी ही त्या दोघांचे बोलणे ऐकून घेतल्यावर दारूच्या नशेत असणाऱ्या दत्ताला तुला उधारी दयायचे होत नाही तर गुटखा सिगारेट घेतोस कशाला?आधी त्याची उधारी आणून दे मग तुझा मोबाईल परत घेवून जा. तो काही तुझा मोबाईल काढून घेत नाही, उधारीची रक्कम परत दिलास की तो तुझा मोबाईल तुला परत देईल अशी समज दिली. चार लोकांनी त्याला बोलले आवडले नाही. ते पंच लोक ही शेट्टी याच्या बाजूनेच बोलल्याने त्याला त्याचा ही राग आला होता. या भांडणात त्यावेळी रात्री दुकान बंद करायला उशीर होतोय म्हणून शेट्टी हे ही आपली पानटपरी बंद करून आपल्या लक्ष्मीनगर येथील घरी निघून गेले. त्यामुळे दत्ता याला त्याचा जास्तच राग आला. माझा मोबाईल परत देत नाही म्हणजे काय? आणि तो मोबाईल परत कसा देत नाही हे मी बघतोच म्हणत काही वेळाने दत्ता हा वडगाव येथील बाळकृष्ण शेट्टी याच्या घराकडे गेला. आधीच मोबाईल काढून घेतल्याने दत्ताचा इगो दुखावला गेला होता. त्याने शेट्टी याच्या घराकडे जाण्यापूर्वी परत एक क्वाटर आपल्या घशाखाली रिचवली. त्या नशेतच तो त्याच्या घरासमोर येवून वाद घालीत भांडण काढत होता. तो शेट्टी याच्या अंगावर मारायला जात होता. त्यावेळी शेट्टी यांनी त्याला तू वाद घालू नकोस, माझ्या उधारीचे पैसे आणून दे आणि तुझा मोबाईल घेवून जा असे बजावून सांगितले. तु माझा मोबाईल कसा देत नाहीस ते मी बघतोच म्हणत दत्ता याने आपल्या खिशातील चाकू काढला आणि बाळकृष्ण शेट्टी याच्या पोटावर, मानेवर आणि गळ्यावर वार केले. त्यासरशी बेसावध असलेल्या शेट्टी हे रक्ताच्या थारोळ्यात ओरडत खाली पडले.त्याच्या ओरडण्याने आजुबाजुचे लोक बाहेर आले. तो पर्यत दत्ता हा त्याचेवर वार करून तेथून पळून गेला. गंभीर अवस्थेत असलेल्या शेट्टी यांना जमलेल्या लोकांनी उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले.परंतू तेथील उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले.या घटनेची माहिती लगेच शहापूर पोलीसांना देण्यात आल्यावर शहापूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.तेथून माहिती घेवून पोलीस दवाखान्यात आले. पोलीसांनी मयाताच पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात हलविला. पोस्ट मार्टम नंतर पोलीसांनी शेट्टी याचा मृतदेह नातेवाईकांच्या सर्पूद करण्यात आला. पोलीस या घटनेची माहिती घेत असताना ही घटना नेमकी कोणत्या कारणातून घडली आहे याची माहिती मिळाल्याने पोलीसांनी संशयीत दत्ता जंतीकट्टी याचा शोध घ्यायला सुरूवात केली. काही वेळातच तो पोलीसांच्या हाती लागल्याने पोलीसांनी त्याला ताब्यात घेवून शहापूर पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता तो पुर्ण दारूच्या नशेत असल्याने पोलीसांना काही सांगू शकला नाही. त्याची दारूची नशा उतरल्यावर पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. या घटनेची फिर्याद मयत बाळकृष्ण शेट्टी याचा नातेवाईक हॉटेल व्यवसायीक नागराज शेट्टी यांनी शहापूर पोलीसात दिली असल्याने पोलीसांनी बाळकृष्ण नागेश शेट्टी (वय ५०) रा.वडगाव याच्या खून प्रकरणी दत्ता शिवाप्पा जंतकट्टी (वय ४०) रा.शहापूर बेळगाव याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर हजर केले असता. मा.कोर्टाने त्याची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली.या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला.या घटनेचा पुढील तपास वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनायक बडीगेर हे करीत आहेत.

संशयामुळे त्याचा संसार उध्वस्त झाला...

करीत भांडण काढत होता. परंतु कोमल काही तशी नव्हती. त्यानेच आपल्या मनात तसा संशय निर्माण करून घेतला होता. भांडणात ती त्याला मी तशी वागणार नाही, उगाच तुमच्या मनात काही तरी गैरसमज निर्माण करून घेवू नका असे सांगितले होते. परंतु निशिकांतच्या मनात एकदा का तिच्या चारित्र्याच्या संशयाने घर केले असल्याने तो काही तिचे म्हणणे मान्य करायला तयार नव्हता. उलट तो तिला तु तुझ्या मोबाईलवरून तास न तास कुणाबरोबर हसत खेळत बोलत असतेस. मी कामावर गेलो की तु कोणाबरोबर रंगरलिया करीत असतेस असे म्हणून तिच्याबरोबर भांडण उकरून काढत होता. त्याच्या मनात तिच्याविषयी संशय तयार झाल्याने तो सैरभैर झाला होता. त्यातूनच तो दारू पिण्याच्या व्यसनाच्या आहारी गेला होता. दारू पिऊन घरी आला की पत्नी कोमल हिला मुलासमोरच अर्वाच्च भाषेत बोलून शिव्या देत तिला जबर मारहाण करीत होता. त्याच्या या वागण्याला ती बिचारी कंटाळली होती. पती निशिकांत हा दारू पिऊन येऊन नको त्या शिव्या देवून मारहाण करीत असल्याची तक्रार तिने माहेरी आपल्या अशई वडिलाकडे केली होती. त्यांनी ही त्याला आपली मुलगी चांगली वागणाऱ्यातील असून ती संस्कारीत आहे. तिच्यावर आम्ही चांगले संस्कार केले आहेत. उगाच तुमच्या मनात नको तसले घाणेरडे विचार आणून नका.तिला मारहाण करून त्रास देवू नका असे बजावले होते.त्यांनी त्याची समजूत काढल्यावर तेवढयापुरते तो हो म्हणाला होता. नंतर मात्र त्याचे पुढचे तसे मागचे चालू होते. अलिकडे तर तो कोमलवर चोरून वॉच ठेवीत होता.ती कुठे जाते. कुणाबरोबर काय बोलते, तिच्या मोबाईलवर कोणा कोणाचे फोन येतात याचा तो शोध घेत होता.एवढे करून ही त्याच्या हाताला तिच्याविषयी काही लागले नव्हते. तरीही त्याचे मन तिच्या चारित्र्याच्या संशयाने पोखरलेले होते.त्याच्या मनाने एवढी खात्री करून घेतली होती की, कोमल ही परपुरूषाच्या नादाला लागली आहे ती स्वैर वागत असल्याने आपला संसार विस्कटला आहे. आता आपले कसे होणार? आपल्या मुलाचे कसे होणार हा विचार त्याच्या मनात सतत येत होता. तो निव्वळ त्याच्या मनाचा भ्रम होता. बाकी काही नव्हते. कोमल हिने किती ही त्याला समजावून सांगितले की, मी त्यातली बाई नाही, माझे कुणाबरोबर तसले संबंध नाहीत तरी तो तिच्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हता. त्याच्या विश्वासाला तडा गेल्याचे तो मानत होता. त्यामुळे त्या दोघा नवरा बायकोचे भांडण मिटण्याऐवजी वाढतच चालले होते.

आपली पत्नी बदचलन आणि बदफैली असल्याचे त्याची खात्री झाली होती.आपल्या माघारी तिचे लफडे चालू असते.आपण कामावर गेलो की ती दुसऱ्या तरूणाला आपल्या अंगावर घेऊन खेळवते आणि त्याच्याबरोबर मजा मारत असते असे त्याला वाटत होते.त्यातच कोमल ही निशिकांत हा दररोज भांडण काढून तिला मारहाण करीत असल्याने ती रात्रीच्यावेळी त्याला आपल्या अंगाला हात ही लावू देत नव्हती. त्यामुळे आणखीनच त्याच्या मनाचा संशय गडद झाला होता. तिचे बाहेर लफडे असल्याने ती आपल्याला तिच्या अंगाला हात लावू देत नाही अशी त्याची खात्री झाली होती.तिने आपला विश्वास घात केला आहे. फसवले आहे म्हणून ती अशी वागते त्यामुळे आपल्या जीवनात आता काही उरले नाही त्यामुळे तो आता वेगळ्या विचारात होता. आपल्या मनातील खंत आणि कोमल हिचे वागणे त्याने आपल्या चुलत भावाला म्हणजे संतोष चव्हाण याला सांगितले होते. त्याने त्याला तू तसला मनात विचार आणू नकोस. वहिनी तसली नाही असे समजावून सांगितले परंतू निशिकांत हा त्याला म्हणाला,मला माझ्या बायकोबद्दल चांगलेच माहित आहे. तू काही तिची बाजू घेवून बोलू नकोस आता मीच काय करायचे ते करतो असे त्याने त्याला सुचकपणे बोलले होते.

बुधवार दि.१५ सप्टेंबर रोजी तो नेहमीप्रमाणे कामावरून येताना दारू ठोसून घरी आला.घरी येताच त्याने कोमलबरोबर वाद उकरून काढून तिला शिव्या देत मारहाण करीत सांग तुझा यार कोण आहे? तु त्याचेबरोबर किती वेळा गेली आहेस? असे म्हणत तिचा उद्दार करीत होता. त्या रात्री त्याने तिला जबर मारहाण केली होती. तो तिला मारून मारून दमला होता. त्यामुळे ती आपल्या दोन्ही मुलाना घेवून आतील खोलीत तशीच न जेवता झोपली होती. रात्री त्याचा राग शांत झाल्यावर तो तिच्याजवळ त्या कामासाठी गेला. त्याने तिला हलवून उठविण्याचा प्रयत्न केला. पण तिने त्याला झिडकारत बाजूला ढकलून देवून मी जाच्याबरोबर माझे संबंध आहेत त्याच्याबरोबरच मी झोपणार आहे तुम्ही माझ्या अंगाला हात लावू नका असे रागाने फणफणत म्हणाली. तिने त्याला बाजूला ढकलून दिल्याने तिचा राग त्याला आला होता. तो रागाने बाहेरच्या खोलीत झोपयला आला. त्याला झोप काही लागत नव्हती. त्याच्या मनात सतत तिच्या चारित्र्याचा संशय घोळत होता. तिने उगाच आपल्याला बाजुला ढकलून दिले नाही, तिचे कुणाबरोबर तरी संबंध आहेत ती त्याच्याबरोबर मजा मारते म्हणून तर ती आपल्याला अंगाला हात लावू दिला नाही याचा त्याने वेगळचा अर्थ काढला. मध्यरात्रीपर्यत त्याला झोप येत नव्हती. त्यातच त्याने उठून बघितले तर ती गाढ झोपेत होती. तिचा गाऊन मांडयापर्यत वर सरकलेला होता. बायकोच्या जवानीवर आपला हक्क नाही त्यामुळे ही दोन मुले तरी आपली आहेत की नाही याचा त्याच्या मनात विचार डोकावून घेतला. तो त्या विचाराने सैरभैर झाला होता. आपल्या जीवनात काहीच अर्थ नाही त्यामुळे आपण जगून तरी काय फायदा असा त्याने विचार केला. त्या विचारातूनच तो गाढ झोपलेल्या कोमल जवळ गेला. त्याने तिला परत हलवून उठविण्याच प्रयत्न केला.पण ती काही जागी होत नव्हती. तो तिच्याकडे रागाने बघत फणफणत होता. त्याने कपाटातून नॉयनॉलची दोरी काढली आणि ती दोरी कोमलच्या गळ्याभोवती इतकी जोरात आवळली की, तिला काहीच हालचाल करता आली नाही. क्षणार्धात त्याने त्या दोरीचा फास इतका घट्ट आवळला की ती जागीच मरण पावली. झोपेत त्याने तिचा गळा आवळ्याने तिला काहीच हालचाल करता आली नाही. तिचा जागीच मृत्यू झाल्याचे बघून तो हतबल झाला. त्याने आपल्या दोन्ही मुलाकडे एकदा बघून आपण ही आता आत्महत्या करावी असा त्याने विचार केला. त्यापूर्वी त्याने आपला चुलत भाऊ संतोष चव्हाण याला त्याचे मोबाईलवर फोन करून सांगितले की मी माझी बायको कोमल हिचा नायनॉलच्या दोरीने गळा आवळून खून केला असून आता मी ही आत्महत्या करीत आहे. हे ऐकून संतोष त्याला समजावण्यचा प्रयत्न करीत असताना त्याने फोन कट केला.संतोष याने त्याला परत फोन लावण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा फोन लागत नव्हता. म्हणून तो पहाटेच्या सुमारास कणेरी येथील माधवनगर येथे मोटार सायकलने आला.निशिकांत राहत असलेल्या घराचा दरवाजा आतून बंद होता. घर मालक दिलीप पोवार याच्या मदतीने त्याने दरवाजा तोडून आत गेले तर खोलीत एका बाजूला निशिकांत याची पत्नी कोमल ही मृतावस्थेत पडली असल्याचे आणि तिच्या गळ्याभोवती दोरी अडकवलेली दिसत होती. तर दुसऱ्या बाजुला निशिकांतच्या गळ्यात ही फास अडकवलेला दिसत होता. त्याने फास लावताना दोरी तुटल्याने तो खाली बेशुध्द पडला होता. हे बघून घर मालक दिलीप पोवार आणि संतोष चव्हाण यांनी या घटनेची माहिती गोकुळ शिरगाव पोलीस स्टेशनला दिली. तो पर्यत त्या दोघांनी गंभीर जखमी असलेल्या निशिकांत याला उपचारासाठी एका खाजगी दवाखान्यात नेले.तेथे त्याची परिस्थिती गंभीर असल्याने डॉक्टरांनी लगेच त्याचेवर उपचार सुरू केले. पोलीसांना ही घटना समजल्याने त्यांनी तातडीने घटनास्ळ गाठून मयताचा आणि घटनास्थळचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रूग्णालयात दाखल करून या घटनेची माहिती मयत कोमल हिच्या माहेरच्या लोकांना दिली. ही माहिती समजल्यावर ते ही तातडीने

20 TO 26 SEPTEMBER 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 18/09/2021 7:59 PM Page 1

महाराष्ट्रातील दोन परिचारिकांना राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल' पुरस्कार

नवी दिल्ली/प्रतिनिधी

आरोग्य क्षेत्राचा कणा असणाऱ्या परिचारिकांना बुधवारी सायंकाळी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 'राष्ट्रीय फ्लौरेन्स नाइटिंगेल' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील दोन परिचारिकांचा समावेश आहे. १२ मे रोजी 'फ्लौरेन्स नाइटिंगेल' यांच्या जन्मदिन हा 'आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन' म्हणून साजरा केला जातो. कोरोना महामारीची साथ मागील वर्षापासून सुरू असल्यामुळे यावर्षी १२ मे रोजी हा कार्यक्रम होऊ शकला नाही. बुधवारी दुरस्थ प्रणालीच्या माध्यमातून वर्ष २०२० चे राष्ट्रीय फ्लौरेन्स नाइटिंगेल' पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय आरोग्य तथा कुंटुब कल्याण मंत्री मनसुख मांडविया, केंद्रीय राज्य आरोग्य तथा कुटुंब कल्याण मंत्री डॉ. भारती पवार या उपस्थित होत्या. जळगाव जिल्ह्यातील खुर्द येथील उपकेंद्रातील प्रेमलता संजय पाटील या ऑग्जिलिएरी नर्स मिडवाइव्स (एएनएम) आहेत. मागील १४ वर्षापासून त्या आरोग्य सेवेत कार्यरत आहेत. श्रीमती पाटील महिलांना समुपदेशन करण्याचे काम उत्तम प्रकारे पार पाडतात. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातंर्गत असणारी कामे त्यांनी चोख पार पाडली आहेत, त्यांच्या या कार्यासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिल्हा सामान्य रूग्णालय, गडचिरोली येथील आंतर रूग्ण विभागाच्या परिचारिका शालिनी नाजुकराव कुमरे यांनाही राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचा परिचारिका क्षेत्रातील ३५ वर्षाचा अनुभव आहे. श्रीमती कुमरे आपले काम पूर्ण क्षमतेने पार पाडतात. आपत्कालिन जीवन रक्षात्मक प्रणाली (Emergency life saving machine) त्या सक्षमपणे सांभाळतात. यासह त्या नक्षलग्रस्त भागात चांगली कामगिरी बजावत आहेत. आरोग्य क्षेत्रातील अतशिय महत्वाचा भाग असणाऱ्या 'अवयव दान' क्षेत्रातही त्या काम करतात. प्रदान करण्यात आलेले पुरस्कार वर्ष २०२० असून एकूण ५१ परिचारिकांना 'राष्ट्रीय फ्लौरेन्स नाइटिंगेल' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वरूपात पदक, प्रशस्तीपत्र आणि ५० हजार रूपये रोख प्रदान करण्यात आले आहे. हा पुरस्कार १९७३ पासून देण्यात येत आहे.

देवणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वकिल संघाच्या तालुकाध्यक्षपदी ॲड.सिद्धार्थ सावंत यांची निवड

देवणी/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी देवणी लीगल सेलच्या तालुकाध्यक्षपदी ड सिद्धार्थ सावंत यांची निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे देवणी तालुकाध्यक्ष प्रा.अनिल इंगोले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव मनोज कन्नाडे देवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अनिल रोट्टे, अमोल येणगे, संदिप पाटील, उपसरपंच अंकुश माने, अमरदीप बोरे, प्रशांत घोलपे, उपस्थित होते. या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष आमदार बाबासाहेब पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुरज चव्हाण, ज्येष्ठ नेते पंडितराव धुमाळ, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे लिगल सेल जिल्हाध्यक्ष पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चंदन पाटील नागराळकर यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

'एनसीएलटी'तर्फे लिंकन पॅरेंटरल, लिंकन फार्मास्युटिकल्सच्या एकत्रीकरण योजनेला मंजुरी

मुंबई/प्रतिनिधी

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, (NCLT) ने लिंकन पॅरेंटरल लिमिटेड आणि लिंकन फार्मास्युटिकल्स लिमिटेडच्या कलम २३० ते २३२ आणि कंपनी अधिनियम, २०१३च्या इतर वैध तरतुदींनुसार एकत्रिकरण योजनेला मंजुरी दिली आहे. हे अपेक्षित आहे की हे एकत्रीकरण एकत्रित अस्तित्वाची कार्यक्षमता एकत्रित करून त्याची स्पर्धात्मकता, खर्च-प्रभावीता आणि उत्पादकता वाढवणार आहे. माननीय एनसीएलटी आदेशाची प्रमाणित प्रत रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, गुजरात यांच्याकडे नोंदणी केल्यानंतर ही योजना लागू होईल. लिंकन पॅरेंटरल लिमिटेड ही लिंकन फार्मास्युटिकल्स लिमिटेडची उपकंपनी आहे, जी लहान पॅरेंटरल इंजेक्शन उत्पादनांच्या व्यवसायात गुंतलेली आहे. लिंकन पॅरेंटरलने मार्च २०२१ मध्ये संपलेल्या वर्षासाठी ४४.६४ कोटी रुपयांची उलाढाल आणि १.८४ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला. मार्च २०२१ पर्यंत लिंकन फार्मास्युटिकल्स लिमिटेडकडे लिंकन पॅरेंटरल लिमिटेडमध्ये ९८.५८. टक्के हिस्सा आहे. यावेळी बोलताना लिंकन फार्मास्युटिकल्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक महेंद्र पटेल म्हणाले, कॉर्पोरेट पुनर्रचनेमुळे दोन्ही कंपन्यांमध्ये समन्वय निर्माण होईल, त्यांची स्पर्धात्मकता वाढेल, खर्च कमी होईल आणि कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढेल, रसद स्थिती सुधारेल, त्यामुळे त्यांची स्पर्धात्मकता सुधारेल. भविष्यातील विकासास प्रोत्साहन दिले जाईल. आम्हाला खात्री आहे की आमचा महसूल, मार्जिन आणि नफा चालू आर्थिक वर्षमध्ये वाढत राहील. आमचे धोरणात्मक वाढीचे उपक्रम, उत्पादन आणि भौगोलिक विस्तार, परिचालन कार्यक्षमता आणि कर्जमुक्त स्थिती पाहता, सर्व भागधारकांना जवळच्या ते मध्यम कालावधीत फायदा होईल.

महामार्ग पोलीस मदत केंद्र, लातूरच्या वतीने चालक दिन साजरा

लातूर/करकरे अंबादास

डॉ. भूषणकुमार उपाध्याय, अपर पोलीस महासंचालक (वा) महाराष्ट्र राज्य मुंबई, तसेच डॉ.अनिता जमादार मॅडम पोलीस अधिक्षक महामार्ग पोलीस औरंगाबाद प्रादेशिक विभाग, डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस उप अधिक्षक प्रादेशिक विभाग, औरंगाबाद व पोलीस निरीक्षक अरुण केंद्रे साहेब, पोलीस निरीक्षक नांदेड विभाग, यांचे मार्गदर्शनखाली महामार्ग पोलीस मदत केंद्र, लातूर येथे चालक दिन साजरा करून ट्रक चालकांसह महामार्गावरुन जाणारे वाहन चालक यांना वाहतूक नियमांचे पालन करण्या बाबत प्रबोधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्या वेळी खालील प्रमाणे वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आले. व सर्वांना अल्प उपहार देऊन, गुलाब पुष्पगुच्छ व मास्क वाटप करण्यात आले. १) अवजड वाहन नेहमी तिसऱ्या लेन मध्ये चालवावे २) वाहन चालवितांना मोबाईल फोनचा वापर टाळावा ३) गाडीचे कागदपत्रे नेहमी सोबत ठेवावी. ४) टिबल सिट प्रवास करु नये. ५) दारू पिवून वाहन चालवू नये. ६) समोरील वाहन केव्हा पण थांबू शकते म्हणून सुरक्षित अंतर ठेवून वाहन चालवावे. ७) ओव्हरटेक करतांना समोरील रोड क्लियर असल्याबाबत खात्री करूनच ओव्हरटेक करावे. ८) नेहमी ओव्हरटेक करतांना उजव्या बाजूने करावे. ९) वाहन चालविताना वेग मर्यादाचे पालन करावे १०) विरुद्ध दिशेने वाहन चालवू नये. ११) अपघात समयी माणुसकी जपून मदत करावी. १२) चारचाकी वाहन चालवताना सिटबेल्ट वापरावे. याबाबत मार्गदर्शन करुन मृत्युंजय दूत संकल्पनेची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच स्व.बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची माहिती देण्यात आली. तसेच महामार्ग पोलिस केंद्र, लातूर येथील पोउपनि. जमादार, पोउपनि. पवार व पोलीस अंमलदार हे हजर होते.

नेरूर येथील सुहास धोंडी पंदुरकर यांच्या घरात प्रतिष्ठापना केलेली गणेशाची आकर्षक मुर्ती.

बदलापूर आर्ट गॅलरीत जळगावमधील कलावंतांच्या गणेश कलाकृती

जळगाव/प्रतिनिधी

ठाणे परिसरातील बदलापूरच्या प्रसिद्ध आर्ट गॅलरीमध्ये मान्यवर कलावंतांच्या सोबतीला जळगावच्या कलावंतांनी साकारलेल्या कलाकृती भाविकांना पाहता येत आहेत. जलरंग, ड्राय पेस्टल, ॲक्रलिक अशा विविध माध्यमांतून गॅलरीमध्ये १२२ च्यावर गणेशाच्या कलाकृती अवतरल्या आहेत. यामध्ये वैविध्यपूर्ण, कलात्मक आणि कल्पक अशा पाच जळगावकरांच्या कलाकृतींचाही समावेश आहे.

चित्रकार आणि चित्रकला, शिल्पकलेला प्रोत्साहन देण्यासाठी बदलापूर आर्ट गॅलरीने हा उपक्रम राबविला आहे. गणेशोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या या प्रदर्शनात महाराष्ट्रातील अनेक दिवंगत, ज्येष्ठ आणि नव्या दमाच्या कलाकारांच्या कलाकृतींचा समावेश करण्यात आल्याचे गॅलरीचे अध्यक्ष श्रीकांत जाधव यांनी सांगितले. कोल्हापूर येथील आबालाल रहेमान यांनी साकारलेले गणपतीचे चित्र ज्येष्ठ चित्रकार सुहास बहुलकर यांच्याकडून गॅलरीसाठी उपलब्ध झाले, ते चित्र या प्रदर्शनात आहे. तसेच बद्रीनारायण, संभाजी कदम, ग.ना.जाधव यासारख्या दिवंगत चित्रकारांनी रेखाटलेली सुबक चित्रे नव्या पिढीला कळावीत यासाठी या प्रदर्शनात ठेवण्यात आली आहेत. यासह ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत, सुहास बहुलकर, श्रीकांत जाधव, विजयराज बोधनकर, प्रतिमा वैद्य, कैलास संन्याल या प्रसिद्ध कलावंतांच्याही कलाकृती यामध्ये आहेत. कलाक्षेत्रातील मान्यवरांसोबत जळगावमधील चित्रकार राजू बाविस्कर, शाम कुमावत, यशवंत गरूड यांच्यासह जैन इरिगेशनच्या आर्ट विभागातील चित्रकार विजय जैन, आनंद पाटील यांच्या वैविध्यपूर्ण, कलात्मक आणि कल्पक अशा कलाकृती बदलापूर आर्ट गॅलरीमध्ये अवतरल्या आहेत. जळगावमधील कलावंतांसाठी ही बाब भूषणावह आहे. मंगलमूर्तीच्या विविध रूपांच्या रंगरेषांच्या गणेश कलाकृतींचे प्रदर्शन दि.९ ते २५ सप्टेंबरपर्यंत पाहता येणार असून सायंकाळी ५ ते ९ यावेळेत सर्वांसाठी खुले असणार आहे.

भारत आत्मनिर्भर झाल्यास महाशक्ती होऊ शकतो -दीपक करंजीकर

९/११च्या निमित्ताने अनुभूती निवासी शाळेमध्ये ऑनलाईन सुसंवाद

जळगाव/प्रतिनिधी

जगाच्या इतिहासात अनेक मोठ्या घटना घडल्या आहेत, त्या घटनांचा परिणाम जगातील अर्थकारणावर होत असतो. आणि भारत याला अपवाद नाही. भारत आत्मनिर्भर झाल्यास आगामी काळात महाशक्ती होऊ शकतो असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, लेखक व अभिनेता दीपक करंजीकर यांनी अनुभूती आतंरराष्ट्रीय निवासी शाळेच्या विद्यार्थ्यांशी ऑनलाईन सुसंवाद साधतांना केले. जागतिक स्तरावरील घटनांचा वेध घेणारे 'घातसुत्र' पुस्तकामुळे दीपक करंजीकर यांची मराठी साहित्य व अर्थ क्षेत्रात स्वतंत्र ओळख आहे. त्यांनी ९/११ च्या निमित्ताने अमेरिकेतील स्थिती व त्याचा जगावर झालेला परिणाम यांचा वेध ओघवत्या वक्तृत्व शैलीत घेतला. ११ सप्टेंबर २००१ रोजी वर्ल्ड ट्रेड सेंटवरील हल्ला व त्यामागील घटनांचे वास्तव, अभ्यासात्मक विश्लेषण विद्यार्थ्यांसमोर मांडले. यासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना शोधक व अभ्यासक बनण्याच्या दृष्टीने फक्त प्रयत्नच नव्हे तर कृती करावी असे आवाहन केले. सध्याची जगापुढे असलेली कोरोना महामारीची आव्हानात्मक स्थिती, चीन, टायटॅनिक अशा जगप्रसिद्ध घटनांवर त्यांनी प्रकाश टाकला. जगातील प्रमुख घटनांची सांगड भारतीय अर्थव्यवस्थेशी जोडतांना अनेक उदाहरणातून वास्तव समोर ठेवत घटनांचे सुत्रधार हे कायमच नामानिराळे असतात असे स्पष्ट केले. याप्रसंगी प्राचार्य मनोज परमार व सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सैय्यद हुसेन दाऊद

आबिदी यांनी केले. विद्यार्थ्यांनी दीपक करंजीकर यांच्याकडून आपल्या शंकांचे समाधान देखील करून घेतले. औचित्याच्या व जागतिक इतिसाहात नोंद असलेल्या ९/११च्या घटनेबाबत सविस्तर माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली अशी अनुभूती स्कूलच्या संचालिका सौ. निशा जैन यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अनुभूती स्कूलच्या माध्यमातून यापुढेही विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जागतिक बांबू दिवस म्हणून साजरा करावा!

पालघर/प्रतिनिधी

दरवर्षी १८ सप्टेंबर या दिवशी जागतिक बांबू दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. बांबू हे बहुपयोगी वनउपज असून आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे त्यास हिरवे सोने असे संबोधले जाते. बांबूचा उपयोग करुन मनुष्य जिवनात विकासाची वाटचाल सुरु झाल्याचे इतिहास सुध्दा साक्ष आहे. पुरातन काळात सुध्दा बांबूचा वापर मोठ्या प्रमाणात घर बांधणी, अवजारे, हत्यारे व घरगुती वस्तुसाठी करण्यांत येत असत. बांबू कारागिरी त्या काळापासून विकसित होत गेली व वस्तुमध्ये सुध्दा सुधार होत गेला.

मोठ्या प्रमाणात बांबू सहज उपलब्ध होत होते व त्या काळात सर्वसाधारणत: सर्वांना आवश्यक वस्तू बांबूचा उपयोग करुन बनविण्याची कला अवगत होती. आजपर्यंत आदिवासी पाड्यांमध्ये सुध्दा जवळ-जवळ सर्वांना बांबूचा वापर करुन त्यांना लागणारी वस्तू तयार करता येत होती. आधुनिक युगामध्ये बांबू वस्तूंना प्लास्टिकचा पर्याय आल्याने आमचे आदिवासी बांधवांचे कुशलेतेचा उपयोग कमी होऊ लागला. आज ग्रामिण भागामध्ये सुध्दा प्लास्टिकच्या वस्तू पोहचून ग्रामस्थांची आर्थिक परिस्थिती खालावत गेली आणि प्रदूषणाचा स्तर सुध्दा वाढू लागला. बांबूचे ग्रामिण भागामध्ये ग्रामीण बांधवांचे आर्थिक स्तर उंचावण्यामध्ये योगदान होतेच. त्याचप्रमाणे प्रदूषणावर सुध्दा पर्यायाने नियंत्रण होते याची जाणीव ठेवून केंद्र शासनाने राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय बांबू मिशन ची स्थापना केली व राज्यस्तरावर महाराष्ट्र बांबू विकास मंडळ ची स्थापना करण्यांत आली. याद्वारे चांगल्या बांबू प्रजातींची रोपांची लागवड खाजगी क्षेत्रामध्ये तसेच पडित क्षेत्रामध्ये करण्याची योजना आखण्यात आली. तसेच बांबू संसाधनावर आधारित उद्योगाचे निर्मितीसाठी योजना सुध्दा आखण्यात आली. National Bamboo Mission व Maharashtra Bamboo Development Boardच्या संकेतस्थळावर सर्व योजनांची विस्तृत माहिती उपलब्ध होऊ शकते. आज शेतकरी त्यांच्या पडिक जमिनीवर बांबू लागवड करुन पर्यावरण संरक्षणासाठी हातभार लावू शकतात व स्वत:चे आर्थिक उत्पन्न बांबू उपजाच्या माध्यमातून सुध्दा वाढू शकतात. आज जागतिक बांबू दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी निश्चय करावा कि, जास्तीत जास्त बांबूपासून तयार केलेल्या वस्तूचा वापर करुन पर्यावरणाचे संरक्षण व प्रदुषण कमी करणेबरोबर बांबू कारागिरांना त्यांचे रोजगाराची हमी देण्याची परिस्थिती निर्माण करावी.

रिपाई पक्षाच्या देवणी तालुका अध्यक्ष पदी गणेश कांबळे

देवणी/प्रतिनिधी

दिनांक १२ सप्टेंबर रोजी रिपाई पक्षाचे वतीने आढावा बैठक व पक्ष प्रवेश सोहळा देवणी येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास रिपाई महाराष्ट्र राज्य सचिव बाबासाहेब कांबळे, जिल्हाध्यक्ष देवीदास कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष अंकुश ढेरे, जिल्हा युवक सचिव सुशीलकुमार शिंदे, उदगीर अध्यक्ष प्रफुल्ल कुमार उदगीरकर, निलंगा अध्यक्ष संदीप कांबळे, जळकोट अध्यक्ष विनोद कांबळे, शिरूर अनंतपाळ अध्यक्ष मधुकर कांबळे, देवणी उपाध्यक्ष धनराज गायकवाड, देवणी शहराध्यक्ष विक्रम गायकवाड, गुणवंत कंबळे, भिम बोरे, विवेक कांबळे वरील मान्यवरांसह सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बाबासाहेब कांबळे यांच्या हास्ते नियुक्तीपत्र देऊन गणेश कांबळे यांची सर्वानुमते देवणी तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

नुतन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि संचालकाचे सत्कार

देवणी/प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील देवणी खु येथे शुक्रवारी सकाळी किसनराव पाटील यांच्या घरी कै. विठ्ठलराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून, त्याना अभिवादन करण्यात आले. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती देवणीचे नूतन सभापती शांतवीर आप्पा कन्नाडे व तसेच नूतन संचालक प्रा अनिल इंगोले, मकबुल पठाण, अनिल रोटे, अमोल येनगे व तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव मनोज कन्नाडे, किसन पाटील व सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांचा पाटील परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच यशवंत कांबळे, उपसरपंच विठ्ठल शिंगडे, ग्रामपंचायत सदस्य माधव रणदिवे, अजय गरड, संजय गरड, शंकर पाटील, शेतकरी संघटनेचे नेते राजाराम पाटील, व्यंकटराव पाटील, गुंडू पाटील, ज्योतिबा पाटील, बालाजी कारभारी, राजकुमार पाटील, शालेय समिती अध्यक्ष यादुल पठाण, हिरागिर गिरी, ज्ञानेश्वर पाटे, देविदास कुमदाळे, राम धनासुरे, व्यंकटराव चिटमपल्ले, उद्धव कुमदाळे, लहू पाटील, दिलीप पिनाटे, धनागिर गिरी,प्रभू काकनाळे, संजय मुराळे, अर्जुन मुराळे, विजयकुमार सुर्यवंशी, प्रकाश म्हेत्रे, भरत गिरी, सुर्यकांत कांबळे आदिजण उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण रणदिवे यांनी केले, तर आभार यादुल पठाण यांनी मानले.

20 TO 26 SEPTEMBER 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 18/09/2021 8:00 PM Page 1

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसाठी ५ ऑक्टोबरला मतदान

मुंबई/प्रतिनिधी

धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम व नागपूर जिल्हा परिषदा व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांचा स्थगित केलेला निवडणूक कार्यक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने ५ ऑक्टोबर २०२१ रोजी मतदान घेण्यात येणार आहे; तसेच पालघर जिल्हा परिषदेच्या व त्याअंतर्गतच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील त्याच दिवशी मतदान होईल आणि सर्व ठिकाणी ६ ऑक्टोबर २०२१ रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज येथे केली.

मदान यांनी सांगितले, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूर या ५ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांमधील रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी १९ जुलै २०२१ रोजी मतदान होणार होते; परंतु सर्वोच्च न्यायालयाचे ६ जुलै २०२१ रोजीचे आदेश आणि राज्य शासनाने कोविड-१९ मुळे पोटनिवडणुका स्थगित करण्याबाबत केलेली विनंती लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुका ९ जुलै २०२१ रोजी आहे त्या टप्प्यावर स्थगित केल्या होत्या. या प्रकरणी ९ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या सुनावणीत मात्र सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाचे ११ ऑगस्ट २०२१ रोजीचे कोविड-१९ संदर्भातील निर्बंध पोटनिवडणुकांसाठी लागू होत नसल्याचा निर्णय दिला आहे; तसेच पोटनिवडणुकांचा कार्यक्रम पुढे चालू

ठेवण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने तात्काळ निर्णय घेण्याबाबतही आदेश दिले आहेत. हे आदेश आणि कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेवून राज्य निवडणूक आयोगाने आता पोटनिवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य निवडणूक आयोगाने धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूरसह पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून कोरोना रुग्णांची संख्या व आठवडाभरातील दैनंदिन व मृतांच्या संख्येबाबत अहवाल मागविला होता. त्यावरून या सहा जिल्ह्यांतील कोरोना परिस्थिती आटोक्यात असल्याचे दिसून आले. धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूरच्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसाठी २२ जून २०२१ रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमात पालघर जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. कारण त्यावेळी कोविड-१९ संदर्भातील राज्य शासनाच्या निकषानुसार पालघर जिल्ह्याचा समावेश स्तर-३ मध्ये होता. त्यामुळे तेथील पोटनिवडणुका जाहीर केलेल्या नव्हत्या. आता मात्र या सर्व निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे ते म्हणाले. पालघर जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसाठी १५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२१ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील. २१ सप्टेंबर २०२१ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होईल. पुढील टप्पे धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूरच्या जिल्हा परिषदा व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसोबत होतील. कारण या पाच जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम छाननीनंतर स्थगित करण्यात आला होता. आता पालघरसह सर्व ठिकाणी २१ सप्टेंबर २०२१ रोजी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. नामनिर्देशनपत्रासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरूद्ध जिल्हा न्यायालयात अपील नसलेल्या ठिकाणी २७ सप्टेंबर २०२१ रोजी नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. अपील असलेल्या ठिकाणी २९ सप्टेंबर २०२१ पर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येतील. ५ ऑक्टोबर २०२१ रोजी मतदान; तर ६ ऑक्टोबर २०२१ रोजी मतमोजणी होईल. जिल्हा परिषदेच्या एकूण ८५ निवडणूक विभाग आणि पंचायत समितीच्या एकूण १४४ निर्वाचक गणांच्या पोटनिवडणुकांसाठी हे मतदान होईल. त्यासाठी कोरोना संदर्भातील आवश्यक ते सर्व प्रतिबंधात्मक उपाय योजून दक्षता घेण्यात यावी, असे निर्देशही देण्यात आले असल्याचे श्री. मदान यांनी सांगितले.

ओबीसींचे आरक्षण सन्मानाने परत द्यावे आणि खरीप पिकांचे सरसकट पंचनामे करण्याची मागणी

देवणी तालुका भाजपाचे तहसीलदारांना निवेदन

देवणी/शकिल मनियार

राज्यातील ओबीसी समाजाचे रद्द झालेले राजकीय आरक्षण सन्मानाने परत मिळावे आणि जोपर्यंत आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत कोणत्याच निवडणुका होणार नाही याची दक्षता घेण्याची मागणी देवणी तालुका भाजपाच्या वतीने तहसीलदाराकडे करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील खरीप पिकांचे जोरदार पावसाने व ढगफुटी सदृश पावसाने अतोनात नुकसान झाले आहे. पिकांचे नुकसान झाल्यास ७२ तासात विमा कंपनीला नुकसानीची माहिती द्यावी लागते. त्याच्यानुसार बहुतांशी शेतकऱ्यांना अनेक त्रुटींमुळे ऑनलाइन पिकांच्या नुकसानीची तक्रार देता आली नाही, तर काही मोजक्याच शेतकऱ्याने प्रत्यक्ष नुकसानीचे अर्ज दाखल केले. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्हाभरातील अनेक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी काही कारणे देऊन विमा कंपनीने मदत नाकारली होती निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने पिक विमा योजना सुरु केली आहे. या योजनेनुसार गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टी आणि जोरदार पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांची निवड विमा कंपनीने केलेल्या पंचनाम्या ऐवजी शासनाच्या राज्य आपत्ती निवारण आणि महसूल विभाग यांनी केलेल्या पंचनामा नुसार लातूर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचे सरसगट पंचनामे करून अडचणीत असलेल्या आर्थिक रित्या कोलमडलेल्या शेतकऱ्याची विम्याचा लाभ देऊन दिलासा देण्यात यावा अशा मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टी देवणी तालुक्याच्या वतीने तहसिलदारामार्फत मुख्यमंत्र्यांना ...पान ६ वर

पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या रोहिणी शेलार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

वाडा/प्रतिनिधी

पालघर जिल्हा परिषदेच्या पोटनिवडणुकीत गारगाव गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार रोहिणी रोहिदास शेलार यांनी शुक्रवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या प्रसंगी आमदार दौलत दरोडा यांचयसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पालघर जिल्हा परिषदेतील इतर मागास प्रवर्गाच्या १५ सदस्यांचे तर जिल्ह्यातील विविध पंचायत समित्यांमधील १४ सदस्यांचे सदस्यत्व रद्द झाले होते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर आता या रिक्त जागांवर निवडूक होत असून येत्या ५ ऑक्टोबर रोजी मतदान होत आहे. वाडा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या पाच तर पंचायत समितीच्या एका जागेवर होणाऱ्या पोटनिवडणुकीत सर्वसाधारण महिलेसाठी राखीव असलेल्या गारगाव गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या रोहिणी रोहिदास शेलार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. शेलार यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सांबरे, नीलेश पडवळे, रोहिदास पाटील, नरेश आकरे, रघुनाथ माळी, हरिभाऊ पाटील, अशोक गव्हाळे, तारक जाधव, सुचीता पाटील, रोहिदास शेलार यांच्या सह शेकडो कार्यकर्ते होते.

विद्यार्थी आणि गुरुजींनी बुजवीला रस्त्यावरील जीवघेणा खड्डा

अहमदपूर/फिरोज शेख

चाकूर कोपरा रोडवरील झरी गावापासून एक किलोमीटर अंतरावर जीवघेणा खड्डा पडला होता या खड्ड्यामुळे अनेक लोक जखमी झाले. अनेकांना कायमचे अपंगत्व आले,तो खड्डा येथील सिद्धेश्र्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी बुजवल्याने परिसरातील लोकांनी कौतुक केले. चाकूर तालुक्यातील झरी बु. हे गाव भारताची दक्षिण काशी म्हणून ओळखली जाते या गावाला अहमदपूर आंबेजोगाई हायवे व लातूर नांदेड जोडणारा हायवे कोपरा चाकूर रस्ता आहे. दोन हायवेला जोडणारा रस्ता असल्याने या रस्त्याने लोकांची वर्दळही जास्त आहे, परंतु हा रस्ता झाला तेव्हापासून प्रत्येक वेळी इथे खड्डा पडतो यापूर्वीही तो बुजविण्याचा प्रयत्न झालाय परंतु बांधकाम विभाग मात्र याकडे साफ दुर्लक्ष करते. दरम्यान मागच्याच आठवड्यात दोन पती-पत्नी रस्त्याने जात असताना दोघही जागेवरच पडल्याने पत्नीच्या डोक्याला खूप मार लागला व रक्तबंबाळ झाली. असे नित्याचेच बनले होते झरी बु येथील

सिद्धेश्र्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील हिंदी विभागाचे प्रमुख प्रख्यात निवेदक प्रा.मारोती बुद्रुक पाटील यांनी बारावीच्या विद्यार्थ्यांना याबाबत सविस्तर माहिती दिली. आपण एक सामाजिक काम करूया नुसतं प्रबोधन ऐकून किंवा प्रबोधन सांगून काही प्रश्न मिटत नसतात प्रश्न मिटविण्यासाठी आपण प्रत्यक्षात उतरावे लागते हे सांगताच येथील विद्यार्थ्यांनी होकार देत तो खड्डा बुजविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. हा खड्डा बुजवण्यासाठी सहशिक्षक आत्माराम बाबुराव गुट्टे, खंदारे राजकुमार रमेश, किरणकुमार बंकटराव काळे, सिद्धेश्र्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी रुपेश धुंडिराज येन्ने, दत्ता व्यंकटी पुरी, उदगीरे रामचंद्र अशोक, सिद्धेश्वर तुकाराम शिंदे या सर्वांनी मिळून या जीवघेण्या खड्ड्यात मोठ मोठे दगड टाकून त्यावर छोटे दगड टाकून माती व मुरूम टाकून तो खड्डा बुजविण्याचा प्रयत्न केला. आपण आपल्या अंगणात दारात एकही खड्डा ठेवत नाही आपण आपल्या स्वतःच्या घराची व दाराची जशी काळजी घेतो तसे सभोवताली परिसरातील आपल्याही रोडवरील असे खड्डे प्रत्येकानं बुजविण्याचा प्रयत्न केला तर अनेकांचे प्राण वाचतील आपल्या परिसरात असे अनेक जीवघेणे खड्डे असतात परंतु याकडे आपले साफ दुर्लक्ष असते तसे ते प्रशासनाचे व बांधकाम विभागाचे काम जरी असले तरी आपण आपल्या देशाचे नागरिक म्हणून आपले हि कुठेतरी कर्तव्य असते असं समजून जर काम केलं तर काम केल्याचा आनंद आणि इतरांचे प्राण वाचवले तर याचे पुण्य आणि समाधान मिळेल. लाखो रुपये कमावूनही हे समाधान मिळत नाही. इतरांच्या आयुष्यातील दुःख कमी करणे हेच मानवाचे पहिले कर्तव्य आहे आणि ते कर्तव्य पार पाडण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा. एक खड्डा बुजवून हे काम जरी छोटे असले तरी या पासून मिळणारी प्रेरणा ही खूप मोठी आहे जसे प्रत्येकाने एक झाड लावले तर लाखो झाडं आपल्या परिसरात उभी राहू शकतात. तसे प्रत्येकानं काहीना काहीतरी काम केले तर आपला परिसर सुखी-समाधानी होऊ शकेल असेही प्रा.मारोती बुद्रुक पाटील यांनी सांगितले.

वाहन चालक दिनानिमित्त लातूरात ४७ चालकांचे रक्तदान

लातूर/प्रतिनिधी

येथील जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित वाहन चालक गुणगौरव व मार्गदर्शन सोहळ्यात ४७ वाहन चालकांनी रक्तदान करीत आपली सामाजिक बांधिलकी जपली. दयानंद गेट समोर संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन मोटार परिवहन विभागाच्या निरीक्षक शीतल गोस्वामी यांच्या हस्ते करण्यात आले तर मार्गदर्शक म्हणून एमआयडीसी पोलिस स्थानकाचे पोलिस उप निरीक्षक कल्याण नेहरकर यांनी चालकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मोटार परिवहन विभागाचे निरीक्षक संदीप लोणारी, शांताराम साठे, ट्रॅव्हल्स असोसिएशनचे जुगलकिशोर तोष्णीवाल, सामाजिक कार्यकर्ते दीपक मिरकले यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते सर्व उपस्थित चालकांना सेफ्टी किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्थेचे योगेश शिंदे, नईम शेख, प्रवीण गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

अभियंत्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ निर्मितीसाठी प्रयत्न करणार-आ.अभिमन्यू पवार

लातूर/प्रतिनिधी

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची १६० व्या जयंती निमित्त जागतिक अभियंता दिन मोठ्या उत्साहात भारत बर साजरा केला गेला . लातूर येथील असोसिएशन ऑफ कॅन्सल्टिंग इंजिनिअर्स आर्किटेक्ट या संघटनेच्या वतीने हॉटेल एम्बॅसि येथे अभियंत्यांचा स्नेहमेळावा नुकताच संपन्न झाला. यावेळी उदघाटक म्हणून बोलताना आमदार अभिमन्यु पवार म्हणाले की,देशाच्या जडण-घडणी मध्ये अभियंत्यांचा सिंहाचा वाटा आहे. शिक्षणासारखाच अभियंतांचाही लातूर पॅटर्न जगासमोर आला आला पाहिजे.कृषी विषयापीठाच्या धरतीवर अभियंत्यांसाठी स्वतंत्र अभियंता विद्यापीठ निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार असे विचार त्यांनी यावेळी मांडले. लातूरच्या विकासात व सौंदर्यात अभियंत्याचा सिंहाचा वाटा आहे. लातूर शहराच्या स्वच्छतेसाठी चौक सुशोभीकरण व जल पुनर्भरण आदी सामाजिक कामात अभियंता संघटनेचा महत्वाचा वाटा राहिला आहे. याहीपुढे संघटनेच्या माध्यमातून नवनवीन सामजिक उपक्रम राबवले जावेत.अशा उपक्रमांना योग्य ते सहकार्य महापालीके कडून केले जाईल अशी भावना यावेळी लातूर महापालिकेचे आयुक्त अमन मित्तल यांनी व्यक्त केली. यावेळी व्यासपीठावर नगर रचनाकार विभागाचे सहसंचालक सुनिल मिटकरी श्री ओम स्टील चे प्रतिनिधी वल्लभ पारतकर संघटनेचे अध्यक्ष अभिजित सरसंबेकर.डॉ.धर्मवीर भारती, आदी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती होती .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभियंता डॉ. धर्मवीर भारती यांनी केले आपल्या प्रास्ताविकात त्यांनी संघटनेची गेली अनेक वर्षापासूनची वाटचाल, संघटनेचे ध्येय उद्दिष्ट या बद्दलची माहिती दिली. या वेळी मान्यवरांच्या हस्ते नगर रचनाकार श्रीमती निकिता भांगे, ज्येष्ठ अभियंता गोपाळ शिंदे आदी अभियंत्या चा सन्मान करण्यात आला. तसेच युवा व युवती अभियंत्याचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते अनिल पुरी यांनी केले तर आभार अरिहंत जंगमे यांनी मानले. हा कार्यक्रम पुर्णपणे यशस्वी करण्यासाठी संघटनेची विनोद उदगीरकर, वसीम शेख, अमोल सेलुकर, अरिहंत जंगले, नितीन मांडाले, सुनिल देशमुख, मनोज देशमुख, नागनाथ गित्ते, वामन पाटील, शाम संगमकर, अहमद मुल्ला, सहदेव सर, सुषमा थोरात, रोहिणी गिरी आदींनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाने सांगता करण्यात आली.

अहमदपुरमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिवस उत्साहात साजरा!

अहमदपूर/प्रतिनिधी

अहमदपूर येथील जिल्हा परिषद मैदानावर उपविभागीय अधिकारी प्रभोदय मुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अत्यंत उत्साहाच्या वातावरणामध्ये संपन्न झाला. यावेळी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी पोलीस निरीक्षक नानासाहेब लाकाळ, पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर इंदुरीकर, नायब तहसीलदार रामचंद्र केदार, डॉ. सिद्धार्थ कुमार सूर्यवंशी, जीवन गायकवाड स्वातंत्र्यसैनिक व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समयी गावात ई पिक पेरा १००% केल्याबद्दल तलाठी कमलाकर पन्हाळे यांचा उपविभागीय अधिकारी प्रभोदय मुळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामलिंग तत्तापुरे यांनी केले तर आभार गौरव चवंडा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महसूल प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

वाड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस लाभार्थी सन्मान दिन म्हणून साजरा

वाडा/प्रतिनिधी

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७१वा वाढदिवस आज शुक्रवारी (दि.१७) बिलावली येथे भाजपचे पालघर जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांचा सन्मान करून मोदींचा वाढदिवस लाभार्थ्यी सन्मान दिवस म्हणून साजरा करण्यात आला. कोरोना काळातील सर्व नियमांचे तंतोतंत पालन करुन हा वाढदिवस भाजपचे जेष्ठ नेते बाबाजी काठोळे यांच्या हस्ते केक कापून साजरा करण्यात आला. बालपणापासूनच स्वतःला देशासाठी झोकून दिलेल्या नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून काम करत

आपल्या कार्याचा प्रारंभ केला होता. गुजरातच्या मुख्यमंत्री पदापासून ते देशाचे यशस्वी पंतप्रधान पदापर्यंत आपली भुमिका प्रभावीपणे पार पाडली आहे. विकासाचा दृष्टिकोनातून बाळगून राष्ट्रहितासाठी राजकारण आणि समाजकारण करणारे समर्पक नेतृत्व मोदी असल्याचे गौरवोद्गार जेष्ठ नेते बाबाजी काठोळे यांनी ...पान ६ वर

वकील परिषदेच्या अध्यक्ष पदी अँड.गजानन चव्हाण यांची बिनविरोध निवड

वाडा/प्रतिनिधी

महाराष्ट्रराज्य आणि गोवा राज्याच्या वकील परिषदेच्या अध्यक्ष पदी सुप्रसिद्ध विधिज्ञ अँड.गजानन बी. चव्हाण यांची बिनविरोध निवड झाल्या बद्दल वाडा तालुका वकील संघटना व जव्हार तालुका वकील संघटना यांच्या वतीने त्यांचा गुरुवारी (दि.१६सप्टेंबर) सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अँड.गजानन बी. चव्हाण यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. वाड्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील सभागृहा मध्ये या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी वाडा वकील संघटने तर्फे आयोजित विधी व्याख्यानमालेचा उद्घाटन समारंभही पार पडला. कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून अँड. प्रमोद पी.पाटील (भिवंडी) हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

अँड.संतोष डेंगाणे यांनी केले तर अँड.राजाराम मुकणे (जव्हार) व वाडा तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष अँड.रमाकांत पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्थावना अँड.चंद्रकांत पाटील यांनी केली तर अँड.संजय चोथे यांनी आभार व्यक्त केले. वाडा व जव्हार वकील संघटनेचे अनेक सदस्य यावेळी उपस्थित होते.